सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, १९ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २२१ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# पद्मश्री अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांचे निधन

## वयाच्या ९३ व्या वर्षी सोलापुरात घेतला अखेरचा श्वास; आज अंत्यसंस्कार



तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. १८ जून–

पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अरण्यऋषी मारुती भुजंगराव चित्तमपल्ली यांचे वृद्धापकाळाने सोलापुरात निधन झाले. वयाच्या ९३ वर्षी अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांनी अखेरचा श्वास घेतला. ३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पदमश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यानंतर दिल्लीतून परतल्यापासूनच त्यांची प्रकृती चिंताजनक होती. तेंव्हापासूनच ते अंथरुणाला खिळून होते. अखेर, बुधवार, दि. १८ जून रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास सोलापुरातील राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली. अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी एम्पायर सोसायटी येथील निवासस्थानापासून त्यांची अंत्ययात्रा गुरुवार दि. १९ जून रोजी दुपारी १ वाजता निघणार आहे. त्यांच्यावर रूपाभवानी मंदिराजवळील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात भावजय, दोन पुतणे, सुना व नातवंडे असा परिवार आहे. पद्मश्री पुरस्कार स्वीकारण्यास ते दिल्लीला गेले होते. त्या प्रवासामुळे त्यांना कमालीचा थकवा जाणवत होता. गेल्या दहा दिवसांपासून त्यांनी अन्न घेणे बंद केले होते. दिवसभरात ते तीन वेळा फक्त दूध घेत असत.




### कोण होते अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली

अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली (जन्म: ५ नोव्हेंबर १९३२, सोलापूर, महाराष्ट्र) हे एक अत्यंत आदराचे स्थान असलेले भारतीय निसर्गवादी, वन्यजीव संरक्षक आणि प्रख्यात मराठी लेखक आहेत. त्यांना त्यांच्या कार्यामुळे आणि जंगलावरील अगाध प्रेमामुळे 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाते.

मारुती चित्तमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्षे सेवा केली. त्या काळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. त्यांनी एकूण ५ लाख किमी प्रवास केला. मारुती चितमपल्ली यांना १३ भाषांचे ज्ञान होते. त्याद्वारे आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत त्यांनी पर्यावरणाशी संबंधित मोठी माहिती मिळवली. त्या माहितीची नोंद केलेल्या आणि ३० वर्षे जपून ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत. डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत पक्षीकोश, प्राणीकोश आणि मत्स्यकोशाचे लेखन पूर्ण केलं. अरण्यवाचनासह प्राणी, पक्षी, वनस्पतीची वैशिष्ट्यांसह वन्य जीवन विषद करणारी २५ पेक्षा जास्त पुस्तके चितमपल्ली यांनी लिहिली. निसर्गातील हा ठेवा समाजाला कळावा या भावनेतून सतत कार्यरत हा सकारात्मक विचाराचा ऊर्जाकोश म्हणजे विख्यात लेखक मारुती चितमपल्ली. सोलापूरच्या गिरणी कामगारांच्या घरात जन्मलेल्या चितमपल्ली यांना त्यांच्या जंगल आणि पक्ष्यांविषयीच्या अभ्यासामुळे अरण्यऋषी म्हणून ओळखले जात होते. वनाधिकारी म्हणून सरकारी नोकरी करतानाच त्यांनी वन, वन्यजीव आणि पक्षीशास्त्र या विषयांवर विपुल लेखन केले. त्यांनी पक्षी कोष तयार करायला देखील स्वत:ला वाहून घेतले होते. एका ऋषीतुल्य व्यक्तीमत्वाचा सन्मान यंदा पद्मश्री पुरस्कारानं करण्यात आला होता.

मारुती चितमपल्ली यांनी सहा दशकांहून अधिक काळ मराठी लेखल, वन्यजीव संशोधन आणि पर्यावरण जागरुकता केली होती.त्यांनी मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदीही भूषवले होते. वन, वन्यजीव आणि पक्षीशास्त्र या विषयांवर २० हून अधिक पुस्तके त्यांनी लिहिली होती. मराठी आणि इतर भाषांमधील पक्षी, प्राणी (प्राणी कोष) आणि झाडे (वृक्ष कोष) आदी शब्दकोषांचे काम केले होते. पक्षी जाय दिगंतरा (१९८१) आणि रानवाटा (१९९१) सारख्या उत्कृष्ट कलाकृती त्यांनी निर्माण केल्या होत्या. वन सेवा अधिकारी म्हणून ते नोकरी करीत होते. १९९० पर्यंत संचालक व्याघ्र प्रकल्प म्हणूनही काम करताना त्यांनी कनार्ळा पक्षी अभयारण्य, नागझिरा अभयारण्य आणि नवेगाव राष्ट्रीय उद्यान यासारख्या प्रमुख वन्यजीव अभयारण्यांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

### वन्य जीवन विषद करणारी २५ पुस्तके



प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षीशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक अशी मारुती चित्तमपल्ली यांची ओळख आहे. मारुती चितमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्षे सेवा केली. त्या काळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. या भटकंतीत ५ लाख किमी प्रवास. १३ भाषांचे ज्ञान. त्याद्वारे आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत माहिती मिळवली. त्या माहितीची नोंद केलेल्या व ३० वर्षे जपून ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत. डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत पक्षिकोश, प्राणिकोश व मत्स्यकोशाचे लेखन पूर्ण केले. अरण्यवाचनासह प्राणी, पक्षी, वनस्पतीची वैशिष्ट्यांसह वन्य जीवन विषद करणारी २५ पुस्तके लिहिली. निसर्गातील हा ठेवा समाजाला कळावा या भावनेतून सतत कार्यरत हा सकारात्मक विचाराचा ऊर्जाकोश म्हणजे विख्यात लेखक मारुती चितमपल्ली.

### निसर्गाचा वाटाड्या हरपला : एकनाथ शिंदे

निसर्गातील वनालाही मन असतं, पण सगळ्यांनाच ते वाचता येत नाही. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी वनाचं मन वाचलं आणि माणसाशी नातं जोडायला ते अधीर असतं हे ओळखलं. पुढे आपलं अवघं आयुष्य त्यांनी हे नातं जोडण्यासाठी झोकून दिलं. माणसं वाचणं कदाचित सोपं असतं, कारण संवादातून ते शक्य होतं. अरण्य जाणण्यासाठी अरण्यवाचन करावं लागतं. पद्मश्री मारुती चितमपल्ली यांनी त्यासाठी आपले जीवन समर्पित केले, आणि अरण्याचे अंतरंग आपल्या सोज्वळ लेखनातून माणसासमोर उलगडले. त्यातून माणूस आणि अरण्य यांची जवळीक जोडली. या अजोड कार्यातून माणसाला निसर्ग समजावणारा अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या निधनाने माणूस व निसर्ग यांतील दुवा हरवला आहे. त्यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली.

### चितमपल्लींचे निधन वेदनादायी : अजित पवार

ज्येष्ठ साहित्यिक, पक्षीशास्त्रज्ञ, वन्यजीव अभ्यासक पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या निधनानं साहित्य, पर्यावरण, सामाजिक क्षेत्राची अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या निधनानं निसर्गाशी संवाद साधण्याची नवी दृष्टी देणारा तपस्वी अरण्यऋषी हरपला आहे, मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांप्रती सहसंवेदना व्यक्त करतो. मारुती चितमपल्ली सरांनी आपलं संपूर्ण आयुष्य वन, प्राणी, पक्षी आणि निसर्गाच्या गूढ अभ्यासासाठी समर्पित केलं. वृक्ष, पाने, फुलं, पक्षी, प्राणी, डोंगर अशा निसर्गातील अनेक गोष्टींची माहिती असलेला विश्वकोश ही त्यांची ओळख होती. त्यांच्या लेखनातून मराठी साहित्यात निसर्गाविषयी संवेदनशील जाण निर्माण झाली. त्यांच्या लेखणीतून मराठी शब्दसंपदेत अनेक नवे शब्द, संकल्पना आणि अनुभवांची भर पडली. वनविभागात तीन दशकांहून अधिक सेवा बजावत असताना त्यांनी कनार्ळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिलं. त्यांच्या प्रयत्नांतून ही अभयारण्ये जैवविविधतेच्या संवर्धनासाठी आदर्श ठरली. पक्षीशास्त्र आणि वन्यजीव अभ्यासाच्या क्षेत्रात त्यांनी केवळ महाराष्ट्रापुरतंच नव्हे, तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपली वेगळी ओळख निर्माण केली.



कुटुंबासमवेत अरण्यऋषी मारुती चितमपल्ली

### जीवन आणि कार्य

- शिक्षण आणि वनसेवा: चित्तमपल्ली यांनी कोईम्बतूर येथील स्टेट फॉरेस्ट सर्व्हिस कॉलेजमधून शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या वन विभागात ३६ वर्षांहून अधिक काळ सेवा केली.
- कार्यक्षेत्र: त्यांनी कनार्ळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांसारख्या विविध जंगलांमध्ये आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये काम केले.
- वन्यजीव संरक्षण: वन्यजीव संरक्षणात त्यांचे मोठे योगदान आहे. नागझिरा आणि मेळघाट येथे विस्थापित वन्यजीवांसाठी अनाथाश्रम उभारण्यास त्यांनी मदत केली.
- भाषा ज्ञान: त्यांना १८ भाषांचे ज्ञान आहे, ज्यात संस्कृत, जर्मन आणि रशियन भाषांचा समावेश आहे.

### मराठी साहित्य संपदा समृद्ध करणारा अरण्यऋषी : मुख्यमंत्री

निसर्गाला शब्दरूपांनी साजिवंत करणारे आणि मराठी साहित्यात निसर्गसंपदे विषयीच्या अक्षरधनाची भर घालून, आपली साहित्य संपदा समृद्ध करणारे अरण्यऋषी म्हणून पद्मश्री मारूती चितमपल्ली अजरामर राहतील, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. निसर्ग आणि साहित्य क्षेत्रात व्रतस्थ राहून काम करणारे चितमपल्ली यांचे निधन महाराष्ट्रासाठी एक मोठी हानी आहे, त्यांच्या निधनाने एक दिपस्तंभ निमाला आहे, अशी श्रद्धांजली मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अर्पण केली आहे.

मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, वन विभागात काम करताना चितमपल्ली यांनी आगळा दृष्टीकोन बाळगून काम केले. त्यांनी अनेक निसर्ग किमया आपल्या निरिक्षणातून शब्दांनी चितारल्या. त्यासाठी त्यांनी गाढा अभ्यासही केला. आदिवासी तसेच राना–वनात राहणाऱ्या बांधवांकडे असलेले निसर्गाविषयीचे ज्ञान त्यांच्यामुळेच शब्दबद्ध झाले. पक्षितज्ज्ञ, निसर्गलेखक, वन्यजीवांचा अभ्यासक अशी त्यांनी ओळख मिळवली. त्यांच्यामुळे मराठी भाषेला राना–वनातील, निसर्गाशी निगडीत अस्सल असे शब्द मिळाले. त्यांच्या आत्मचरित्राचे नावच चकवाचांदण– एक वनोपनिषद असे होते. त्यांनी वयाच्या ८४ व्या वर्षी संस्कृतचाही अभ्यास केला. सोलापुरला झालेल्या ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले होते. त्यांचे निसर्गाविषयीचे लेखन, अभ्यास–संशोधन, पक्षिकोश अशी साहित्य संपदा मराठी भाषेचे वैभव वाढणारे संचित आहे. ही आपल्या सर्वांसाठी एक अमुल्य असा ठेवा आहे. दिवंगत चितमपल्ली यांचा सोलापूर ते नागपूर आणि पुन्हा नागपूर ते सोलापूर असा प्रवास राहीला आहे. विदर्भातही त्यांचा मोठा गोतावळा आहे. जंगलातील अनेकांशी त्यांचे ऋणानुबंध राहीले आहेत. या सगळ्या प्रवासात ते आयुष्यभर निसर्ग आणि मराठी साहित्य क्षेत्राशी व्रतस्थ राहीले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील निसर्ग अभ्यासक, तसेच साहित्य क्षेत्रासाठीचा दिपस्तंभ निमाला आहे, ही एक मोठी हानी आहे. दिवंगत चितमपल्ली यांचे कुटुंबिय आणि स्नेही यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या सर्वांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळावी, अशी ईश्वरचरणी प्रार्थना, असे नमूद करून, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी ज्येष्ठ साहित्यिक, अरण्यऋषी, पद्मश्री मारूती चितमपल्ली यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### साहित्यिक योगदान

- मारुती चित्तमपल्ली यांचे साहित्य मुख्यतः मराठी भाषेत असून ते वन्यजीव, निसर्ग आणि आदिवासी जीवनावर केंद्रित आहे. त्यांच्या अनुभवांमधून आणि सखोल अभ्यासातून त्यांनी मराठी साहित्यात एक अद्वितीय स्थान निर्माण केले आहे. त्यांची लेखनशैली ओजस्वी आणि माहितीपूर्ण आहे, जी वैज्ञानिक ज्ञानाला सर्जनशील कथेशी जोडते.
- मुख्य विषय: त्यांच्या लेखनात वन्यजीवांचे वर्तन, वनस्पती, पक्षी आणि जंगलांशी संबंधित रहस्ये यांचा समावेश आहे. त्यांनी त्यांचे अनुभव वाचकांसमोर जिवंतपणे मांडले आहेत.
- मराठी भाषेचे संवर्धन: पक्षीविज्ञान आणि वन्यजीवनाशी संबंधित अनेक नवीन शब्द आणि संज्ञा त्यांनी मराठी भाषेत आणल्या आहेत. अनेक पक्षिशास्त्रीय संकल्पनांना त्यांनी मराठीत नावे दिली आहेत.

### आत्मकथा

'चकवा चांदणं' ही आत्मकथा खूप प्रसिद्ध आहे.

### प्रमुख साहित्यकृती

- निलवंती
- जंगलाचं देणं
- घरट्या पलिकडे
- रातवा
- रानवाटा
- प्राणीकोश
- पक्षीकोश
- सुवर्ण गरुड
- निसर्गवाचन
- शब्दांचे धन
- मृगपक्षीशास्त्र
- केशराचा पाऊस
- आनंददायी बगळे



### पुरस्कार आणि सन्मान

- पद्मश्री: जानेवारी २०२५ मध्ये, त्यांना भारताचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मश्री प्रदान करण्यात आला.
- विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार: २०१७ मध्ये, त्यांना महाराष्ट्र सरकारद्वारे विंदा करंदीकर स्मृती जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष: २००६ मध्ये सोलापूर येथे झालेल्या ७९ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते.
- मारुती चित्तमपल्ली यांनी आपल्या लेखनातून महाराष्ट्रातील जंगलांना एक ज्ञानवर्धक वर्ग आणि कविता बनवले आहे. त्यांचे कार्य निसर्गाबद्दलचे त्यांचे अथांग प्रेम आणि त्याच्या संरक्षणाची त्यांची वचनबद्धता दर्शवते.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# स्मार्ट सिटीसह विविध विकास कामांची तपासणी स्वतंत्र बाह्य संस्थेकडून होणार

**महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांची माहिती**

## सिद्धेश्वर तलावातील ऑक्सिजन पातळी वाढविण्यासाठी १४ एरिएटर बसविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून -**

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेतील तसेच राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रमा अंतर्गत करण्यात आलेल्या कामांचे स्वतंत्र बाह्य संस्थेमार्फत तपासणी करण्यात येणार आहे श्री सिद्धेश्वर तलावातील ऑक्सिजन पातळी वाढविण्यासाठी ५७ लाख निधीतून १४ एरीएटर्स बसविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.



सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजना आणि राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम (एन कॅम) अंतर्गत कोट्यावधीची विकास कामे झालेले आहेत मात्र ही कामे निकृष्ट दर्जाची झाले असल्याचा आरोप होत आहे. देखभाल दुरुस्ती अभावी कामे ना दुरुस्त आहेत. या संदर्भात विचारले असता महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे म्हणाले, स्मार्ट सिटी आणि शहरातील विविध विकास कामांची केंद्र शासना अंतर्गत असलेल्या सीआयएल या स्वतंत्र बाह्य संस्थेकडून तपासणी करण्यात येणार आहे. याचे टेंडर लवकरच काढण्यात येणार असून त्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रायोगिक तत्त्वावर या एजन्सीकडून ही तपासणी करण्यात येणार आहे. सुरू असलेल्या तसेच पूर्ण झालेल्या कामांची तपासणी या संस्थेकडून होणार आहे. श्री सिद्धेश्वर तलावातील मासे आणि कासवांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर नैनिताल येथील तलाव संदर्भात तेथील प्रशासनाशी चर्चा केली. त्या ठिकाणी तलावामध्ये कारंजे, एरिएटर्स लावून पाण्यातील ऑक्सिजन पातळी वाढविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर श्री सिद्धेश्वर तलावातीलही ऑक्सिजन पातळी वाढविण्यासाठी ५७ लाख रुपये मंजूर निधीतून १४ एरीएटर्स बसविण्यात येणार आहेत. या निधी मंजुरीची प्रक्रिया जिल्हा प्रशासन च्या माध्यमातून सुरू आहे. जिल्हा नियोजन समितीकडून एकूण पाच कोटीचा निधी श्री सिद्धेश्वरपरिसरातरिसरात कामासंदर्भात मंजूर आहे. त्याचीही प्रक्रिया सुरू आहे. श्री सिद्धेश्वर तलावात कोणतेही सांडपाणी मिसळले जात नाही. पाऊस पडल्यानंतर ते पाणी या तलावात जमा होते. त्यानंतर शेवाळाचे प्रमाण वाढल्याने ते कुजते. परिणामी पाण्याची ऑक्सिजन पातळी कमी होते. सद्यस्थितीत तलावातील पाण्याची पातळी आवश्यक चार ऐवजी १.३ आहे. तर पीएचचे प्रमाण ९.४ आहे, जे सात हवे असते. एरियटर्स लावूनही तलावातील ऑक्सिजन पातळी वाढली नाही तर दुसऱ्या टप्प्यात आरओ यंत्रणा बसविण्यात येणार आहे, असेही आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार , संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे , तैमूर मुलानी, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, नगररचना उपसंचालक मनीष भिष्णुरकर, नगर अभियंता सारिका अकुलवार, नियंत्रण अधिकारी तपन डंके आदींसह अधिकारी उपस्थित होते.

### पंचकट्टा ते राणी लक्ष्मीबाई मार्केट पर्यंतचे अतिक्रमण हटविणार

शहरातील पंचकट्टा ते राणी लक्ष्मीबाई मार्केट पर्यंतच्या रस्त्यावरील अतिक्रमण लवकरच काढण्यात येणार आहे. या ठिकाणी एकूण ३१ अतिक्रमणे आढळून आले आहेत. मोजणी करून अतिक्रमित जागाही निश्चित केली आहे. संबंधितांना स्वतःहून अतिक्रमण काढण्याच्या नोटीस बजावण्यात येणार आहेत. त्यानंतर अखेर महापालिका प्रशासनाकडून अतिक्रमण काढले जाणार आहे, असेही आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### ५४ मीटर रस्ता कामाचे १.९० कोटीचे टेंडर काढले

शहरातील ५४ मीटर रस्त्यामधील अतिक्रमण काही दिवसांपूर्वीच हटवले. या दरम्यानच्या २०० मीटर अंतराचा रस्ता करण्यासाठी टेंडर काढण्यात आले आहे. राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम योजनेअंतर्गत एक कोटी ९० लाख रुपये निधीतून हा रस्ता करण्यात येणार आहे. एक महिनाभरात टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन वर्क ऑर्डर देण्यात येईल. त्यानंतर महिनाभरात या रस्त्याचे काम पूर्ण होईल, असेही यावेळी आयुक्त म्हणाले.

# जुना पुना नाका ते पत्रकार भवन उड्डाणपूल भूसंपादनासाठी प्रक्रिया पूर्ण

## दुसऱ्या उड्डाण पुलासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार

**सोलापूर :** सोलापूर शहरात होणाऱ्या दोन उड्डाणपूलांपैकी छत्रपती संभाजी महाराज चौक (जुना पुना नाका) ते पत्रकार भवन या पहिल्या फेज मधील निवाडे (अवार्ड) जवळपास पूर्ण झाले आहेत. पाच पैकी एका टप्प्यातील प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. फेज वन उड्डाणपलासाठी ७० कोटी तर फेज टू च्या उड्डाणपुलासाठी ३५ कोटी रुपये असे एकूण १०६ कोटी रुपये भूसंपादनासाठी निधी अपेक्षित आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

केंद्र शासनाने सोलापुरात दोन उड्डाणपूल बांधण्याची योजना सन २०१६ मध्ये जाहीर केली होती. भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील प्रकल्पाच्या १०० खाजगी मिळकतींपैकी ८ मिळकतींच्या निवाड्यांचे काम बाकी आहे. दरम्यान दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी प्रस्ताव प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर सुरू आहे. त्यानंतर भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार आहे.


जुना पुना नाका ते पत्रकार भवन तसेच जुना बोरामणी नाका ते पत्रकारभवन असे दोन उड्डाणपूल शहरात होणार आहेत. यामुळे शहराच्या रहदारी व वाहतुकीम ध्ये लक्षणीय सुधारणा होण्यास मदत होणार आहे. जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या पहिल्या टप्प्यातील प्रकल्पात एकूण १३७ मिळकती बाधित होणार आहेत. त्यापैकी १०० खाजगी तर ३७ या शासकीय निमशासकीय आहेत. यापैकी खाजगी मिळकतींच्या भूसंपादनाचे काम राज्य शासन नियुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांमार्फत होत आहे. पहिल्या टप्प्यातील प्रकल्पात १०० खाजगी मिळकतींपैकी ९२ निवाड्यांचे काम पूर्ण झाले आहे. यापैकी ५९ मिळकतींचा ताबादेखील घेण्यात आला आहे. यामधील पाच टप्प्यापैकी एक टप्प्याचे भूसंपादनाचे काम राहिले असून त्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी विभागीय आयुक्तांकडे पाठविला आहे. ज्यांनी नुकसान भरपाई घेतली नाही त्यांची रक्कम लवादाकडे जमा करण्यात येत आहे.



जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात एकूण ९६ मिळकती असून यापैकी खाजगी ८४ तर उर्वरित १२ शासकीय- निमशासकीय आहेत. या प्रकल्पाच्या डिझाईनमध्ये बदल करण्यात आल्याने त्यासंदर्भातील शुद्धीपत्रक मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आले होते. त्याला नुकतीच मंजुरी मिळाल्याने दुसऱ्या टप्प्याचे भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. दरम्यान, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३७ तर दुसऱ्या टप्प्यात १२ असे एकूण ४९ शासकीय- निमशासकीय जागा आहेत. या प्रकल्पाच्या कामी शासकीय- निमशासकीय भूसंपादन होणे आवश्यक आहे. या भूसंपादनाची प्रक्रिया जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त स्तरावर केली जात आहे. भूसंपादनानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून उड्डाणपूल बांधण्याची निविदा काढण्यात येणार आहे.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी शासकीय जागा संदर्भात पाठपुरावा केल्याने भूसंपादनातील खर्च कमी झाला आहे. १४४ कोटी एकूण भूसंपादनासाठी निधी अपेक्षित होता. शासकीय जमिनीचा विषय मार्गी लागल्याने आता १०६ कोटी रुपये भूसंपादनासाठी अपेक्षित आहेत. सोलापूर महापालिकडे भूसंपादनासाठी आवश्यक निधी उपलब्ध आहे, असेही आयुक्त यांनी स्पष्ट केले.

# श्रध्दांजली



## लोकांनी सकस वाचावं म्हणूनच मी स्वतःचं ग्रंथालय सुरू करतोय...

- ही त्यांची वाक्यं केवळ शब्द नव्हती, ती होती त्यांच्या आयुष्याची दिशा. आज अरण्यऋषी, साक्षात निसर्गाचे उपासक, लेखक, विचारवंत आणि पर्यावरणप्रेमी पद्मश्री मारुती चित्तमपल्ली आपल्यातून निघून गेले, याची दुःखद बातमी मिळाली आणि संपूर्ण साहित्य, पर्यावरण आणि समाजप्रेमी वर्ग हळहळला. चित्तमपल्ली सरांनी आपल्या आयुष्यात ३० हजारांहून अधिक पुस्तकांचं वाचन आणि संकलन केलं. ही सर्व पुस्तकं - ज्यात नोबेल, बुकरसारख्या जागतिक पुरस्कार विजेत्या साहित्यकृतींचा समावेश होता - ते लोकांसाठी खुली करणार होते. ङ्गहे पुस्तकं घरी नेता येणार नाहीत. कारण ती दुर्मिळ आहेत, आणि अभ्यासासाठी आहेत, असं म्हणणारे ते खरे अर्थाने वाचनसंस्कृतीचे पूजक होते.



त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता - जंगल, वन्यजीव आणि निसर्ग. नागझिरा, नवेगाव, मेळघाट या जंगलांमध्ये काम करताना त्यांनी निसर्गाच्या परिसंस्थेची निगा कशी राखावी याचं सखोल मार्गदर्शन केलं. ङ्गहरणं जंगलात राहिली, वाघ बिबट्या जंगलात राहिले, कारण त्यांच्या अन्नसाखळीची काळजी घेतली, असं ते अत्यंत साधेपणाने सांगायचे. त्यांनी वेळोवेळी जल, जमीन आणि जंगल यांचं महत्त्व अधोरेखित केलं. झाडं कुठे आणि का लावावीत याचं वैज्ञानिक मार्गदर्शन करत त्यांनी पर्यावरणविषयक अनेक पत्रकं आणि साहित्य तयार केलं. त्यांचा दृष्टीकोन संपूर्णपणे समर्पित होता - पर्यावरण, विज्ञान, वाचन आणि समाजप्रबोधन यासाठी. प्रिसिजन वाचन अभियान यासारख्या उपक्रमांचं त्यांनी मनापासून कौतुक केलं होतं. हल्ली लोकांचं वाचन कमी झालंय, त्यामुळे असे उपक्रम खूप गरजेचे आहेत, असं त्यांनी नम्रपणे नमूद केलं.

आज आपण फक्त एक श्रेष्ठ लेखक गमावलेला नाही, तर एक विचारवंत, निसर्गाचा सखा, आणि वाचनसंस्कृतीसाठी आयुष्यभर जागृत राहणारा दीपस्तंभ हरवला आहे. चित्तमपल्ली सर, तुमचं कार्य, तुमचे विचार, तुमचं निसर्गप्रेम आणि वाचनावरचं अढळ प्रेम आम्हाला सतत प्रेरणा देत राहील. आपण लावलेली वृक्षांची मुळे आणि विचारांची बीजे दोन्ही ही पुढील पिढ्यांसाठी अढळ ठरतील.

## ग्रंथालयाचे स्वप्न अपूर्ण राहिले

सोलापूरच्या मातीत जन्मलेल्या श्री.चितमपल्ली यांचे प्राथमिक शिक्षण भारतीय चौकातील टी. एम.पोरे विद्यालयात तर महाविद्यलयीन शिक्षण दयानंद कॉलेजात झाले.त्यांनी ३६ वर्षे वनाधिकारी म्हणून सेवा बजावली. एक लाख नवीन शब्दाचा खजिना मराठी साहित्याला त्यांनी दिला. शाकाहारी असलेल्या अरण्यऋषींचा दिनक्रम पहाटे ४ वाजता सुरु होत असे व्यायाम व नामस्मरणानंतर ९ वाजता नाष्टा, वृत्तपत्रे व इतर वाचन,दुपारी १ते २ या दरम्यान भोजन, त्यानंतर ५ वाजेपर्यंत विश्रांती,सायंकाळी ५ ते ७ भेटीसाठी राखीव,रात्री १० वाजता भोजन व झोप लागेपर्यत वाचन.वेळेवर व्यायाम, शाकाहार,फळाहार व निसर्गाचे सानिध्य आदी बाबींचे तंतोतंत पालन हे अरण्यऋषींच्या ठणठणीत प्रकृतीचे रहस्य होते. पद्मश्री कै.मारुतीराव चितमपल्ली यांचे भव्य ग्रंथालय सुरू करण्याचे स्वप्न होते,त्यासाठी त्यांच्या परिवाराने राहत्या घराजवळ हेरिटेज मनिधारी एम्पायर सोसायटी येथे दुमजली इमारत बांधली आहे,त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.आगामी २-३ महिन्यात तेथे ग्रंथालय सुरू होणार होते,त्यापूर्वीच त्यांनी जगाचा निरोप घेतला आहे.त्यांच्याकडील ग्रंथ संपदा फार मोठी आहे,जवळपास दहा हजार ग्रंथापैकी अनेक दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यात त्यांनी लीहलेल्या अनेक पुस्तकांचा समावेश आहे.

**- दशरथ वडतिले, सोलापूर**



सोलापूर मध्ये २००६ साली ७९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले त्या संमेलनाचे अध्यक्ष होते त्यावेळी पहाटे तीन वाजता मारुती चित्तमपल्ली हे नागपूरहून सोलापूरला आले होते त्यांचं स्वागत पहाटे तीन वाजता पुष्पगुच्छ देऊन मी केले होते तसेच ज्यावेळेला ते सोलापूर मध्ये कायमचे रहिवासी म्हणून आले होते त्या दिवशीही पहिल्यांदा सोलापूरला आल्यानंतर त्यांच्या घरी जाऊन पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले होते त्यांना ज्या ज्या वेळी साहित्याची पुस्तके लागायची त्या त्यावेळी मी त्यांना घरी नेऊन पोहच करायचो रानावनातला माणूस त्यांचा थोडा काळ सहवास मला लाभला त्यांच्या जाण्याने साहित्यातला एक ऋषितुल्य व्यक्ती आपल्यातून गेली आणि साहित्यात पोकळी निर्माण झाली आहे महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली.

**- पद्माकर कुलकर्णी,**
अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर



सोलापूरचे सुपुत्र सोलापूरचे भूषण वनअधिकारी अरण्यऋषी व ज्येष्ठ लेखक आदरणीय मारुती चित्तमपल्ली यांचे आज निधन झाले . नुकतेच त्यांना केंद्र शासनाने पद्मश्रीने सन्मानित केले होते. मारुती चितमपल्ली यांनी प्राणी जीवन, वनजीवन अभ्यासक व निसर्ग विषयक भरपूर लिखाण ओघवत्या शैलीत केले आहे .त्यांनी मराठी भाषेसाठी नवीन एक लाख शब्द दिलेलेआहेत. त्यांना अनेक सन्मानित पुरस्कार लाभले होते . सोलापूर येथे आयोजित झालेले ७९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते .त्यांचे माझे कौटुंबिक स्नेह अत्यंत जिव्हाळ्याचे होते . त्यांच्या शुभहस्ते माझ्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले होते.त्यांच्या जाण्याने मत्स्यविश्व ग्रंथाचे काम अपूर्ण राहिले. वन्य अधिकारी म्हणून निवृत्त झालेल्या सेवानिवृत्तीचे सर्व पैसे त्यांनी भव्य दिव्य दुमिर्ळ ग्रंथाचे दालन उभा करण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहिले.

**- मारुती कटकधोंड**





साहित्यदेवी विधवा झाली. असे साहित्यभिष्माचार्य की, ज्यांना माणसांसह मुक्या प्राणिमात्रांच्या हृदयाची भाषा कळायची. एक संतऋषी मराठीभाषेला पोरके करुन गेले.

**- देवेंद्र औटी, कवी**

साहित्य सम्मेलनाच्या वेळी सराचे अध्यक्षीय भाषण ऐकण्याची सन्धी मला मिळाली मी त्या साहित्य सम्मेलनात सहभागी होते त्यामुळे मला त्याचे विचार ऐकावयास मिळाले हे भाग्यच म्हणावे लागेल सराना पद्मश्री पुरस्कार नुकताच मिळाला होता आज त्याना भावपूर्ण श्रध्दान्जली वहाताना खुप वाईट वाटत आहे त्याना भावपूर्ण श्रध्दान्जली त्याच्या आत्म्यास शान्ती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**- शोभना सागर**

## महत्त्वाचे...

### अतिक्रमण विभागाचे डोंगरे यांच्यासह ८ जणांवर दंडात्मक कारवाई

**सोलापूर, दि. १८ जून-**

महापालिकेच्या माय सोलापूर ॲप वरील नागरिकांच्या तक्रारींचा वेळेत निफ्टारा न केल्याप्रकरणी महापालिकेतील अतिक्रमण प्रतिबंधक विभागाकडे हेमंत डोंगरे, झोन कार्यालयाकडील अविनाश अंत्रोळीकर यांच्यासह आठ कर्मचारी अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी शंभर रुपये दंडाची कारवाई करण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी यासंदर्भात आदेश काढले आहेत. माय सोलापूर ॲपवर नागरीकांनी नोंदविलेल्या प्राप्त तक्रारीचा निपटारा मुदतीत न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिलेले आहेत. आपली तक्रार पोर्टल / माय सोलापूर ॲपवर नोंदविणेत आलेल्या तक्रारींचा आढावा घेतला असता, ८ अधिकारी / कर्मचारी यांच्या कडे त्यांच्या नांवापुढे दर्शविलेल्या विभागाशी निगडीत प्राप्त तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले आहे. ही बाब अत्यंत गंभीर व कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणारी आहे. यामुळे हेमंत डोंगरे (अतिक्रमण प्रतिबंधक विभाग), अविनाश अंत्रोळीकर (विभागीय कार्यालय क्र. १), प्रमोद गोविंदवार (नगर रचना), मधुसुदन पवार (विभागीय कार्यालय क्र. २), निलेश कंदलगावकर विभागीय कार्यालय क्र. ३), संजय पाटील (विभागीय कार्यालय क्र.५), अजिंक्य विपत (विभागीय कार्यालय क्र. ६), राहुल कांबळे(विभागीय कार्यालय क्र.०७) यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. आपली तक्रार पोर्टल / माय सोलापूर ॲपवरील नागरीकांच्या तक्रारीचे निराकरण मुदतीत न करणे, प्रलंबित ठेवणेच्या, केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्ययावत न करणे या कामकाजातील निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार प्रत्येकी १०० रुपये इतका आर्थिक दंड करण्यात येत आहे. यापुढे ॲपवरील तक्रार निवारणास विलंब झाल्यास प्रती दिवस १०० रुपये या प्रमाणे आर्थिक दंड आकारण्यात येईल असे आदेशात म्हटले आहे.

### किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण; दोघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १८ जून-**

किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ जून रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास भुलाबाई चौक येथे घडली.याप्रकरणी मुशरिफ रफिक शेख (वय-३६,रा.२ नंबर झोपडपट्टी विजापूर नाका) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून तौफिक जावीद बागवान (वय-३२) व महिबूब मकानदार (वय-२६,रा. मित्र नगर,शेळगी) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांचा लहान भाऊ याला शिवीगाळ करत असताना फिर्यादी यांनी तू का शिवीगाळ करत आहे असे विचारले. त्यावेळी तौफिक याने त्याच्या हातातील लाकडी काठीने मारून दुखापत केली व तसेच महिबूब याने फिर्यादीस खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ करत दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.



### चिंचोली काटी रोडवर टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**मोहोळ :** बीबी दारफळ चिंचोली काटी रोडवर या चिंचोली काटी एम आय डी सी त प्रिसीजन कंपनी समोर टेम्पोने रॉंग साइडला येवून मोटार सायकलला धडक दिल्याने एक जण ठार झाला. याबाबत मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार टेम्पो क्र डी.डी.०३/पी.९०९३ हा टेम्पो बीबी दारफळकडून चिंचोलीकाटी एम. आय. डी. सी. मधील अंतर्गत रोडने जात असताना हयगयीने, अविचाराने, रोडच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात विरुद्ध साईडला येवुन थरमॅक्स कंपनीकडे जात असलेले श्रीशैल तानाजी खवडे वय. ३२ रा. हियरगाराववाडी ताःउमरगा सध्या रा चिंचोली काटी यांच्या मोटारसायकल क. एम.एच.२५/बी.डी.१०९६ हिस जोरात धडक दिल्याने त्यात मोटार सायकल वरील इसम श्रीशैल तानाजी खवडे हा गंभीर जखमी होवून उपचारापुर्वीच मयत झाला. हा अपघात बुधवारी सकाळी ११ वाजणेच्या सुमारास घडला याबाबत टेम्पो चालक धर्मा शिवप्पा सर्जे रा. असंगी ता. जत जि.सांगली याचे विरूध्द मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास पो हे कॉन्स्टेबल आदलिंगे हे करित आहेत.



# जमीर लेंगरेकर यांची नंदुरबार जिल्हा सहआयुक्तपदी पदोन्नती

### उल्हासनगर, सोलापूर, पनवेल मनपात उल्लेखनीय काम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

कडेगावचे सुपुत्र, उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत असलेले जमीर लेंगरेकर यांची पदोन्नतीवर नंदुरबार येथे जिल्हा सह आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. श्री. लेंगरेकर यांचा प्रशासकीय सेवेतील प्रदीर्घ अनुभव आणि उल्हासनगर, पनवेल व सोलापूर महानगरपालिकेच्या विकासात त्यांनी दिलेले महत्त्वपूर्ण योगदान यामुळे ते या नवीन पदासाठी योग्य न्याय देतील. श्री.लेंगरेकर यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा कडेगाव व माध्यमिक शिक्षण रयतच्या महात्मा गांधी विद्यालयात झाले. डीएड करून कडेपूर कॉलेजमधून बीए पदवी घेतली. शिक्षक म्हणून शासकीय सेवेची सुरुवात केली. नोकरी करत स्पर्धा परीक्षेत यश मिळविले. त्यांच्या मागील कामगिरीचा अनुभव पाहता, नंदुरबारच्या विकासातही त्यांचे मोलाचे योगदान राहील अशी आशा आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



नि केवळ भव्य राममंदिर नाही, काशी, मथुरा नाही. या देशावरील पारतंत्र्याची, मानसिक गुलामगिरीची, मनामनातील हीन भावना दर्शविणारी शेवटची खूण संपेपर्यंत हा संघर्ष चालणार आहे आणि पूर्ण होणार आहे. लोकांना वाटतं की, लढा केवळ मंदिराचा आहे, तसा तो नाही. खरा लढा या भूभागावर विकसित झालेल्या संस्कृतीच्या संवर्धनाचा आहे, राष्ट्रनिर्माणाचा आहे, परम वैभवापर्यंत जाणाऱ्या प्रवासाचा आहे

**- अशोक सिंघल**
रामजन्मभूमी आंदोलनाचे प्रणेते,
पूर्व अ. भा. पदाधिकारी विश्व हिंदू परिषद

# पहिली ते पाचवीसाठी हिंदी तृतीय भाषा

## राज्य सरकारचा नवा आदेश जारी

◆ **मुंबई, १८ जून**

राज्य सरकारच्या वतीने इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत तृतीय भाषा सूत्र स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे आता मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये तिसरी भाषा हिंदी अनिवार्य नसली, तरी तिसरी भाषा विद्यार्थ्यांना निवडता येणार आहे. यासंबंधी काढण्यात आलेल्या जीआरनुसार मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषेऐवजी इतर



भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास, त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल.

अशा विद्यार्थ्यांना हिंदीऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास त्या भाषेच्या अध्यापन करण्याकरिता शिक्षक उपलब्ध करून देण्यात येणार आहे किंवा सदर भाषा ही ऑनलाईन पद्धतीने शिकवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा ही अनिवार्य असेल, असे शालेय शिक्षण विभागाच्या वतीने कळवण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

### हिंदी भाषा अनिवार्यच्या निर्णयाला विरोध

राज्यामध्ये मराठी, इंग्रजीबरोबरच हिंदी भाषा ही अनिवार्य करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर महाराष्ट्र निर्माण सेना, उद्धव ठाकरे यांचा पक्ष यासह महाराष्ट्रातील अनेक सामाजिक आणि राजकीय संघटनांनी या निर्णयाला विरोध केला होता. त्यानंतर अखेर या निर्णयात बदल करण्यात आला असून त्यानुसार आता हिंदी ही तृतीय भाषा असेल. मात्र विद्यार्थ्यांनी मागणी केल्यास इतर भाषेचा पर्यायदेखील निवडता येणार आहे.

## शाळेत हिंदी शिकवून दाखवाच : राज ठाकरे

◆ **मुंबई, १८ जून**

आपण हिंदू आहोत, हिंदी नाही, अशा शब्दात राज ठाकरे यांनी हिंदीची सक्ती महाराष्ट्रात का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. मराठी भाषेची सक्ती दक्षिण भारतातील राज्यात कराल का? असा प्रश्नदेखील त्यांनी विचारला आहे. आज भाषा सक्ती करत आहात, उद्या इतरही सक्ती होऊ शकते. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, मात्र काळ सोकावला जाईल, असेदेखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

या संदर्भात राज ठाकरे यांनी सरकारला दिलेले पत्र वाचून दाखवले. त्यांनी राज्यातील सर्व मुख्याध्यापकांना पत्र लिहिले असून राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे. या निर्णयामागे आयएएस लॉबी



असण्याची शंका त्यांनी उपस्थित केली आहे.

यासंबंधी महाराष्ट्रातील सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांना राज ठाकरे यांनी पत्र लिहिले आहे. राज ठाकरे यांनी म्हटले की, हिंदी भाषा सक्तीची करणार नाही, याबाबत आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बोलणे चालू होते. आपण हिंदीची सक्ती करणार नसल्याचे तसेच हा निर्णय मागे घेणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते, असा दावादेखील राज ठाकरे यांनी केला आहे. त्यामुळे आता राज्यातील सर्व मुख्याध्यापकांना आज माझे पत्र जाणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले. यावेळी मुख्याध्यापकांना लिहिलेले पत्र राज ठाकरे यांनी वाचून दाखवले. (वृत्तसंस्था)

## राज ठाकरेंचा आग्रह चुकीचा

### तीन भाषांचे सूत्र महाराष्ट्रातही : मुख्यमंत्री

◆ **पिंपरी चिंचवड, १८ जून**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेला दोन भाषांचा आग्रह चुकीचा असल्याचे ठणकावून सांगितले. संपूर्ण देशात नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत (एनईपी) तीन भाषांचे सूत्र लागू असेल, तर महाराष्ट्र दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही, असे ते म्हणाले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या हस्ते बुधवारी पिंपरी चिंचवड येथील संतपीठाचे उद्घाटन झाले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना फडणवीस यांनी हिंदीच्या सक्तीवर राज ठाकरे यांनी घेतलेला आक्षेप जोरकसपणे फेटाळून लावला. ते म्हणाले, माझी राज ठाकरेंशी चर्चा झाली. त्यांचा आग्रह आहे की, दोनच भाषा असल्या पाहिजेत. तिसरी भाषा असू नये. मी त्यांना हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, केंद्र सरकारने विचारपूर्वक एनईपीमध्ये तीन भाषांचे सूत्र आणले आहे. देशभरात तीन भाषांचे सूत्र असेल, तर महाराष्ट्रात दोन भाषांच्या सूत्रावर जाऊ शकत नाही. एनईपी संपूर्ण देशासाठी आहे. तामिळनाडूने तीन भाषांच्या सूत्राला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले; पण कोर्टाने त्यांची याचिका फेटाळली आहे. (वृत्तसंस्था)

### भारतीय भाषांचा तिरस्कार योग्य नाही

आपण सर्वजण इंग्रजीचा पुरस्कार करतो आणि भारतीय भाषांचा तिरस्कार करतो, हे योग्य नाही. भारतीय भाषा इंग्रजीहून चांगल्या आहेत. इंग्रजी ही व्यवहार्य भाषा झाली आहे हे ठीक आहे. पण नव्या शैक्षणिक धोरणामुळे मराठीला ज्ञानभाषा बनवण्याचा मार्ग खुला झाला आहे. आता आपण अभियात्रिकी, वैद्यकीय, एमबीए शिक्षणही मराठीतून दिले जात आहे. म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणामुळे मराठीला वैश्विक भाषा, ज्ञान भाषा व अर्थकारणाची भाषा बनण्याचे दालन उघडे झाले आहे. महाराष्ट्र सरकारने ते स्वीकारले आहे. त्यामुळे अशा प्रकारचा वाद योग्य नसल्याचे मला वाटते, असे फडणवीस म्हणाले.

## तिसऱ्या देशाची मध्यस्थी अमान्य

◆ **टोरंटो, १८ जून**

भारत-पाकिस्तानमधील चर्चेत तिसऱ्या देशाची मध्यस्थी कदापि मान्य नव्हती, भविष्यातदेखील ती मान्य राहणार नाही. भारत दहशतवादाकडे प्रॉक्सी वॉर म्हणून पाहणार नाही तर युद्धाची कृती म्हणून पाहेल आणि ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरूच आहे. यापुढे अतिरेकी हल्ला भारताविरोधात युद्ध मानले जाईल आणि दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले जाणार असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना फोनवरील चर्चेदरम्यान सांगितले.

जी-७ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी मोदी कॅनडात गेले, तिथे ट्रम्प यांच्याशी त्यांची भेट होणार होती. मात्र ट्रम्प आधीच मायदेशी परतले, पर्यायाने दोन्ही नेत्यांची भेट होवू शकली नाही. मोदी आणि ट्रम्प यांची फोनवर ३५ मिनिटे चर्चा झाली यासंदर्भातील तपशील परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्त्री यांनी बुधवारी सादर केला. यात म्हटले की, जी-७ शिखर परिषदेतून मायदेशी परतल्यावर ट्रम्प यांनी मोदी यांना फोन केला आणि परिषद आटोपल्यानंतर अमेरिकेत येण्याची विनंती केली, मात्र त्यांनी नियोजित कार्यक्रमांचे कारण नकार दिला. यावेळी मोदी यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानशी झालेल्या चर्चेत कोणत्याही तिसऱ्या देशाची मध्यस्थी नव्हती. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### ‘खोल खोल दुष्काळ डोळे’ साठी युवा साहित्य पुरस्कार

**नवी दिल्ली :** साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचे समजले जाणारे साहित्य अकादमी ‘युवा’ व ‘बाल’ पुरस्कारांची घोषणा बुधवारी करण्यात आली. महाराष्ट्रातून मराठी आणि सिंधी भाषेतील साहित्यिकांची निवड युवा साहित्य अकादमी पुरस्कारासाठी झाली आहे. मराठी भाषेसाठी प्रदीप कोकरे या युवा साहित्यिकाला ‘खोल खोल दुष्काळ डोळे’ या कादंबरीसाठी आणि सिंधी भाषेसाठी मंथन बचाणी यांच्या ‘पांधीअड़ो’ या कविता संग्रहाची ‘युवा’ साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ‘बाल’ साहित्य अकादमी पुरस्कारासाठी बालसाहित्यकार कवी डॉ. सुरेश सावंत यांची त्यांच्या ‘आभाळमाया’ या कविता संग्रहासाठी निवड करण्यात आली आहे. साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेत बुधवारी झालेल्या बैठकीत साहित्य अकादमीच्या २०२५ साठी ‘युवा’ व ‘बाल’ साहित्य पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. देशभरातील एकूण २३ युवा लेखकांची निवड युवा साहित्य अकादमी पुरस्कारासाठी करण्यात आली. बाल साहित्य अकादमी पुरस्कारासाठी २४ बालसाहित्यकारांची निवडीची घोषणा झाली आहे. ‘युवा’ व ‘बाल’ साहित्य पुरस्कारांचे स्वरूप मानचिन्ह आणि ५० हजार रुपये रोख असे आहे. मराठी साहित्यातील संवेदनशील आणि होतकरू युवा लेखक प्रदीप कोकरे यांच्या ‘खोल खोल दुष्काळ डोळे’ या कादंबरीला २०२५ मधील मराठी भाषेसाठीचा युवा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. ही कादंबरी तरुण पिढीच्या भावविश्वाचे प्रामाणिक आणि मार्मिक चित्रण करते. युवा पुरस्कारासाठी मराठी भाषेतील निवड साहित्य मंडळामध्ये ख्यातनाम साहित्यिक प्रो. अविनाश कोल्हे, इंद्रजित भालेराव व डॉ. रणधीर शिंदे यांचा समावेश होता.

## चारित्र्याच्या संशयावरुन पत्नीची हत्या

### पंढरपूर तालुक्यातील टाकळी येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१८जून -**

चारित्र्यांच्या संशयावरुन नवऱ्याने बायकोची निर्घुण हत्या केली. बायकोची हत्या करताना झालेल्या झटापटीत नवरा देखील गंभीर जखमी झाला आहे. पंढरपूर तालुक्यातील टाकळी येथे बुधवारी (ता.१८) पहाटे ही घटना घडली. मृत पावलेल्या महिलेचे नाव पल्लवी तानाजी उबाळे असे आहे. या घटनेबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपुरच्या टाकळी मध्ये तानाजी उबाळे हे आपल्या कुटुंबीयांसोबत राहतात. तानाजी बायकोच्या चारित्र्यावर सतत संशय घेत होता.यावरून दोघांमध्ये नेहमीच कडाक्याचे भांडण होत होते. बुधवारी (ता.१८) पहाटे याच कारणावरून दोघांमध्ये पुन्हा भांडण झाले. संतापलेल्या तानाजीने आपल्या बायकोवर धारधार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात त्याची पत्नी पल्लवी उबाळे या गंभीर जखमी झाल्या. जास्त रक्तस्राव झाल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान या हल्ल्यावेळी पल्लवी यांची दोन लहान मुलं त्यांना वाचवण्यासाठी पुढे आली. त्यावेळी तानाजीने त्यांच्यावर देखील वार केले. तानाजी हल्ला करत असताना पल्लवीने देखील प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या झटापटीमध्ये तानाजी देखील गंभीर जखमी झाला. तानाजी उबाळे आणि त्याची दोन्ही मुलं गंभीर जखमी असून त्यांच्यावर पंढरपूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच पंढरपूर तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. पल्लवी उबाळेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहे.



## तीन हजारांत वार्षिक फास्टॅग

● **फास्टॅगची वार्षिक पासची योजना** ● **भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा**

◆ **नवी दिल्ली, १८ जून**

केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी टोलप्लाजावरील वाहतुकीची कोंडी तसेच वादविवादाच्या घटना कमी करत वाहतूक सुरळीत करण्यासाठी फास्टटॅगची तीन हजार रुपयांच्या वार्षिक पासची ऐतिहासिक अशी योजना आज जाहीर केली.

खाजगी वाहनांसाठी असलेल्या या योजनेचा शुभारंभ १५ ऑगस्ट २०२५ पासून होणार आहे, याकडे लक्ष वेधत गडकरी म्हणाले की, ज्या दिवशीपासून हा पास जारी केला जाईल त्या तारखेपासून एक वर्षापर्यंत वा २०० प्रवासफेऱ्या यातील जे आधी येईल त्या तारखेपर्यंत हा पास लागू राहणार आहे. खाजगी वाहनांसाठी एक टोल प्लाजा ओलांडल्यावर प्रवासाची एक फेरी समजली जाणार आहे.



६० किमीच्या आतील टोलप्लाजावरुन वाहनचालकांना दीर्घकाळापासून उदभवणाऱ्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी ही योजना परिणामकारक ठरणार आहे, असे स्पष्ट करत गडकरी यांनी म्हटले की, या वार्षिक पासमुळे टोलचे पैसे वाहनधारकांना सहजपणे देता येणार आहे. गैरव्यावसायिक वाहनांसाठी म्हणजे कार, जीप आणि व्हॅनसाठी ही योजना लागू राहणार आहे. या नव्या योजनेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार आहे. (तभा वृत्तसेवा)

FASTag
Easy to Cruise
क्यूआर कोड स्कॅन करा आणि बघा विशेष व्हिडीओ

### योजनेची वैशिष्ट्ये

- १५ ऑगस्ट २०२५ पासून योजना लागू
- कार, जीप, व्हॅन या खासगी वाहनांसाठी योजना
- प्रत्येक टोलवरून येणे-जाणे एक फेरी मानली जाईल
- २०० फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर पुन्हा रिचार्ज मारावा लागेल
- ही योजना राष्ट्रीय महामार्गांवर लागू होईल
- आता टोलवर वाहनाला थांबण्याची गरज नाही

## न्यायालयांत ६४ लाखांहून अधिक खटले प्रलंबित!

**नवी दिल्ली, १८ जून**

भारतात इतर देशांतील न्यायालयांपेक्षा अधिक काळ कामकाज होते. तरीही प्रलंबित खटल्यांची संख्या वाढतच आहे. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांत दरवर्षी २३ लाखांहून अधिक खटले सुनावणीला येतात. तरीही ६४ लाखांहून अधिक खटले वेगवेगळ्या न्यायालयांत प्रलंबित आहेत. सर्वोच्च न्यायालयाने अलीकडेच प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, अशी विचारणा न्यायालयांना केली आहे. उन्हाळी सुट्या कमी करणे, शनिवारी काम काज सुरू ठेवणे, असे पर्याय न्यायालयाने सुचवले आहेत.

### न्यायाधीशांवर कामाचा मोठा दबाव

प्रलंबित खटल्यांसंदर्भात सर्व पैलूंचा अभ्यास झाला पाहिजे. भारतातील न्यायाधीशांवर कामाचा खूप दबाव आहे. सुटीही गरजेची असते. इतर देशां ध्ये एका न्यायाधीशामागे प्रलंबित खटल्यांची संख्या १० पेक्षाही कमी आहे, अशी माहिती दिल्लीच्या राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या प्रो. ऋतू गुप्ता यांनी दिली

## इस्त्रायलमुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर

### रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाचे निवेदन; इराणवर हल्ला, आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन

**मॉस्को/तेहरान, १८ जून**

इस्त्रायलकडून इराणच्या शांततापूर्ण आण्विक तळांवर होणारे हल्ले हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन आहे. यामुळे जागतिक सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे. इस्त्रायलच्या आक्रमकतेुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असून आण्विक संघर्ष होण्याची परिस्थिती असल्याचा इशारा बुधवारी रशियाकडून देण्यात आला. जी-७ देशांच्या नेत्यांनी कॅनडात आयोजित शिखर परिषदेत इस्त्रायलकडून इराणवर होणाऱ्या हल्ल्याला समर्थन दिले. त्यांनी इस्त्रायलाल स्वसंरक्षणाच अधिकार असल्याचे संयुक्त निवेदन जारी केले होते. त्यानंतर रशियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने निवेदन जारी करून आपली भूमिका स्पष्ट करीत म्हटले की, इस्त्रायलच्या हल्ल्यांनी जगाला आण्विक युद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे. इराणवर होणाऱ्या हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. इस्त्रायलला ज्याप्रमाणे स्वसंरक्षणाचा अधिकार आहे, तसाच इराणलादेखील स्वतःच्या बचावाचा अधिकार आहे. इस्त्रायलच्या आक्रमकतेुळे जग आता तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहे.



## सांगोल्यातून आळंदी ते पंढरपूर पायी वारीसाठी २५० वारकरी रवाना

**तभा वृत्तसेवा । दिपक भाकरे**
**सांगोला,दि.१८ जून-**

श्री विश्वमाऊली ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी सकल वारकरी समाज सेवा संस्था भोसे-सांगोला दिंडीचे २५० वारकरी बुधवार दि.१८ जून रोजी आळंदीकडे रवाना झाले. सदर दिंडीचे हे २५ वे वर्ष आहे.

आषाढी वारीसाठी श्री विश्वमाऊली ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे पंढरपूरकडे गुरुवार दि.१९ जून रोजी आळंदीतून प्रस्थान होणार आहे. त्यासाठी सांगोल्यातून आळंदी ते पंढरपूर पायी वारीसाठी लोहार गल्ली येथील किरण सपाटे यांच्या दुकानासमोर सकल वारकरी समाज सेवा संस्था भोसे-सांगोला दिंडीचे २५० वारकरी एकत्र येऊन रवाना झाले.



यावेळी वाहनाचे पूजन नगराध्यक्ष राणीताई माने यांच्या हस्ते करण्यात आले. मंगळवेढा तालुक्यातील भोसे, नंदेश्वर, मरवडे, सांगोला तालुक्यातील पाचेगाव, वासुद (अ), एखतपुर, सांगोला शहर या भागातील १२५ पुरुष व १२५ महिला वारकरी यांचा सदर दिंडीमध्ये समावेश आहे. तसेच भोजन व्यवस्थेचे साहित्य व वारकऱ्यांचे साहित्य ठेवण्यासाठी १ आयशर टेम्पो, १ ट्रक व पाण्यासाठी १ टँकर सोबत आहे.

सदर दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी सकल वारकरी समाज सेवा संस्था भोसे-सांगोला दिंडीचे अध्यक्ष लक्ष्मण निंबाळकर, उपाध्यक्ष आनंद सपाटे, नारायण हसबे, खजिनदार कालिदास पाटील, अरुण काळे, नागेश दाते, व्यवस्थापक बाळासाहेब क्षीरसागर, दिंडी चालक महादेव घाडगे, अलका भंडारे हे परिश्रम घेत आहेत.

## संत तुकारामांच्या पालखीचे पंढरीच्या दिशेने प्रस्थान

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पादुका पूजन, देहूत वारकऱ्यांचा मेळा

**पुणे, दि. १८ जून -**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीने आज हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत आषाढी वारीसाठी पंढरीच्या दिशेने प्रस्थान केले. देहू गावापासून निघालेल्या या पालखीत विठ्ठल-रखुमाईच्या भेटीची ओढ असणाऱ्या हजारो वारकऱ्यांचा समावेश आहे.

संत तुकाराम महाराज यांचा यंदाचा हा ३४० वा पालखी प्रस्थान सोहळा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते संत तुकारामांच्या पादुकांचे पूजन झाले. त्यानंतर तुकोबांची पालखीचे पंढरीच्या दिशेने प्रस्थान झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते. तत्पूर्वी, येथील मुख्य मंदिराजवळील शिळा मंदिराच्या समोर वारकऱ्यांनी फुगडी खेळण्याचा आनंद लुटला. यावेळी टाळ- मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकोबांचे नामस्मरण केले जात होते. श्री संत तुकाराम महाराज संस्थानने यंदाच्या सोहळ्यासाठी ३ बैलजोड्या खरेदी केल्या आहेत.



मुख्यमंत्र्याच्या हस्ते पादुका पूजन होत असताना पोलिसांनी वारकऱ्यांच्या दिंड्या काहीवेळ रोखून धरल्या होत्या. यामुळे वारकरी चांगलेच संतप्त झाले. त्यांची पोलिसांशी शाब्दिक चकमक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या घटनेची पुष्टी करत दिंड्या थांबवण्याचे कारण सांगितले. वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी हा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले. पोलिसांनी ज्या प्रकारे सुव्यवस्था ठेवली पाहिजे, त्याच प्रकारे ठेवली आहे. एकावेळी सर्वांना सोडले तर चेंगराचेंगरीची शक्यता होती. वारकऱ्यांची सुरक्षा आमच्यासाठी सर्वात महत्वाची आहे. वारकरी शिस्तप्रिय असून तो अर्धा तास थांबावे लागले काय किंवा तासभर थांबले काय अशा गोष्टींची चिंता करत नाही, असे ते म्हणाले.

**आज मुक्काम इनामदार वाड्यात**

प्रमुख दिंड्याच्या उपस्थित व वारकरी भाविक भक्तांसह हरिनामाच्या गजर करत टाळ-मृदंगाच्या निनादात, गरुड, टक्के यांच्या समवेत सायंकाळी ५ वाजता पालखी मंदिर प्रदक्षिणा घालून मुख्य मंदिरातून प्रस्थान होईल. सायंकाळी ६.३० वाजता पालखी प्रस्थान सोहळा श्री तुकोबारायांच्या आजोळी म्हणजे इनामदारसाहेब वाड्यात पहिल्या मुक्कामासाठी विसावणार आहे.

### पुण्यात अपघातात वारकऱ्याचा मृत्यू

पिंपरी चिंचवडमध्ये बुधवारी झालेल्या एका अपघातात एका वारकऱ्याचा मृत्यू झाला. देहू - आळंदी रोडवर ही घटना घडली. त्यात क्रेनने पायी जाणाऱ्या एका वारकऱ्याला चिरडले. हा वारकरी संत तुकोबांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी निघाला होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# 'दिव्य'त्वाची प्रचीती...

दक्षिण भारत हे बुद्धिबळाचे उगम स्थान आहे. अगदी प्राचीन काळात देवलोकापासून ते राजेशाहीपर्यंतच्या काळात देवलोक तसेच राजे-महाराजे बुद्धिबळाचे डाव खेळत होते. पटावरील राजा, राणी, हत्ती, उंट, प्यादांचा खेळ जितका मनोरंजक तितकाच क्लिष्ट आहे. पण प्रतिस्पर्ध्याला शह-काटशह देण्यासाठी क्लृप्त्या, योजना आखाव्या लागतात, त्यासाठी बुद्धीचा योग्य वापर करावा लागतो. त्यामुळे खेळताना थोडी गंमतच वाटते. बुद्धिबळ खेळाची हीच संस्कृती आजपर्यंत देशभरातच नव्हे, तर जगभरात पसरली आहे. याच परंपरेची जोपासना करत भारताच्या पाच वेळचा विश्वविजेता विश्वनाथन् आनंद, डोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद, अरविंद चिदम्बरम् आणि आता नागपूरच्या महिला ग्रॅण्डमास्टर दिव्या देशमुखने जागतिकस्तरावर वर्चस्व गाजविले आहे. आधी विश्वनाथन् आनंदने रशियाचा दिग्गज गॅरी कास्पारोव्हचे बुद्धिबळ साम्राज्य उद्ध्वस्त करत पाच वेळा विश्वविजेतेपदाचा मान मिळविला व जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानही मिळविले होते. आज आनंद आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचा उपाध्यक्ष आहे. तो नवीन युवा खेळाडूंचा आदर्श आणि मार्गदर्शकही आहे. आनंदच युवा खेळाडूंना प्रोत्साहन देत असतो. वेळोवेळी मार्गदर्शन करत असतो. दिव्या, गुकेश, अरविंदचे अलिकडील यश हे त्याचेच द्योतक आहे. अलिकडेच प्रथम विश्व मानांकित ३४ वर्षीय मॅग्नस कार्लसनने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा जिंकली असली तरी भारताच्या १९ वर्षीय डी. गुकेशने या स्पर्धेदरम्यान सातव्या फेरीत पराभवाचा हादरा दिला होता. त्यामुळे कार्लसन घाबरला होता, तेवढाच संतापला होता. म्हणून त्याने पराभव होताच पटावर मूठ आदळून आपला राग व्यक्त केला होता. नंतर सावरला व जिंकला, परंतु एका भारतीय ग्रॅण्डमास्टरने आपल्याला आव्हान दिल्याचे शल्य कार्लसनच्या मनाला बोचत होते आणि असेलही. तसेच दिव्या देशमुखनेही नुकतेच लंडनमध्ये आयोजित जागतिक रॅपिड व ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत अंतिम फेरीत अव्वल विश्वमानांकित चीनच्या यौ यिफानला पराभवाचा धक्का देऊन खळबळ उडविली. जागतिक कनिष्ठ गटातील अव्वल क्रमांकाची बुद्धिबळपटू दिव्या देशमुखने या जागतिक स्पर्धेत तीन पदके पटकावण्याची चमकदार कामगिरी केली. यात वैयक्तिक रूपात कांस्य, रॅपिड सांघिक गटात रौप्य, तर ब्लिट्झ सांघिक गटात कांस्यपदक मिळाले. तल्लख बुद्धिमत्तेच्या १९ वर्षीय दिव्या देशमुखने नागपूरचाच नाही, तर भारताचा जागतिकस्तरावर लौकिक वाढविला आहे. महिला ग्रॅण्डमास्टर (२०२१) व आंतरराष्ट्रीय मास्टर (२०२३) असलेल्या दिव्याने यापूर्वी ऑलिम्पियाडमध्ये तीन वेळा सुवर्णपदक जिंकले आहे, तसेच तिने आशियाई बुद्धिबळ स्पर्धेचे, जागतिक कनिष्ठ गट बुद्धिबळ तसेच जागतिक युवा बुद्धिबळ स्पर्धेचेही विजेतेपद पटकावले आहे. जागतिक रॅपिड व ब्लिट्झ स्पर्धेतील यशामुळे आज दिव्याचे फिडे रेटिंग गुण २४६३ वर पोहोचले आहे. ४५ व्या बुडापेस्ट बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताला सुवर्णपदक जिंकून दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्य सरकारने तिचा १ कोटी रुपयांचा रोख पुरस्कार देऊन गौरव केलेला आहे.

दिव्याला अगदी लहानपणापासून बुद्धिबळ खेळाची आवड असून पेशाने डॉक्टर असलेल्या जितेंद्र देशमुख व नम्रता देशमुख यांनी लेकीच्या खेळाची आवड जोपासली. तिला काय हवे नको, हे सर्व बघितले. तिला खेळासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. स्पर्धेसाठी प्रवासात तिची आबाळ होणार नाही याची काळजी घेतली. मराठमोळ्या कुटुंबातील दिव्याने आई-वडिलांच्या केलेल्या कष्टाचे, त्यागाचे चीज केले आणि जागतिक स्तरावर उंच झेप मारली. दिव्याचे हे यश बघून तिच्या आई-वडिलांनाही अभिमान वाटत असावा, हे स्वाभाविक आहे. गत मार्च महिन्यातही चेन्नईच्या ग्रॅण्डमास्टर अरविंद चिदम्बरम्ने अशीच कमाल केली आणि प्राग बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद जिंकून सर्वांचे लक्ष वेधले. पितृछत्र हरपलेल्या अरविंदची बुद्धिबळ खेळातील आवड त्याच्या आईने काबाडकष्ट करून जोपासली व त्याला प्रोत्साहन दिले. तामिळनाडू, दक्षिण भारत हे बुद्धिबळाचे उगमस्थान आहे, बुद्धिबळाचे ऊर्जा केंद्र आहे. तीच चैतन्यमयी संस्कृती मध्य भारतातील विदर्भापर्यंतही पसरली आहे, त्यामुळे आजपर्यंत विदर्भातील खेळाडूंनी जागतिक स्तरावर आपल्या बुद्धिबळ चातुर्याची छाप सोडलेली आहे. विदर्भाच्या या प्रतिभावान किशोरवयीन दिव्याच्या अलौकिक कामगिरीपूर्वी नागपूरच्या आंतरराष्ट्रीय मास्टर अनुप देशमुख, रौनक साधवनी, निहांश खोडे, आकाश ठाकूर, अमरावतीच्या स्वप्निल धोपाडेनेही आंतरराष्ट्रीय स्तरावर घवघवीत यश संपादन केले होते. १९९८ मध्ये अनुपने भारतीय बुद्धिबळ संघात स्थान मिळविले व त्यानंतर त्याने एलिस्टा ऑलिम्पियाडमध्येही भारताचे प्रतिनिधित्व केले. तो ब्राझीलमध्ये युथ ऑलिम्पिकमध्येही भारताकडून खेळला व १९९९ मध्ये त्याला आंतरराष्ट्रीय मास्टर उपाधी मिळाली. २०१६ मध्ये स्वप्निलने ग्रॅण्डमास्टर उपाधी प्राप्त केली. ग्रॅण्डमास्टर होणारा हा पहिला वैदर्भी बुद्धिबळपटू ठरला. त्याने २०१७ मध्ये आईसले ऑफ मॅन आंतरराष्ट्रीय मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले होते. रौनक साधवानी याने वयाच्या १३ व्या वर्षी ग्रॅण्डमास्टर उपाधी मिळविली. तो भारताचा ६५ वा ग्रॅण्डमास्टर ठरला. आकाश ठाकूरने फिडे मास्टर विजेतेपद पटकावले होते. त्याने ४४ व्या फिडे बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये अँगोला महिला बुद्धिबळ संघाचा प्रशिक्षक म्हणून कामगिरी केली आहे.

मुळात खेळाडूला घरूनच प्रोत्साहन मिळायला हवे. एखाद्या खेळात आपले करीअर घडवण्यासाठी खेळाडूला त्याच्या पालकांनीच प्रोत्साहन द्यायला पाहिजे. याशिवाय राज्य सरकार तसेच केंद्र सरकारचाही पाठिंबा असणे तितकेच महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरणच आहे आहे की, स्वस्थ आणि तंदुरुस्त भारत घडावा. त्यामुळेच त्यांनी खेलो इंडिया, फिट इंडिया, फिट इंडिया सायकल रॅलीसारखे उपक्रम राबवण्यास सुरुवात केली. तसेच आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याची परंपरा सुरू केली. मोदी सरकार केवळ स्पर्धेत यश संपादन करून आल्यानंतरच नव्हे, तर स्पर्धेपूर्वी खेळाडूंच्या तयारीकडे तसेच त्यांच्या विदेश प्रवासाची व्यवस्था करण्यापर्यंतची सोय करत आहे. शिवाय खेळाडू, संघ ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक, डेफलिम्पिक आणि जागतिक स्पर्धेला विदेशात जाण्यापूर्वी आणि स्पर्धेहून यश संपादन करून आल्यानंतर खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या खेळाडूंशी संवाद साधतात, खेळाडूंना आपुलकीने त्यांच्या अडचणी विचारतात, त्या दूर करतात. त्यामुळे आज ऑलिम्पिक तसेच पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंच्या पदक संख्येत मोठी वाढ झालेली दिसत आहे. यापूर्वी कोणत्याही सरकारकडून खेळाडूंना असे प्रोत्साहन मिळाले नाही. कॅण्डिटेड स्पर्धा जिंकून भारताच्या डी. गुकेशने जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत खेळण्याची पात्रता सिद्ध केली तेव्हाही पंतप्रधान मोदींनी शुभेच्छा दिल्या होत्या. सिंगापूर येथे झालेल्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत गुकेशने तत्कालीन विश्वविजेता चीनच्या डिंग लिरेनवर मात करून अजिंक्यपदाचा मान मिळविला. भारताचा डी. गुकेश सर्वांत युवा विश्वविजेता ठरल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी त्याचे खूप कौतुक केले. त्याला आपल्या निवासस्थानी बोलावून त्याचे कौतुक केले व शाब्बास म्हणत पाठ थोपटली. गत वर्षी बुडापेस्टमध्ये ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाने दुहेरी सुवर्णपदक जिंकले, तेव्हाही पंतप्रधान मोदी यांनी संघाच्या या ऐतिहासिक कामगिरीची मुक्तकंठाने प्रशंसा केली. एकंदरीत मोदी सरकार हे सर्वसामान्यांचे, श्रमिकांचे, शेतकऱ्यांचे, उद्योजकांचे तसेच खेळाडूंचेही आहे. क्रीडा क्षेत्राला असेच प्रोत्साहन मिळत राहिले, तर एक दिवस भारत क्रीडा महासत्ता नक्कीच होईल. तेव्हा विदर्भातील बुद्धिबळपटूंनीच नव्हे, तर इतर खेळांच्या खेळाडूंनी या दिग्गजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आणि राज्य व केंद्र सरकारकडून मिळत असलेल्या सोयी-सुविधांचा फायदा घेत क्रीडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी सोबतच स्वत:चा आणि देशाचा नावलौकिक करावा.

## तंत्रवेध

# क्रांतिकारी शोधाची प्रेरक कहाणी

**डॉ. दीपक शिकारपूर**

माहिती तंत्रज्ञान म्हणजेच 'आयटी'ची गंगा भारतात अवतीर्ण झालेल्याला पंचवीस एक वर्षे आणि ती सर्वसामान्य नागरिकांच्या प्रत्यक्ष अंगणी येऊनही आजघडीला एक दशकाहून जास्त काळ लोटला आहे. ही मूळची संगणकीय क्रांती असली तरी तिचा खरा प्रसार (आणि प्रभावही) प्रत्येकाच्या हाती स्मार्टफोन आल्यापासून खऱ्या अर्थाने जाणवू लागला आहे. इंटरनेटमुळे जग लहान झाले असे म्हणता येईल. दूर देशातील (परिचित तसेच अपरिचितही) व्यक्तींशी काही मिनिटांमध्ये वैयक्तिक, व्यापारी आणि सामाजिक संबंध जोडणे शक्य झाले आहे ते यामुळेच. ज्ञान आणि माहितीचा प्रसार पुस्तके, पैसे आणि अंतराच्या सीमा ओलांडू शकला तो इंटरनेटमुळेच. आजकाल डिजिटल जमाना आहे. सगळीकडे ऑनलाईन पेमेंट होते. दूध, भाजीपाल्यापासून पेट्रोल भरेपर्यंत आजकाल सगळीकडे क्यूआर कोडचा वापर करून पैसे देता येतात. फक्त एक कोड स्कॅन करून अवघ्या काही सेकंदांमध्ये पेमेंट पूर्ण करता येते. पण याचा इतिहास रंजक आहे.

सॅरेनडिपिटी म्हणजे अचानक आणि अनपेक्षितपणे चांगली गोष्ट घडणे; जी आपण शोधत नसलो तरी आपोआप समोर येते. हा शब्द ग्रीक कथेतील तीन राजकुमारांवर आधारित आहे. त्यांनी काही त्रुटींमध्ये आणि अनपेक्षित परिस्थितींमध्ये चांगली गोष्ट शोधली होती. सॅरेनडिपिटी म्हणजे एक प्रकारचा 'चांगल्या नशिबाचा योग' असतो, जिथे घटनांच्या संयोगामुळे काही तरी अनुकूल आणि लाभकारी घडते. सॅरेनडिपिटी म्हणजे एखाद्या संशोधकाला नकाशावर विशिष्ट नोंद करत असताना काहीतरी अनपेक्षित, पण अत्यंत महत्त्वाचा शोध लागणे. याला आपण 'शोधाच्या नशिबी' किंवा 'आश्चर्यकारक संयोगाचे परिणाम' म्हणू शकतो. सॅरेनडिपिटी आपल्याला सांगते की, अनेक वेळा आपले जीवन आपल्या नियोजित मार्गानुसार जात नसले तरी अपघाती आणि अनपेक्षित घटनांमुळे आपल्याला अधिक चांगले आणि मौल्यवान अनुभव मिळू शकतात. यामुळे आपल्या जीवनाला आश्चर्य, आनंद आणि नवा दृष्टिकोन मिळतो. असे म्हणतात की श्रीखंडाचा शोध असाच नासलेल्या दुधाचे काय करायचे या प्रश्नातूनच लागला. जपानच्या एका शांत कोपऱ्यात, १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला मासाहिरो हारा हा इंजिनीअर बारकोड्सवर उपाय शोधत होता. ते खूप कमी डेटा साठवू शकत होते. जग गतीने बदलत होते पण हे छोटे पट्टे त्यानुसार गती पकडू शकत नव्हते. मासाहिरो 'डेंसो वेव्ह' या ऑटो इंडस्ट्रीतील एका कंपनीत काम करत होता, जिथे गती आणि अचूकता हेच सर्व काही होते. त्याला काही तरी चांगले, स्मार्ट हवे होते. एके रात्री, गो या प्राचीन पांढऱ्या आणि काळ्या दगडांच्या बोर्ड गेमसह विश्रांती घेत असताना त्याला प्रेरणा मिळाली. त्या गेमची



परत परतची जटिलता, पॅटर्न्समधून अर्थ कसा उभा राहतो ही माहिती अशा प्रकारे साठवता येईल का, असा विचार त्याच्या मनात घोळू लागला. तीच ती भावना होती. त्यानंतर घडली एक शांत क्रांती. मासाहिरो आणि त्याच्या टीमने एक नवीन कोड तयार केला. त्यामुळे बारकोड सुधारला. त्याची संपूर्ण पुनर्रचना करता येऊ लागली. तो कोणत्याही दिशेने वाचता येऊ शकत होता. तुटला तरी स्कॅन केला जाऊ शकत होता आणि शंभरपट अधिक माहिती साठवू शकत होता. त्यांनी त्याला 'कोड' असे नाव दिले. पुढे इतर महान शोधांप्रमाणेच तो प्रचलित झाला.

हा कोड वाहन उद्योगातील भागांचे ट्रॅकिंग करण्यासाठी डिझाईन करण्यात आला होता. मासाहिरो हारा यांना गो या पारंपरिक बोर्ड गेमच्या काळ्या आणि पांढऱ्या पद्धतीतून प्रेरणा मिळाली आणि त्यांनी माहिती संग्रहित करण्यासाठी एक नवी पद्धत शोधली. आज आपण स्मार्टफोन कॅमेरा वापरून किंवा कोड रीडर ॲप वापरून क्यूआर कोड स्कॅन करू शकतो. स्कॅन केल्यानंतर वेबसाईट किंवा इतर प्रकारची कोडमधील माहिती डिव्हाईसवर उघडते. आजकाल कोडचा वापर ऑनलाईन पेमेंट, वेबसाईटवर जलद प्रवेश, माहिती साठवणूक आणि इतर अनेक कामांसाठी केला जातो. कोड पारंपरिक बारकोडपेक्षा अधिक माहिती साठवू शकतो. त्यामुळे वेबसाईट लिंक, संपर्क माहिती आणि इतर संबंधित तपशील साठवता येतात. कोड स्कॅन करणे हा स्मार्टफोनद्वारे माहिती मिळवण्याचा जलद आणि सोपा मार्ग आहे. यामुळे वेबसाईट उघडणे, ॲप डाऊनलोड करणे किंवा पेमेंट करणे शक्य होते. कोडचा वापर मार्केटिंग मोहिमांमध्ये ग्राहकांना विशिष्ट लॅण्डिंग पृष्ठांवर, प्रचार सामग्री प्रदान करण्यासाठी किंवा ग्राहक सहभाग वाढवण्यासाठी केला जातो. विविध उद्योगांमध्ये संपर्काविना पेमेंट्ससाठी कोडचा वापर केला जातो. त्यामुळे सुरक्षित आणि सोयीस्कर व्यवहार शक्य होतात. कोडचा वापर विशिष्ट क्षेत्रांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी केला जातो. त्याचप्रमाणे उत्पादने आणि इन्व्हेंटरी ट्रॅक करण्यासाठीही कोडचा वापर केला जातो. त्यामुळे त्यांची स्थिती आणि स्थानाबद्दल रिअल-टाईम माहिती मिळते.

आजघडीला कोडचा वापर डिजिटल साइनेजमध्ये इंटरॲक्टिव्ह अनुभव प्रदान करण्यासाठी केला जातो. त्यामुळे वापरकर्त्यांना ऑनलाईन संसाधनांमध्ये किंवा अतिरिक्त माहितीमध्ये प्रवेश मिळतो. कोडचा वापर उत्पादने किंवा सेवांची प्रामाणिकता पडताळण्यासाठीही केला जातो, जसे की कॉन्सर्ट तिकिटे किंवा औषध उत्पादने. कोड तंत्रज्ञानातील भविष्यकालीन ट्रेंड्स रंजक आहेत. ते समजून घेतले तर येत्या काळातील तंत्रक्रांतीची एक झलक मिळू शकते. याचीच एक झलक म्हणजे स्मार्ट आणि डायनॅमिक कोड्स. पारंपरिक कोड्स स्थिर असतात, परंतु डायनॅमिक कोड्स दुरून अपडेट केले जाऊ शकतात. यामुळे व्यवसायांना मेन्यू किंवा इव्हेंट तपशील बदलण्याची सुविधा मिळते. यातील एक भाग म्हणजे ऑगमेंटेड रिॲलिटीसह एकत्रीकरण. अशा प्रकारे कोड्सचा वापर आता वाढत आहे. कोड स्कॅन केल्याने थ्रीडी मॉडेल्स, ॲनिमेशन्स किंवा व्हर्च्युअल सूचना वास्तविक जगात समोर येऊ शकतात. यामुळे वापरकर्ता सहभाग वाढतो. व्हॉईस-एक्टिव्हेटेड कोड्स हा आणखी एक प्रकार. उदयोन्मुख व्हॉईस-एक्टिव्हेटेड कोड्स वापरकर्त्यांना व्हॉईस कमांडद्वारे सामग्रीसह संवाद साधण्याची सुविधा देतात. कोडच्या वापरात काही वाढीव सुरक्षा वैशिष्ट्ये आहेत. फिशिंग आणि मालवेअर धोके टाळण्यासाठी कोड्समध्ये एन्क्रिप्शन आणि ब्लॉकचेन पडताळणीसारखे प्रगत सुरक्षा उपाय समाविष्ट केले जात आहेत. या तंत्रज्ञानामुळे स्कॅन केलेले दुवे प्रामाणिक आणि सुरक्षित आहेत. विशेषतः आर्थिक व्यवहारांमध्ये त्यांचे महत्त्व मोठे आहे. याचे इंटरनेट ऑफ थिंग्जसह एकत्रीकरण केले जात आहे. कोड्स स्मार्ट डिव्हाईसेसमध्ये एम्बेड केले जात असल्यामुळे वापरकर्त्यांना मॅन्युअल्समध्ये प्रवेश मिळवणे, समस्या निवारण करणे किंवा सेटिंग्ज रिमोटली नियंत्रित करणे शक्य होते. व्यवसाय आणि व्यवहारामध्ये कागदाचा वापर कमी करण्यासाठी कोड्सचा वापर करून डिजिटल रिसिट, मॅन्युअल्स आणि ब्रोशर्स प्रदान केले जात आहेत. हा बदल पर्यावरणीय जपणुकीच्या प्रयत्नांना समर्थन देतो आणि पर्यावरणपूरक पद्धतींसाठी ग्राहकांच्या पसंतीशी सुसंगत आहे. मासाहिरो हाराने कधीही प्रसिद्धी मागितली नाही. पण एका शांत गो गेममधून एका क्रांतिकारी शोधाची प्रेरणा घेऊन त्याने एक महत्त्वाचे संशोधन तडीस नेले. आता हे संशोधन अब्जावधी लोकांच्या खिशात, स्क्रीन्सवर आणि जीवनात आहे. कारण कधी कधी, सर्वांत मोठ्या शोधांचा उदय ताकदीने नाही, तर जुन्या समस्येला नवीन दृष्टीने पाहिल्याने होतो.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

# गुंतवणुकीचा नवा चेहरा

**नंदकिशोर काथवटे**

आजच्या काळात आर्थिक सुबत्तेसाठी आणि भविष्यातील सुरक्षिततेसाठी गुंतवणूक करणे अत्यावश्यक झाले आहे. पारंपरिक गुंतवणुकीच्या साधनांपेक्षा आजची तरुण पिढी अधिक रिटर्न्सच्या अपेक्षेने नव्या आर्थिक उपकरणांकडे वळत आहे. यात प्रामुख्याने दोन गोष्टींचा उल्लेख करावा लागेल-एसआयपी (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) आणि शेअर मार्केट. या दोन्ही साधनांत गुंतवणूक करताना अनेक जण मोठ्या नफ्याच्या आशेने स्वत:चा पैसा गुंतवत आहेत. मात्र, त्यामागील जोखीम, स्थैर्य आणि प्रत्यक्षात मिळणारे रिटर्न यांचा नीट विचार केला जातो का, हा एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तरुणाई आणि शेअर बाजार हे नवे समीकरण सध्या मार्केटमध्ये सुरू आहे. मात्र तरुणाईकरिता अशी गुंतवणूक म्हणजे आकर्षण की अंधानुकरण? मुळात हा एक प्रश्न आहे. भारतात २०२१ ते २०२४ दरम्यान लाखो गुंतवणूकदारांमध्ये आयपीओ आणि इक्विटी मार्केटकडे वळण्याची प्रवृत्ती दिसून आली. नव्या कंपन्यांचे प्राथमिक समभाग विक्रीत (आयपीओ) सहभागी होणे म्हणजे कमी वेळात जास्त नफा मिळवण्याचा मार्ग अशी एक धारणा अनेक नवशिक्या गुंतवणूकदारांमध्ये निर्माण झाली. मात्र, प्रत्यक्षात काय घडले? अनेकांना तोटा सहन करावा लागला. एका संशोधनातील अहवालानुसार, मागील ३ वर्षांत आलेल्या आयपीओपैकी ४८ टक्के कंपन्यांचे रिटर्न्स निगेटिव्ह आहेत. याचा अर्थ, अर्ध्याहून जास्त गुंतवणूकदारांना अपेक्षेप्रमाणे नफा मिळालाच नाही, उलट त्यांना तोटा सहन करावा लागला. आयपीओ म्हणजे हमखास नफा मिळवण्याचे माध्यम नसून, त्यामध्येही जोखीम तितकीच असते. आयपीओ प्रमाणेच तरुण एसआयपीकडेही वळलेले आहेत. एसआयपी सुरक्षित आहे पण ते सुद्धा जोखीम असलेले साधन आहे. सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (सिप) ही अशी योजना आहे, जिच्यात दर महिन्याला निश्चित रक्कम म्युच्युअल फंडात गुंतवली जाते. दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी ही योजना उपयुक्त मानली जाते. अनेक जाहिरातींमध्ये हे सांगितले जाते की पैसे दर महिन्याला गुंतवा आणि भविष्यात कोटींचा फंड मिळवा. मात्र यामध्ये 'मुच्युअल फंड इन्व्हेस्टमेंट्स आर सबजेक्ट टु मार्केट रिस्क' असा स्पष्ट इशारा दिला जातो. आज अनेक तरुण या योजनांकडे आकर्षित होत आहेत. त्यांना वाटते की फिक्स्ड डिपॉझिटपेक्षा जास्त व्याज यामध्ये मिळते, परंतु यामागची बाजाराशी संबंधित अनिश्चितता आणि संभाव्य नुकसान या गोष्टींकडे अनेक वेळा दुर्लक्ष केले जाते. 'स्वप्न विकणारे' आयपीओ आणि गोंधळलेले गुंतवणूकदार अशी काहीशी स्थिती आता सर्वत्र दिसून येत आहे.

३ वर्षांत आलेल्या २३६ आयपीओ पैकी तब्बल ११३ चे रिटर्न्स निगेटिव्ह दाखविण्यात आले आहे. म्हणजेच जवळपास ५० टक्के कंपन्यांच्या शेअरने लिस्टिंगनंतर तोटा दिला आहे. यामध्ये काही कंपन्यांचे शेअर्स लिस्टिंगनंतर २५ टक्क्यांपेक्षा जास्त कोसळले. या आयपीओमध्ये गुंतवणूक करणारे बहुतांश गुंतवणूकदार हे 'रिटेल' म्हणजे सामान्य नागरिक आहेत. त्यांनी केवळ प्रसिद्धीवर विश्वास ठेवून किंवा कंपनीचे उत्पादन प्रसिद्ध असल्यामुळे गुंतवणूक केली. परंतु, कंपनीचा आर्थिक अभ्यास, फायनान्शियल स्टेटमेंट्स, प्रॉफिट मार्जिन, प्रॉमोटरचे ट्रॅक रेकॉर्ड - या गोष्टी तपासल्या गेल्या नाहीत. यामुळेच आज अनेक गुंतवणूकदार निराश झाले आहेत. आजची तरुण पिढी आर्थिकदृष्ट्या अधिक जागरूक आहे. त्यांना फक्त बँक ठेवी आणि पारंपरिक बचत योजना नको आहेत. त्यांना हवे आहे झपाट्याने वाढणारे रिटर्न्स, आर्थिक स्वतंत्रता आणि अल्पावधीत मोठा फंड. म्हणूनच त्यांनी सिप आणि शेअर मार्केट याकडे मोठ्या प्रमाणावर आपला कल वळवला आहे. परंतु, हे करत असताना सर्वांत मोठा जो धोका दिसतो तो म्हणजे अपूर्ण माहितीवर आधारित गुंतवणूक. बहुतेक तरुण सोशल मीडिया, यूट्यूब आणि व्हॉट्सॲप ग्रुप्सवर अवलंबून असतात. तेथून मिळणाऱ्या 'टिप्स' किंवा 'हॉट स्टॉक्स'वर ते पैसे गुंतवतात. ही प्रवृत्ती फार धोकादायक आहे.

गुंतवणुकीत यशस्वी होण्यासाठी काही मूलभूत नियम लक्षात ठेवणे आवश्यक आहे. कंपनीचे मूल्यमापन करणे, तिचा नफा, महसूल, कर्जाची स्थिती, विस्तार योजना आदी बाबींचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. सर्व आयपीओ फायदेशीर नसतात. अनेक आयपीओ केवळ प्रमोटर्ससाठी 'एग्झिट प्लॅन' असतो. स्वतः माहिती घेतल्याशिवाय पैसे गुंतवणे धोक्याचे आहे. गुंतवणूक ही झपाट्याने श्रीमंत होण्याची संधी नसून गुंतवणूक म्हणजे एक नियोजनबद्ध प्रवास आहे. ते तरुणाईने समजून घेण्याची गरज आहे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# हवाई अपघातातील राजकीय नेत्यांचा मृत्यू

**श्यामकांत जहागीरदार**

मागील आठवड्यात अहमदाबाद विमानतळावरून लंडनसाठी उड्डाण केलेले एअर इंडियाचे बोईंग ड्रीमलायनर विमान उड्डाणानंतर लगेच विमानतळ परिसरात कोसळले. यात विमानातील २४१ प्रवासी मृत्युमुखी पडले, तर ज्याठिकाणी विमान कोसळले त्या बी. जे. मेडिकल कॉलेजच्या होस्टेलमधील काही प्रशिक्षणार्थी डॉक्टरांसह या अपघातातील मृतांची संख्या २७५ झाली. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.

आपल्या देशात विमान आणि हेलिकॉप्टर अपघातात आतापर्यंत अनेक राजकीय नेत्यांचा मृत्यू झाला आहे. यात काँग्रेसचे तेव्हाचे ज्येष्ठ नेते संजय गांधी, एक तत्कालीन मुख्यमंत्री, दोन माजी मुख्यमंत्री, लोकसभेचे सभापती, केंद्रीय मंत्री आणि काही मान्यवरांचा प्रामुख्याने समावेश आहे. विमान अपघातात दगावलेले देशातील पहिले राजकीय नेते काँग्रेसचे संजय गांधी होते. २३ जून १९८० ला विमान अपघातात अमेठीचे खासदार असलेल्या संजय गांधी यांचा मृत्यू झाला होता. विशेष म्हणजे संजय गांधी वैमानिक नसले तरी त्यांच्याजवळही विमान चालवण्याचा परवाना होता. संजय गांधी काँग्रेसच्या तेव्हाच्या अध्यक्ष आणि पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे कनिष्ठ पुत्र होते. राजीव गांधी तेव्हा राजकारणात नव्हते, तर वैमानिक होते. संजय गांधी यांचा तेव्हा काँग्रेस पक्षात आणि सरकारमध्येही दबदबा होता. ते घटनाबाह्य सत्ताकेंद्र झाले होते. विमान अपघातात संजय गांधींचे निधन झाल्यानंतर वैमानिक असलेल्या राजीव गांधींना एअर इंडियातील आपली पायलटची नोकरी सोडून आपल्या आईच्या म्हणजे इंदिरा गांधींच्या मदतीसाठी राजकारणात यावे लागले होते. संजय गांधींच्या निधनानंतर काँग्रेस पक्षाच्या राजकारणाची दिशा आणि दशा बदलून गेली.

माजी केंद्रीय मंत्री माधवराव शिंदे यांचे निधनही विमान अपघातात झाले होते. ३० सप्टेंबर २००२ ला कानपूर येथे एका मेळाव्यासाठी जात असताना मैनपुरीजवळ शिंदे यांचे विमान अपघातग्रस्त झाले होते. विशेष म्हणजे कोसळत असताना शिंदे यांच्या विमानाला आगही लागली होती. त्यात त्यांच्यासह आठ जणांचा मृत्यू झाला होता. संजय गांधींच्या मृत्यूनंतर जसे राजीव गांधींना राजकारणात यावे लागले, तसेच माधवराव शिंदेंच्या विमान अपघातातील मृत्यूनंतर त्यांच्या मुलाला, ज्योतिरादित्य शिंदे, यांना त्यांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून राजकारणात पदार्पण करावे लागले होते. तेलगू देसमचे नेते आणि लोकसभेचे सभापती जीएमसी बालयोगी यांचेही ३ मार्च २००२ ला हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. बालयोगी यांना नेणाऱ्या हेलिकॉप्टरमध्ये बिघाड निर्माण झाल्यानंतर आपत्कालीन स्थितीत उतरवण्याचा प्रयत्न करत असताना ते अपघातग्रस्त झाले होते. १९९९ मध्ये सत्तेवर आलेल्या अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखालील रालोआच्या सरकारला तेलगू देसमचा पाठिंबा होता. त्यामुळे भाजपाने मित्रपक्ष असलेल्या तेलगू देसमच्या बालयोगी यांना लोकसभेचे सभापती केले होते.

प्रसिद्ध उद्योगपती आणि हरयाणाचे तेव्हाचे ऊर्जामंत्री ओ. पी. जिंदल आणि तत्कालीन कृषिमंत्री सुरेंद्रसिंह यांचे २००५ मध्ये हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. या दोघांना दिल्लीहून चंदीगडला नेणारे हेलिकॉप्टर उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथे कोसळले होते. आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वायएस राजशेखर रेड्डी यांचे २ सप्टेंबर २००९ ला एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. रेड्डी हैदराबादच्या बेगमपेठ विमानतळावरून कित्तूर येथील एका कार्यक्रमासाठी सकाळी निघाले. पण निर्धारित वेळी त्यांचे हेलिकॉप्टर कित्तूरला पोहोचलेच नाही. विमान वाहतूक नियंत्रण कक्षाशी त्यांच्या हेलिकॉप्टरचा संपर्क तुटला होता. त्यामुळे खळबळ उडाली. रेड्डी यांचे हेलिकॉप्टर बेपत्ता झाले होते. त्यामुळे त्याचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर शोधमोहीम हाती घेण्यात आली. ज्या ठिकाणी हेलिकॉप्टर कोसळल्याचा अंदाज होता, तो घनदाट जंगलाचा भाग होता. त्यामुळे तेथे पोहोचणेही कठीण होते. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टरही पाठवता येत नव्हते. केंद्रीय राखीव पोलिस दलाचे ५ हजार जवान शोधकार्यात लावण्यात आले. त्यांनी जंगलात धाव घेतली. दुसऱ्या दिवशी एका दुर्गम ठिकाणी हेलिकॉप्टर कोसळल्याचे मदत आणि बचाव पथकाला दिसले. राजशेखर रेड्डी यांच्या मृतदेहाचे अवशेष त्याठिकाणी आढळून आले.

राजशेखर रेड्डी यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा जगनमोहन रेड्डी यांना मुख्यमंत्री व्हायचे होते. पण काँग्रेस पक्षाने दुसऱ्या नेत्याची निवड केली. त्यामुळे जगनमोहन रेड्डी आणि राजशेखर रेड्डी यांचे समर्थक आमदार नाराज झाले. काही महिन्यांनी जगनमोहन रेड्डी यांनी काँग्रेस पक्षातून बाहेर पडत आपल्या पित्याच्या नावाने वायएसआर काँग्रेसची स्थापना केली. नंतरच्या विधानसभा निवडणुकीत मूळ काँग्रेस पक्षाचा पराभव करत वायएसआर काँग्रेसला बहुमत मिळाले आणि जगनमोहन रेड्डी मुख्यमंत्री झाले. त्यानंतर राज्यात काँग्रेसची घसरण सुरू झाली, काँग्रेसला कधी सत्तेवर येता आले नाही.

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू यांचेही एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. पवनहंस हेलिकॉप्टरने खांडू तवांगवरून इटानगरसाठी निघाले होते. पण रस्त्यातच त्यांचे हेलिकॉप्टर बेपत्ता झाले. रेड्डी यांचे हेलिकॉप्टर दुसऱ्या दिवशी सापडले, पण खांडू यांचे हेलिकॉप्टर पाच दिवसांनंतर अपघातग्रस्त स्थितीत आढळले होते. खराब हवमानामुळे हे हेलिकॉप्टर कोसळल्याचे तेव्हा सांगण्यात आले. सामान्यपणे कोणतीही अति महत्त्वाची व्यक्ती एक इंजिन असलेल्या हेलिकॉप्टरमधून प्रवास करीत नाही. मात्र खांडू प्रवास करत असलेले हेलिकॉप्टर एका इंजिनचे होते.

देशाचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल बिपीन रावत यांचा ८ डिसेंबर २०२१ ला हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला होता. हेलिकॉप्टरने सुलुरमधून वेलिंग्टनला जात असताना रावत यांचे हेलिकॉप्टर अपघातग्रस्त झाले होते. यात रावत, त्यांची पत्नी आणि अन्य नऊ जणांचा मृत्यू झाला होता. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा मृत्यू जसा एअर इंडियाच्या विमान अपघातात झाला, तसाच देशातील महान शास्त्रज्ञ होमी जहाँगीर भाभा यांचा मृत्यूही २४ जानेवारी १९६६ मध्ये एअर इंडियाच्या विमानाला झालेल्या अपघातात झाला होता. भाभा भारताच्या परमाणू कार्यक्रमाचे जनक मानले जातात. आपल्याला हिरवी झेंडी मिळाली तर १८ महिन्यांच्या आत आपण भारतासाठी अणुबॉम्ब बनवू शकतो, असे अतिशय महत्त्वाचे विधान भाभा यांनी आपल्या अपघाती मृत्यूच्या काही दिवस आधी केले होते. एअर इंडियाच्या विमानाने मुंबईवरून न्यू यॉर्कला जात असताना भाभा असलेले विमान युरोपमधील सर्वांत उंच अशा माँट ब्लॉक पहाडावर धडकले होते. भाभा यांच्या विमान अपघातातील मृत्यूबद्दल तेव्हा वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक बातम्या आल्या होत्या. त्यांचा मृत्यू हा संशयास्पद मानला गेला होता.

९८८१७१७८१७

### शालार्थ घोटाळा : तपास सुधारणा की प्रतिष्ठेचा घात?

नागपूर जिल्ह्यातील शालार्थ पोर्टलवरील घोटाळ्यात बनावट कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून सरकारी निधी लुटल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष तपास पथकाची नियुक्ती ही योग्य पाऊल असले तरी तपासाची दिशा पाहता संस्थाचालकांनाच केंद्रस्थानी ठेवले जात असल्याची चिंता वाढली आहे. २०० हून अधिक शाळांचे संचालक चौकशीसाठी बोलावले जात असून, ठोस पुराव्याविना जबाबांवरूनच संगनमत ठरवले जाते. दस्तावेजातील त्रुटी, विलंब, अपूर्णता म्हणजे गुन्हा नव्हे. तपास करताना शाळेचे अस्तित्व, कर्मचाऱ्यांची उपस्थिती, शैक्षणिक पात्रता व नेमणुकीतील तारखा या स्पष्ट निकषांचा आधार घ्यावा. पोलिस यंत्रणेला शैक्षणिक तपासाचा अनुभव नसल्यामुळे निष्पापांवर अन्याय होण्याची शक्यता आहे. भीती नव्हे, तर सुधारणा हेच कारवाईचे उद्दिष्ट असावे. अन्यथा शैक्षणिक संस्थांमध्ये नकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकते.

**निष्कर्ष** : गुन्हेगारांना शिक्षा मिळालीच पाहिजे, पण निष्पापांची प्रतिष्ठा अबाधित राहिली पाहिजे. शिक्षणव्यवस्थेत पारदर्शकतेसोबतच न्यायाची योग्य समजही महत्त्वाची आहे.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

## वाचक पत्रे

### पावसाचा सामना करण्यासाठी मनपा सज्ज आहे?

सध्या पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा धुमाकूळ सुरू आहे. रोज लोक वाहून जात आहेत, लोकांच्या घरात पाणी जाऊन त्यांची वाताहत होत आहे अशा बातम्या येत आहेत. अजून विदर्भात पावसाचे आगमन झालेले नाही. पाऊस असा काही येतो की जणू काही ढगफुटी झाली की काय! गेल्या ३-४ वर्षांपासून नागपूरच्या रवींद्र नगरमध्ये थोडा पाऊस आला तर गुडघाभर पाणी साचते. लोकांच्या घरामध्ये पाणी जमा होते. सन्माननीय आयुक्तांनी मागील वर्षी आमच्या वसाहतीला भेट दिली. तिथे अनेक ज्येष्ठ नागरिकांनी पावसाळ्यात काय हाल होतात हे त्यांना सांगितले. घरासमोरचे चेम्बर्स साफ होत नाहीत. कचरा उचलला जात नाही. इमारतींचे बांधकाम साहित्य रस्त्यावर पडून असल्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही, नाल्यामध्ये पाणी जात नाही. मुख्यमंत्री निधीमधून सिमेंटची भूमिगत नाली तयार केली पण ती अपूर्णावस्थेतच आहे. कारण समोर ती मोठया नाल्याला जोडण्यात आली नाही. रवींद्र नगरच्या दोन- तीन रांगामध्ये अक्षरशः नदीचे स्वरूप आलेले असते. पावसाळ्याच्या आधी घायव्याची खबरदारी जर घेतली तर नागरिकांना दिलासा मिळू शकेल. नगरसेवक दिलीप दिवे सदैव नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अग्रेसर असतात परंतु काही वर्षांपासून नगरसेवक नसल्याने प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. अजून आपल्याकडे पाऊस आला नाही. त्यामुळे आपल्याकडे वेळ आहे तेव्हा नियोजन करून, सुनियोजित पद्धतीने मुसळधार पावसाला सामोरे जाऊन नागरिकांना होणारा त्रास कसा कमी करता येईल याकडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे.

मागील वर्षी सुद्धा लोकांचे भयंकर नुकसान झाले होते. सिमेंट रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे रस्ते बंद असतात आणि गल्लीबोळातून नागरिकांना ये-जा करावी लागते. त्यामुळे विकास कामांबरोबरच जर जनतेला होणारा त्रास आणि अपघात होणार नाही हेही प्रशासनाला बघावे लागेल. रवींद्र नगरसारख्या वसाहतीमध्ये पाणी भरत असेल आणि स्लम वसाहतीसारखं स्वरूप येत असेल तर ते शोभणार नाही. अजूनही वेळ आहे. सर्व नागरिक, नगरसेवक, प्रशासकीय यंत्रणा सर्व मिळून आपण एकमेकांना सहकार्य करून यावर्षी पावसाळ्यात कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेऊया.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

### अंबाझरी गार्डन सुरू करा

शहरात निसर्गरम्य ठिकाण म्हणून उद्यानांकडे पाहिले जाते. नयनरम्य फुले, कारंजे, मुलांची खेळणी या सर्वांचा आनंद आपल्याला बागेत मिळतो. नागपुरातला असाच एक सुंदर बगीचा म्हणजे अंबाझरी गार्डन. तलाव आणि सुंदर बगीचा हे दोन्हीही इथे पाहायला मिळते. परंतु गेल्या चार वर्षांपासून हे उद्यान बंद आहे. बांधकाम, दुरुस्ती यासाठी ते बंद असावे असा प्राथमिक अंदाज आहे. पण चार वर्ष होऊन देखील दुरुस्ती झाली नाही आणि उद्यान बंद आहे याचे सर्व नागरिकांना आश्चर्य वाटते. परगावचे लोक नागपुरात आल्यावर अंबाझरीला आवर्जून भेट देतात. तेव्हा त्यांच्या पदरी निराशाच पडते. नागपूरकरचे अंबाझरी गार्डन हे पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण आहे. पण ते बंद असल्यामुळे पर्यटकांची निराशा होते. त्यामुळे हे गार्डन लवकरात लवकर सुरू व्हावे व प्रत्येकाला येथील निसर्गसौंदर्याचा आनंद लुटता यावा अशी सर्व जनसामान्यांची इच्छा आहे.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## हिंदी सक्तीच्या विरोधात निदर्शने करत मनसेकडून जीआरची होळी

**सोलापूर, १८ जून-**

हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात सोलापुरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निदर्शने करत जीआर जाळण्यात आला.जर सरकारने महाराष्ट्रात हिंदी सक्ती करण्याचे षडयंत्र केले तर सरकारला जशास तसे उत्तर देऊ असा इशारा यावेळी मनसैनिकांकडून देण्यात आला आहे. महाराष्ट्रात हिंदी सक्ती करणारे भाजप सरकार गुजरातमध्ये हिंदी सक्ती का करत नाही असा सवाल उपस्थित करत केवळ परप्रांतीयांच्या मतावर डोळा ठेवून भाजप सरकार हे षडयंत्र करत आहे.असा आरोप देखील महाराष्ट्र नवनिर्माण सेना पदाधिकाऱ्यांनी यावेळी केला. यावेळी उपस्थित जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे ,शिक्षक सेना राज्य सरचिटणीस जयवंत हक्के, राज्य उपाध्यक्ष संतोष कुमार घोडके ,वाहतूक सेनेचे जिल्हा संघटक प्रसाद कुमठेकर, प्रकाश कोळी, विश्वास गजभार, गोविंद बंदपट्टे ,सोपान महिंद्रकर, वीरसंगप्पा भोज, गणेश राऊत, सैपन जमखंडी, समर्थ माळगे ,अभिषेक इरकल व महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.


हर्षाली इंगळे


चाँदसाब उजळूवाले


योगेश क्षीरसागर


अर्जुन देशपांडे

## ए.डी. जोशी ज्युनियर कॉलेजचे एमएचटी-सीईटी परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १८ जून -**

ए.डी. जोशी ज्युनियर कॉलेजने एमएचटी-सीईटी परीक्षेत उज्ज्वल यश मिळल्याचे कॉलेजमधील हर्षाली शैलेशकुमार इंगळे हिने ९९.७४ पर्सेंटाइल गुण मिळवून कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला. कॉलेजमधून परीक्षेस एकूण १२० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. एकूण प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ९५ पर्सेंटाइलच्या वर १८ विद्यार्थी तर ९० पर्सेंटाइलच्यावर ४० विद्यार्थी आहेत. ✻ **पीसीएम ग्रुप :** चाँदसाब उजळूवाले (९९.५६), योगेश क्षीरसागर (९९.३९), आदित्य यादव (९८.७८), ईश्वर येमूल (९८.६१), महेश चव्हाण (९७.९८), सार्थक बावीकर (९७.७६), रितेश मॅंगझी (९७.५२), नयन कुलकर्णी (९७.४३), सायली दळवी (९६.३४), इस्माईल शेख (९६.०६). ✻ **पीसीबी ग्रुप :** हर्षाली इंगळे (९९.७४), सार्थकराजे चव्हाण (९९.६६), अर्जुन देशपांडे (९९.०५), हर्षाली मोरे (९८.२८), वैष्णवी कुंभार (९७.८५), घुगे निखिल (९७.१९), प्रतीक्षा म्हस्के (९६.५०), वैष्णवी सुर्वे (९५.३३). या सर्व विद्यार्थ्यांनी ९५ च्यावर पर्सेंटाइल मिळवून घवघवीत यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी सायली जोशी, प्राचार्य प्रवीण देशपांडे व सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.



## वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाचा सीईटी-पीसीबी ग्रुपमध्ये नेत्रदीपक यश

**सोलापूर, १८ जून-**

एप्रिल २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सीईटी-पीसीबी गटाच्या परीक्षेत वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या ३३ विद्यार्थ्यांनी आपली चमकदार उपस्थिती नोंदवत एक नवा उच्चांक प्रस्थापित केला विशेषतः २२ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक पर्सेंटाइल प्राप्त करत उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी केली आहे. या यशाबद्दल संस्थेचे सर्व विश्वस्त, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, समन्वयिका सौ. सारिका महिंद्रकर, तसेच संपूर्ण शिक्षकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. **प्रमुख गुणवंत विद्यार्थ्यांचे पर्सेंटाइल याप्रमाणे:** निकिता टवटम - ९८.५१, श्रावंती श्रीगणि - ९७.७८, सुयश बंदीछोडे- ९७.६४, साईकिरण कुडक्याल- ९७.६४, लक्ष्मी साबणे - ९७.५०, गणेश वनकेरी - ९७.४१, ललिता नामा- ९६.५४, वैभवी भंडारे - ९५.३२, रेणुका नीली - ९४.८५, कृपा कोळी - ९४.६३, समृद्धी दीक्षित - ९३.३९, संजना बॉम्बेवाले - ९३.१६, इशा मुंगापाटील - ९३.०४, प्रज्योत बिराजदार - ९२.९६, स्नेहा रापेल्ली - ९२.२३, श्रीनाथ कुडक्याल - ९२.१६, निकिता शिंदे - ९२.१६, भावना गुर्रम - ९१.९५, नुला सिद्धेश - ९१.६९, स्नेहा बिंगी - ९०.९५, प्राजक्ता क्षीरसागर - ९०.९०, रचना चिंताकिंदी ९०.१५.

## गुरुनानक चौक येथे गादी कारखान्यास आग; गाद्यांसह इतर साहित्य जळून खाक

**सोलापूर, दि. १८ जून-**

गुरुनानक चौक येथील महाराष्ट्र गादी कारखान्यास सायंकाळी ४.३० च्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत कारखान्यातील गाद्यांसह विविध साहित्य जळून खाक झाले. अग्निशामक दलाने ही आग आटोक्यात आणली. सोलापूर शहरातील गुरुनानक चौक येथील महाराष्ट्र गादी कारखान्यास सायंकाळी साडेचार च्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत कारखान्यातील गाद्यांसह इतर साहित्य जळून खाक झाले. परिसरात धुराचे लोट दिसून येत होते. आगीची माहिती मिळताच महापालिका अग्निशामक दलाचे पथक तत्काळ दाखल झाले. अग्निशामक दलाने ही आग काही वेळातच आटोक्यात आणली. या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही मात्र इतर साहित्य जळून खाक झाल्याने आर्थिक नुकसान झाले.

# मोहरमनिमित्त ६ दिवस सोलापुरात पंजांच्या मिरवणुका

### मोहरम कमिटी मध्यवर्ती कार्यालयाचे २६ जून रोजी उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

मोहरम कमिटी सोलापूरच्यावतीने गुरुवार, दि. २६ जून रोजी मध्यवर्ती कार्यालयाचे बाराईमाम चौक येथे उद्घाटन होणार आहे. दि. १ ते ६ जुलै दरम्यान ६ दिवस मोहरमनिमित्त परंपरेनुसार पंजांच्या मिरवणुका निघणार आहेत, अशी माहिती अध्यक्ष हाजी मकबूल मोहोळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मोहरम कमिटी शहर सोलापूरच्या नेतृत्वाखाली जागतिक इस्लामिक मोहरम चंद्रदर्शन गुरुवार दि. २६ जून रोजी आणि शुक्रवार दि. २७ जून रोजी मोहरमची पहिली व इस्लामी नूतन वर्षाची सुरुवात होत आहे. मंगळवार दि. १ ते ६ जुलैपर्यंत सहा दिवस शहरात पंजांच्या परंपरेनुसार शानदार मिरवणुका काढण्यात येणार आहेत. मंगळवार दि. १ जुलै रोजी मोहरम पाचवी निमित्त सायंकाळी ७ वाजता साखरपेठ रंगा चौक येथून पीर बडे मुस्लिम प्रथम मानाचे पंजाची मिरवणूक निघणार आहे. दि. २ जुलै रोजी मोहरम सहावी निमित्त दुर्वेश मशीद शनिवार पेठ येथून पीर छोटे अब्बास अली पंजाची धावती मिरवणूक सायंकाळी ५ वाजता निघणार आहे. दि. ३ जुलै रोजी रात्री ९ वाजता मराठा वस्ती येथून पीर इमाम कासिम पंजाची मिरवणूक निघणार आहे. दि. ४ जुलै रोजी रात्री ९ वाजता समाचार चौक येथून पीर छोटे मौलाली पंजाची मिरवणूक निघणार आहे. तसेच विजापूर वेस डॉ. झाकीर हुसेन चौक येथून रात्री १० वाजता घोडेपीर पंजाची ताबूत निघेल. कुंभार वेस भुसार गल्ली येथून पीर बडे मौलाली मुश्किलकुशा पंजाची मिरवणूक रात्री १२ वाजता निघणार आहे. पीर बडे अकबर अली पंजाची मिरवणूक रात्री १२ वाजता निघणार आहे तसेच मंगळवार पेठ पोलीस चौकी जवळ पीर मौलाली व पीर अकबरअली यांची पवित्र भेट होणार आहे. तिन्ही पंजाची संयुक्त मिरवणूक धार्मिक परंपरेनुसार आसार शरीफ जाऊन भेट घेतील. दि. ५ जुलै रोजी सकुळसाळी समाजाचे मानकरी विठ्ठल मंदिर बेगम पेठ मशिदलगत पीर हुसेनबाशा नालेहैदर इमामे हुसेन पंजाची मिरवणूक रात्री १० वाजता निघणार आहे. बेगम पेठ बडी बाणेकरी तालीम येथून पीर बडे इमाम हुसेनी पंजाची मिरवणूक रात्री १०.३० वाजता निघेल. विजापूर वेस कुरेश जमातीच्यावतीने पीर बारा इमाम पंजाची मिरवणूक रात्री ११ वाजता निघेल. रविवार पेठ येथून पीर नालसाहेब पंजाची मिरवणूक रात्री ११.३० वाजता निघून ती पहाटे ३.३० वाजता विसर्जित होणार आहे.

दरम्यान, दि. ६ जुलै २०२५ रोजी पहाटे ४ वाजता शनिवार पेठ इकबाल क्लब दुर्वेश मशीद येथून पीर इमाम हुसेन पंजाची मिरवणूक मानकरी यांच्यासह मशालीसह मिरवणूक काढण्यात येणार आहे. यावेळी पोलीस अधिकारी, लोकप्रतिनिधी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी ६ वाजता दादापीर पंजाची मिरवणूक सपार बांधव परिवाराच्यावतीने हजारो हिंदू भाविकांसह सर्वधर्मसमभावाचे प्रतीक म्हणून निघणार आहे. सकाळी ७ वाजता इमामि कासिम पंजे नालबंद यांच्या परिवारातून पंजाची मिरवणूक निघेल त्यानंतर मंगळवेढा तालिम येथून इमामी हुसेन साहेबांचे पवित्र बहात्तर कुटुंब अहले हरम पंजाची मिरवणूक हजारो हिंदू बंधू भाविकांसह ज्येष्ठ पत्रकार एजाज मुजावर बांधव परिवार यांच्या नेतृत्वाखाली मिरवणूक निघणार आहे. संध्याकाळी ७.३० वाजता शनिवार पेठ दुर्वेश मशिद इकबाल क्लब येथून मानाचे इमामे हुसेन का आलम दरवेश पंजाची मिरवणूक हिंदू-मुस्लिम भाविकांसमवेत मशालीसह निघणार आहे. रात्री १२ वाजता डॉ. झाकीर हुसेन चौक विजापूर वेस येथे बारा इमाम चौकातील इमाम हुसेन पंजा आणि समारोप बाराइमाम पंजाची मिरवणूक मोहोळकर बांधव कुटुंब यांच्या वतीने काढण्यात येणार आहे.

# विडी कामगारांच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

### प्री-मॅट्रिकसाठी ३१ ऑगस्ट आणि मॅट्रिकोत्तरसाठी ३१ आक्टोंबर अंतिम तारीख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया १ जून २०२५ पासून सुरु झाली आहे. विडी/चुनखडी आणि डोलोमाईट/लोह-मईगनीज-क्रोम खनिज खाण कामगारांच्या मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत इयत्ता पहिली पासून ते उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीची रक्कम भारत सरकारने या योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल https://scholarships.gov.in वर विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ज्याची अंतिम तारीख प्री-मॅट्रिकसाठी ३१.०८.२०२५ आणि मॅट्रिकोत्तरसाठी ३१.१०.२०२५ आहे. अर्ज केल्यानंतर आपण शिकत असलेल्या शैक्षणिक संस्थेशी संपर्क साधून आपल्या अर्जाची पडताळणी करून घ्यावी लागेल. अर्जाची पडताळणी करून घेण्याची जबाबदारी



विद्यार्थ्याची असेल.

ऑनलाइन अर्ज करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या समस्या/निदानासाठी नागपूर मुख्यालय दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५१०४७४ किंवा ई-मेल wcngp-labour@nic.in वर संपर्क साधता येईल. तसेच कामगार कल्याण संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या जवळच्या दवाखान्याचे/रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी/डॉक्टर यांच्याकडून वैयक्तिकरित्या माहिती मिळवता येईल. शेवटच्या तारखेनंतरप्राप्त झालेले अर्ज आणि संस्थेने सत्यापित न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, असे नागपूरचे कल्याण आयुक्त (प्र.) व्ही.टी. थॉमस यांनी कळविले आहे.

### वार्षिक शिष्यवृत्ती

पहिली ते चौथी : एक हजार, पाचवी ते आठवी : पंधराशे, नववी ते दहावी: दोन हजार, अकरावी ते बारावी: तीन हजार, आयटीआय, पॉलिटेक्निक, पदवी अभ्यासकम : सहा हजार, व्यावसायिक अभ्यासक्रम : २५ हजार

### अर्ज करताना विद्यार्थ्यांनी 'या' बाबी लक्षात ठेवाव्यात

१. पहिल्यांदा अर्ज करताना ओटीआर OTR-One Time Registration (एक वेळ नोंदणी) निर्माण करा.

२. अर्ज करताना आधार कार्ड आवश्यक आहे. आधार बँक खात्याशी लिंक असणे अनिवार्य आहे.

३. विद्यार्थ्यांचे स्वतंत्र्य बँक खाते असावे. संयुक्त खाते असल्यास पहिले नाव विद्यार्थ्यांचे असावे.

४. पालकास एकापेक्षा जास्त मुले असल्यास प्रत्येक मुलाचे स्वतंत्र बँक खाते असावे.

५. प्रत्येक विद्यार्थ्यांचा वेगळा मोबाईल नंबर असावा.

६. बिडी कामगाराच्या ओळखपत्रावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील सदस्यांची माहिती दिलेली असावी.

७. महसूल प्राधिकरणाने जारी केलेले वर्ष २०२४-२५ चे उत्पन्न प्रमाणपत्र जोडावे. उत्पन्न प्रमाणपत्रावर सहीच्या ठिकाणी पिवळे प्रश्नचिन्ह चालणार नाही त्याऐवजी हिरवे चिन्ह असावे.

८. खाण कामगारांसाठी, फॉर्म 'बी' रजिस्टर कमांक आणि आश्रितांची नावे नमूद असलेले नियोक्त्याने दिलेले ओळखपत्र / प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

## ऋतू टांक हिची आयआयटीच्या मास्टर ऑफ डिझाईन अभ्यासक्रमासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

गुवाहाटीमधील आयआयटी संस्थेमध्ये दोन वर्षाच्या मास्टर ऑफ डिझाईन अभ्यासक्रमासाठी येथील ऋतू टांक हिची ओपन श्रेणीत निवड झाली, अशी माहिती धर्मेश टांक यांनी दिली.

देशातील १० आयआयटी संस्थांमध्ये दोन वर्षाच्या मास्टर ऑफ डिझाईन अभ्यासक्रमासाठी आयआयटी सीईईडी या परीक्षेत ऋतूला ओपन श्रेणीत अखिल भारतीय १९५वा क्रमांक मिळाला. ऋतुने या आधी श्रीष्टी मणिपाल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन बेंगलोर येथून इन्फॉर्मेशनमध्ये पदवी घेतली आहे. सध्या ती न्यूयॉर्कच्या मॅनहॅटनच्या संस्थेत सीनियर इंटरॅक्शन डिझायनर आहे. तिचे दहावीपर्यंतचे शिक्षण सेंट जोसेफ स्कूल आणि बारावीचे शिक्षण संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात झाले. त्यानंतर डिझाईनमध्ये करिअर करण्याचे ठरल्यानंतर मुंबई व अहमदाबाद येथील बीआरडीएसमध्ये प्रशिक्षण घेतले. या पत्रकार परिषदेस अक्षय जव्हेरी उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, रेल्वेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. **निविदा क्रमांक : SUR/L/T/2024/49RI** **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील कुर्डूवाडी कॉलनी (पुन्हा आमंत्रण) येथे असलेल्या 25 क्रमांकाच्या RB II प्रकारच्या क्वार्टरच्या सुधारणा आणि पुनर्वायरिंगशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग. **अंदाजे किंमत:** 5,31,364.35/- **बोली सुरक्षा:** 10,600.00/- **पूर्णता शुल्क:** 12 **महिने** **ऑफरची वैधता:** 60 दिवस **वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** 11/07/2025 दुपारी ३ वाजता. बिड सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल. ANJ-54

परवानगीशिवाय रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**दाखला हरवला आहे**

माझा बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज इयत्ता १२ वी चा दाखला बार्शी ते शेलगाव (मा) प्रवासादरम्यान १ जून २०२५ रोजी हरवला आहे. ज्या कोणास सापडला असेल त्यांनी खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**संपर्क :-**
**बालाजी तानाजी नलवडे**
**रा. बारंगुळे गल्ली,**
**शेलगाव (मा) ता. बार्शी,**
**जि. सोलापूर**
**मो.नं. ९८८१४२६५११**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना (पुनर्निमंत्रण)**

निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-10 दिनांक :16/06/2025 DRM (S&T) चे कार्यालय, सेंट्रल रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे:- **त्याच्या परिसरातील कामाचे नाव:** सिग्नलिंगचे काम मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात इंटरलॉक्ड एलसी गेट्सवर S&T उपकरणांचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात. **निविदा क्रमांक :** SUR-N-T-2025-26-10 **कामाची किंमत:** रु. 2,22,29,955.58 **निविदा फॉर्मची किंमत:** शून्य **जमा करावयाची बक्षिसे:** रु. 2,61,200 **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 12 महिने. **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** www.ireps.gov.in 09/07/2025 15.30 वाजल्यानंतर. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग खखख डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि **www.ireps.gov** वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. ईमेस्ट मनी (EMD) चे पेमेंट फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या. ANJ-53

तुमच्या प्राण्यांना रेल्वे ट्रॅकपासून दूर ठेवा.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांचे न्यायालयात**

**दूरध्वनी क्र. (०२१७) २२५५५५१** **Email - tahmandrup@gmail.com**

**जा.क्र. जमीनबाब/जन्म-मृत्यू नोंद/एस.आर.-२२७/२०२५ मंद्रुप, दि. १८/०६/२०२५**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**श्री. बाळकृष्ण शामलिंग उत्तरे** **- अर्जदार**
वय ५३ वर्षे, धंदा - व्यापार,
रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
विरूध्द
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत मंद्रुप,** **- सामनेवाला**
**ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर**

ज्याअर्थी यातील अर्जदार श्री. बाळकृष्ण शामलिंग उत्तरे, रा. मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर येथील कायमचे रहिवासी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. शामलिंग रामण्णा उत्तरे यांचा मृत्यू दि. ०१/०५/२००९ रोजी गाव - मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर येथे झालेला आहे. परंतु सदर मृत्यूची नोंद ग्रामपंचायतीस झालेली नाही. करिता कै. शामलिंग रामण्णा उत्तरे यांच्या मृत्यूची नोंद होऊन तसा मृत्यू दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३(२) (३) अन्वये ग्रामपंचायत मंद्रुप यांना आदेश होणेकामी अपर तहसिलदार सो मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळवणेत येते की, अर्जदार अर्जदार श्री. बाळकृष्ण शामलिंग उत्तरे यांचे वडील कै. शामलिंग रामण्णा उत्तरे यांच्या मृत्यूची नोंद होऊन मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठ्यर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत इकडील न्यायालयात स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत सबळ पुराव्यानिशी हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती कै. शामलिंग रामण्णा उत्तरे यांच्या मृत्यूची नोंद होऊन तसा मृत्यू दाखला देण्याचा आदेश मंद्रुप ग्रामपंचायतीस मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही. हे आज दि.१८/०६/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

शिक्का

**सही/-**
**(एन.व्ही. सरवळे)**
**प्र. तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा प्र. नायब तहसिलदार**
**मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर.**



## सेवासदन महाविद्यालयाचे एमएचटी-सीईटी परीक्षेत यश

**सोलापूर, दि. १८ जून-**

येथील सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत एमएचटी-सीईटी परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील प्रज्ञा डांगे (९९.६९), भक्ती कल्पवृक्ष (९९.६५), प्रणिता राठोड (९३.७६) आणि जान्हवी घुले (९१.४६) या विद्यार्थिनींनी या परीक्षेत अभूतपूर्व यश मिळवले आहे. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती शीला मिस्री, सचिव वीणा पत्की शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, संचालक श्रीमती विद्या लिमये, पद्माकर कुलकर्णी, प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा.पद्मकुमार उपाध्ये, प्रा. मधुरा गोगटे, प्रा. सुजाता उपासे, प्रा. सविता मादळे, प्रा. नम्रता म्याना उपस्थित होते.

## अर्थविभागाच्या कात्रीत राज्यातील कंत्राटदार अडकला

### राज्य अभियंता संघटनेची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

राज्यातील सरकारी कामे केलेल्या विकासकांची कंत्राटदार, सुबे अभियंता, मजुर संस्था यांची जवळपास ८० हजार कोटींची देयके गेल्या ९ महिन्यांपासून प्रलंबित आहेत. मार्च २०२५ मध्ये फक्त यापैकी ३ टक्के निधी उपलब्ध करण्यात आला होता. या तिमाहीत एक छदाम निधी शासनाकडून कोणत्याही विभागास वितरण करण्यात आला नाही.

आमच्या संघटनेच्या शिष्ट मंडळाची सार्वजनिक बांधकाम मंत्री व मुख्यमंत्री यांच्या बरोबर फेब्रुवारी व मार्च २०२५ ला बैठक झाली. तेव्हा नवीन आर्थिक वर्ष सुरू झाल्याबरोबर एप्रिल ला लगेच निधी उपलब्ध केला जाईल असे आश्वासन दिले. दोन महिने झाले निधीचा थांगपत्ता कुठेही दिसत नाही. गेल्या तीन महिन्यांपासून कोणत्याही विभागाची निधी वितरणाची फाईल मंजुरीसाठी अर्थविभागाकडे पाठवु नये असे अघोषित सरकारी फर्मान अर्थविभाग व सरकारने काढले आहे. अर्थमंत्री व मुख्यमंत्री यांच्या विभागाकडे चौकशी करावी असे सांगितले जाते. तेथेही चौकशी केली असता तिथेही स्मशान शांतता जाणवते. लेखाशिर्षकाच्या अंतर्गत केलेल्या ८० हजार कोटींच्या कामांसाठी निधी कधी उपलब्ध होईल हे कोणीही सांगू शकत नाही. हे मुघली अघोषित अर्थविभागाच्या फर्मानाच्या कात्रीत राज्यातील कंत्राटदार अडकला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेचे राज्य अध्यक्ष इंजि मिलिंद भोसले, महासचिव सुनिल नागराळे कार्याध्यक्ष संजय मैंद,निवास लाड, विभागीय अध्यक्ष सुरेश कडु पाटील, सुबोध सरोदे, अनिल पाटील, प्रकाश पालरेचा, मंगेश आवळे, प्रकाश पांडव, कांतीलाल डुबल, राजेश आसेगावकर, कौशिक देशमुख, अभियंता संघटना महासचिव राजेश देशमुख, कैलास लांडे, नरेंद्र भोसले, राहुल सोनावणे, दिपेश कोतुलवार, प्रशांत कारंडे, सिकंदर डांगे, नितीन लवाळे, अन्वर अली, अश्विन पवार, उदय पाटील, समीर शेख, सुनिल जाधव यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास विशेषतः जि. सोलापूर तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु.पल. हद्दीतील गट. न. १८९/१ याचे संपूर्ण क्षेत्रफळ ४३५.०० चौ.मी. यापैकी पश्चिम बाजूचे क्षेत्र २३६.२५ चौ.मी. अशी जागा यासी चतुःसिमा :- पुर्वेस - रोड, दक्षिणेस - वाघमारे यांची जागा, पश्चिमेस - जाधव यांची जागा व उत्तरेस माळी यांची जागा येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत आतील तदंगभुत वस्तुहक्कासह याचे पाणी व वागणूक पुर्वबाजूने जाते व आहे वहीवाटीचे हक्कासह व सर्व अधिकारासह श्री. शिरीष शिवाजी नाळे यांचे मालकीची आहे. श्री. शिरीष शिवाजी नाळे, रा. बार्शी, ता. बार्शी यांनी घर बाधंण्याकरीता (Housing Loan) व इन्श्युरन्स प्रिमीयमकरीता कर्ज आमचे अशिल सागंली अर्बन को-ऑप. बँक लि., सागंली शाखा, बार्शी या बँकेकडे मागणी केली. व त्यांना रक्कम रुपये ३०,००,०००/- (तीस लाखचे मात्र) चे कर्ज मंजुर झाले आहे. वर नमुद मिळकत ही सदर कर्जास तारण देत आहेत सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असलेचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकत ही कर्जा करीता तारण देण्याची तयारी दर्शविली आहे.

सबब वर नमुद मिळकती संबंधाने जर कोणाचे काही गहाण, दान, लिज, बोजा, साठेखत, खरेदीखत कर्जबोजाचे, बक्षिस, वा इतर तत्सम व्यवहार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (८) आठ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आमची खात्री करुन द्यावी मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत निर्वेद निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. कोणचीही तक्रार चालणार नाही, कोणचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली आहे. ता. १८/०६/२०२५

**सही/-**
**ॲड. श्री. प्रसाद जा. कुलकर्णी**
**बी.एस.एल., एल.एल.बी.**
**पत्ता :- लक्ष्मी नृसिंह, ७३०/२/४४/अ,**
**सिध्देश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी.**
**फो. ९४२३३३२०४८**

**बार्शी नगरपरिषद, बार्शी**
**(जि. सोलापूर)**
**जाहिर लिलाव**

**लिलाव :- बुधवार दिनांक : २५/०६/२०२५ रोजी वेळ : सकाळी ११ वाजता**
**लिलावाचे स्थळ :- क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले ऑक्सिजन पार्क (कासारवाडी रोड) बार्शी**

जाहीर लिलावाचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | नाव | लिलाव करावयाचे स्टॉल/दुकाने क्रमांक |
|---|---|---|
| १ | क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले ऑक्सिजन पार्क लगत असलेले पत्र्याचे स्टॉल/दुकाने (कासारवाडी रोड, बार्शी) | पत्र्याचे स्टॉल/दुकाने क्रमांक - ०१ ते १२ (साईज ८ x ८) |

✻ **टिप :-**
✻ सदरील पत्र्याचे स्टॉल/दुकाने हे ११ महिन्यांकरीता जाहिर लिलाव द्वारे भाडेतत्वावर देण्यात येणार आहेत.
✻ लिलावात भाग घ्यावयाच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत मिळकत विभागामध्ये पाहवयास मिळतील.
✻ लिलावामध्ये भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु. २५,०००/- रोख जागेवर भरावयाचे आहेत. त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
✻ जाहीर लिलाव ऍक्युपन्सी प्राईसचा (डिपॉझिटचा) आहे. निश्चित डिपॉझिटच्या रक्कमेपैकी २५% रक्कम जागेवर व उर्वरीत रक्कम ०७ दिवसात भरावयाची आहे. त्याशिवाय लिलाव कायम झाला असे समजण्यात येणार नाही.
✻ लिलाव मंजूर अथवा नामंजूर करणेचे सर्व अधिकार मुख्याधिकारी यांना राहतील.


**नगरपरिषद कार्यालय,**
**बार्शी, दि. १७/०६/२०२५**

शिक्का

**सही/-**
**(मुख्याधिकारी)**
**बार्शी नगरपरिषद, बार्शी**

## महत्त्वाचे

### दोन वेळा विम्बल्डन विजेती पेट्रा क्विटोव्हाला वाईल्ड कार्ड



**लंडन** : २०११ आणि २०१४ च्या विजेत्या पेट्रा क्विटोव्हाला या वर्षीच्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेसाठी बुधवारी वाईल्ड कार्ड मिळाला. या वाईल्ड कार्डच्या आधारावर ती विम्बल्डनमध्ये परतत आहे. क्विटोव्हा शेवटचा ग्रास-कोर्ट ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेत २०२३ मध्ये खेळली होती आणि गत वर्षीच्या विम्बल्डन स्पर्धेत तिच्या मुलाचा जन्म झाला तेव्हा ती पहिल्यांदाच आई झाली. १७ महिने कोर्टपासून दूर राहिल्यानंतर फेब्रुवारीमध्ये टेक्सासमधील ऑस्टिन येथे झालेल्या डब्ल्यूटीए टूरमध्ये क्विटोव्हा परतली आणि सध्या ती ५७२ व्या क्रमांकावर आहे. झेक प्रजासत्ताकची क्विटोव्हा ही बुधवारी मुख्य ड्रॉमध्ये एकेरी वाईल्ड कार्ड मिळालेली एकमेव बिगर-ब्रिटिश खेळाडू आहे. महिलांच्या ड्रॉसाठी वाइल्ड कार्ड मिळालेल्या इतर सात खेळाडूंमध्ये ब्रिटिश खेळाडू हीदर वॉटसन, हॅरिएट डार्ट आणि जोडी बुरेज यांचा समावेश आहे, तर पुरुषांच्या ड्रॉसाठी वाइल्ड कार्ड मिळालेल्या सात ब्रिटिश खेळाडूंमध्ये डॅन इव्हान्सचा समावेश आहे. पुरुषांच्या ड्रॉसाठी आणखी एक वाइल्ड कार्ड ''योग्य वेळी'' जाहीर केले जाणार आहे, असे आयोजकांनी सांगितले. ■

### राडुकानूचा पाठलाग करणाऱ्याला तिकिट खरेदीपासून रोखले

**लंडन** : टेनिसपटू एम्मा राडुकानूचा पाठलाग केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीने विम्बल्डनची तिकिटे मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु ऑल इंग्लंड क्लबच्या सुरक्षा व्यवस्थेने त्याला रोखले, असे ब्रिटिश माध्यमांनी वृत्त दिले. त्या व्यक्तीने ३० जूनपासून सुरू होणाऱ्या ग्रँड स्लॅम स्पर्धेसाठी सार्वजनिक मतपत्रिकेद्वारे तिकिटांसाठी अर्ज करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याच्या नाव लाल झेंडा लावण्यात आला होता, असे बीबीसी आणि इतरांनी वृत्त दिले. फेब्रुवारीमध्ये दुबई स्पर्धेत त्या व्यक्तीने २२ वर्षीय राडुकानूचा पाठलाग केला होता. त्या व्यक्तीला बघून ती एका सामन्यादरम्यान अस्वस्थ झाली होती. एक दिवस आधी, त्याने तिला एक पत्र पाठवले होते व त्यात तिचा फोटो काढला होता, त्यामुळे २०२१ च्या अमेरिकन ओपन विजेती राडुकानूला धक्का बसला होता. स्टॅण्डमध्ये त्या माणसाला पाहिल्यानंतर, कॅरोलिना मुचोवाविरुद्धच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यादरम्यान राडुकानूने पंचांच्या खुर्चीच्या मागे आश्रय घेतला. त्या माणसाला स्पर्धेतून बाहेर काढण्यात आले. नंतर दुबई पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि त्याने ३६ व्या क्रमांकावर असलेल्या राडुकानूला त्रास देणार नाही असे हमीपत्र लिहून दिले.

### नोहा लायल्स-टायरीक हिल दरम्यानची शर्यत रद्द

**न्यू यॉर्क** : ऑलिम्पिक १०० मीटर विजेता नोहा लायल्स आणि मियामी डॉल्फिन्सचा रिसीव्हर टायरीक हिल यांच्यात होणारी शर्यत अखेर रद्द करण्यात आली. या आठवड्याच्या शेवटी होणार होती, ती 'वैयक्तिक कारणांमुळे' रद्द केली. फ्रान्समधील कान्स येथील स्टॅगवेलच्या स्पोर्ट बीच इव्हेंटमध्ये लायल्सने रद्द करण्याची घोषणा केली. त्याची बातमी न्यू यॉर्क पोस्टने इंस्टाग्रामवर पोस्ट केलेल्या व्हिडीओमध्ये कैद झाली. दोन्ही क्रीडा स्टार्समध्ये महिन्यांपासून सुरू असलेल्या वादविवादानंतर या शर्यतीला स्थगिती देण्यात आली. हिलसोबतचा सामना टाइम्स स्क्वेअरमध्ये होणार होता, परंतु दुर्दैवाने, काही गोष्टी होत्या - गुंतागुंत, वैयक्तिक कारणांमुळे, ते घडले नाही, परंतु आम्ही पूर्णपणे तयार होतो. आम्ही एक मोठा कार्यक्रम करणार होतो, असे लायल्सने व्हिडिओमध्ये म्हटले आहे. गत उन्हाळ्यात पॅरिसमध्ये झालेल्या ऑलिम्पिक १०० मीटरचे सुवर्णपदक ९.७८४ सेकंदांच्या वेळेत लायल्सने पटकावले. जमैकाच्या किशन थॉम्पसनपेक्षा ते पाच हजारव्या सेकंदाने जास्त वेगाने होते.

### टेनिस महासंघाची निवडणूक रद्दबातल करण्याची विनंती

**नवी दिल्ली** : अखिल भारतीय टेनिस महासंघाचे (एआयटीए) अध्यक्ष अनिल जैन यांच्याविरुद्ध गत वर्षी राज्य संघटनांनी अविश्वास प्रस्ताव मांडला होता. जैन यांनी सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या महासंघाच्या निवडणुका रद्दबातल घोषित करण्याची आणि परंतु प्रशासकांची समिती (सीओए) नियुक्त करू नये अशी दिल्ली उच्च न्यायालयात विनंती केली आहे. त्यामुळ कार्यकारी समिती सदस्य` संतप्त झाले असून त्यांनी २७ जून रोजी बैठक बोलावली. एआयटीएच्या संलग्न संघटनांपैकी एकाने त्यावेळी जैन यांनी वैयक्तिक फायद्यासाठी महासंघामधील त्यांच्या पदाचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. तथापि, नवीन संस्थेची निवड करणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी अविश्वास प्रस्ताव मागे घेण्यात आला. परंतु सोमदेव देववर्मन आणि पुरव राजा यांनी निवडणुकीच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेमुळे निवडणूक निकाल सीलबंद लिफाफ्यात न्यायालयात असल्याने, नवनिर्वाचित पदाधिकारी यंत्रणेबाहेर राहिले. ■

# भारताचा पाकिस्तानविरुद्ध सलामीचा सामना

**महिला टी-२० विश्वचषक २०२६**

◆ **दुबई, १८ जून**

आगामी आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२६ क्रिकेट स्पर्धेत भारताचा सलामीचा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. स्पर्धेचा पहिला सामना १४ जून रोजी एजबॅस्टन येथे होणार आहे. आयसीसी आणि यजमान इंग्लंड ॲण्ड वेल्स क्रिकेट मंडळाने (ईसीबी) बुधवारी स्पर्धेचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले. या विश्वचषकांत १२ संघांचा समावेश आहे.

२४ दिवस चालणारी ही स्पर्धा पुढील वर्षी १२ जून ते ५ जुलै दरम्यान होणार आहे आणि इंग्लंडमधील सात ठिकाणी एकूण ३३ सामने खेळवले जातील.

पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान एजबॅस्टन येथे आपल्या मोहिमेची सुरुवात करतील, तर स्पर्धेचा पहिला सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात १२ जून



रोजी एजबॅस्टन येथे होईल.

हॅम्पशायर बाउल, हेडिंग्ले, ओल्ड ट्रॅफर्ड, द ओव्हल, ब्रिस्टल काउंटी मैदान व लॉर्ड्स ही स्पर्धेची इतर ठिकाणे आहेत. ३० जून व २ जुलै रोजी ओव्हल येथे दोन उपांत्य फेरीचे सामने होतील आणि अंतिम सामना ५ जुलै रोजी लॉर्ड्स येथे होईल. १२ संघांच्या या स्पर्धेत प्रत्येकी सहा संघांचे दोन गट असतील. गट १ मध्ये सहा वेळा विजेता ऑस्ट्रेलिया, गत आवृत्तीचा उपविजेता दक्षिण आफ्रिका, भारत, पाकिस्तान आणि दोन पात्रता संघ आहेत.

गट २ मध्ये गतविजेता न्यूझीलंड, वेस्ट इंडिज, श्रीलंका, यजमान इंग्लंड आणि दोन पात्रता संघ आहेत. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत पोहोचतील.

पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या सामन्यानंतर, भारतीय संघ १७ जून रोजी पात्रता संघाविरुद्ध लढण्यासाठी हेडिंग्ले येथे जाईल आणि त्यानंतर २१ जून रोजी ओल्ड ट्रॅफर्ड येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध लढेल. भारत २५ जून रोजी ओल्ड ट्रॅफर्ड येथे गट १ मधील दुसऱ्या पात्रता संघाचा सामना करेल, तर त्यांचा सर्वात कठीण सामना २८ जून रोजी क्रिकेटचे घर येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध असेल.

देशभरातील प्रतिष्ठित ठिकाणी आपल्याला अविश्वसनीय, जागतिक दर्जाचे खेळाडू लाखो चाहत्यांसमोर झुंजताना दिसतील. ते क्रिकेटमध्ये कायमस्वरूपी बदल घडवून आणण्यास हातभार लावतील, असे स्पर्धेच्या संचालक बेथ बॅरेट-वाइल्ड म्हणाल्या. ◂(वृत्तसंस्था)

# पंढरपूरच्या नागेश साळुंखे संघास विजेतेपद

## मास्टर्स अकादमीची बंदपट्टे चषक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

पंढरपूरच्या नागेश साळुंखे संघाने बंदपट्टे करंडक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर बुधवारी झालेल्या अंतिम सामन्यात रुद्र चौगुलेच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर त्यांनी मास्टर्स क्रिकेट अकादमीचा ३१ धावांनी पराभव केला. रुद्रने २४ धावांत ५ बळी व शानदार शतक (१०८) झळकाविले.

नागेश साळुंखे संघाने प्रथम फलंदाजी करतांना ४० षटकात ५ बाद २०० धावा केल्या. त्यात रुद्र चौगुलेच्या शतकाबरोबरच सौम्याश्री बारंगुळेने २५ धावा करीत साथ दिली. मास्टर्स संघाकडून गोलंदाजी करतांना निहाल बडगूने ३९ धावांत २ बळी टिपले. विजयी २०१ धावांचे लक्ष्य मास्टर्स संघास पेलवले नाही. त्याचा डाव ३७.५ षटकात १७० धावांत आटोपला. मास्टर्स संघाकडून आदित्य जाधव ४४ व धनराज बंदपट्टने २० धावा केल्या. नागेश साळुंखेकडून गोलंदाजी करतांना रुद्र चौगुले २४ धावांत ५ बळी टिपले. रुद्र चौगुले सामनावीर ठरला.

पारितोषिके राजू बंदपट्टे, डॉ. हर्षद वागज, लक्ष्मण विटकर, राजेश येमुल, राजवर्धन जिल्ला, गणेश चव्हाण व भारत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आली.

### रुद्र चौगुलेला तीन पारितोषिके

रुद्र चौगुलेने सामनावीर, मालिकावीर व फलंदाज अशी तीन पारितोषिके पटकाविली. सौम्याश्री बारंगुळेने गोलंदाजाचे तर उदयोन्मुख खेळाडूचे पारितोषिक धनराज बंदपट्टे याने मिळविले.

# रोहितपेक्षा इंग्लंडमध्ये कोहलीची जास्त उणीव भासेल : बॉयकॉट

◆ **लीड्स, १८ जून**

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारताला रोहित शर्मापेक्षा विराट कोहलीची जास्त उणीव भासेल आणि या दोघांनी अलिकडेच या फॉरमॅटमधून निवृत्ती घेतल्यामुळे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेत संघाच्या संधींना 'धक्का' बसेल, असे दिग्गज जेफ्री बॉयकॉट यांचे मत आहे.

विश्व क्रिकेटमधील हे दोन दिग्गज पुढील सहा आठवड्यात पाच सामने खेळतील व नवीन जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) सायकलमध्ये आपल्या मोहिमांची सुरुवात करतील.

कोहली व रोहित शर्माच्या निवृत्तीमुळे भारताच्या इंग्लंडवर मात करण्याच्या शक्यतांना धक्का बसला आहे. कोहली हा सर्वात मोठा पराभव आहे, कारण तो तिन्ही फॉरमॅटमध्ये त्यांचा सर्वोत्तम फलंदाज आणि हुकमी एक्का आहे, असे बॉयकॉट यांनी डेली टेलिग्राफसाठीच्या आपल्या स्तंभात लिहिले आहे.

भारताने इतके आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहे आणि कमी विश्रांती घेतल्यामुळे त्याचा परिणाम होतो आणि मन थकते. इंग्लंडच्या माजी कर्णधाराने कोहलीची अनुपस्थिती हा मोठा धक्का असल्याचे म्हटले.



तुमच्याकडे कितीही प्रतिभा किंवा अनुभव असला तरी, जर तुम्ही मानसिकदृष्ट्या ताजेतवाने आणि आव्हानासाठी तयार नसाल तर ते थकवणारे ठरते.

'रोहित हा एक उत्कृष्ट फलंदाज होता. त्याच्या सर्वोत्तम कामगिरीत, एक सुंदर स्ट्रोक खेळाडू होता, पण कोहलीइतका त्याची उणीव भासणार नाही कारण त्याचा कसोटी रेकॉर्ड अपवादात्मक असण्याऐवजी चांगला होता. गत काही वर्षांत त्याची फलंदाजी थोडीशी विसंगत होती, असे त्यांनी म्हटले आहे`.

रोहित कधीही कोहलीसारखा नैसर्गिक खेळाडू नव्हता आणि इंग्लंडमध्ये डावाची सुरुवात करणे खूप कठीण असू शकते कारण नवीन चेंडू जास्त फिरतो, याची त्याला जाणीव आहे. यशाची कोणतीही शक्यता मिळविण्यासाठी तुम्हाला खरोखर आव्हान स्वीकारावे लागते. कालांतराने डावाची सुरुवात करणे आणि तिन्ही स्वरूपात कर्णधारपद भूषवणे यामुळे तो निराश झाला, असेही बॉयकॉट म्हणाले.

भारतीय क्रिकेटमधील या दोन्ही दिग्गजांनी गेल्या महिन्यात खेळाच्या पारंपारिक स्वरूपातून निवृत्ती जाहीर केली, त्यानंतर बीसीसीआयने रोहितच्या जागी शुभमन गिलला संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त केले.

भारताने २००७ मध्ये इंग्लंडमध्ये शेवटची कसोटी मालिका जिंकली होती, तर यजमान संघ गेल्या महिन्यात ट्रेंट ब्रिज येथे झालेल्या एकमेव कसोटीत झिम्बाब्वेला हरवून मैदानात उतरला होता.

बॉयकॉटने बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील संघाला त्यांच्या बॅजबॉल शैलीच्या फलंदाजीला संयमित करण्याचे आणि काही सामान्य ज्ञान वापरण्याचे आवाहन केले आहे, कारण मनोरंजनापेक्षा जिंकणे अधिक महत्त्वाचे आहे, असा सल्ला त्यांनी दिला आहे.

इंग्लंड संघाला केवळ जिंकण्याचाच विचार असायला हवा कारण गत तीन जागतिक कसोटी अजिंक्यपदाचा अंतिम सामना इंग्लंडमध्ये खेळविला गेला आहे, पण इंग्लंड त्यापैकी एकाही सामन्यासाठी पात्र ठरला नाही, तेव्हा इंग्लंड संघ किती चांगले आहात हे सांगून काही उपयोग नाही. त्यांना लाज वाटली पाहिजे. त्यांचे ध्येय पुढील डब्ल्यूटीसी अंतिम फेरीत पोहोचणे हे असले पाहिजे, असेही ते म्हणाले.

'नवीन चक्र आता सुरू होत आहे हे इंग्लंडच्या खेळाडूंना सांगण्याची गरज आहे असे वाटत नाही. विजेता असणे महत्त्वाचे आहे, मनोरंजन करणारा संघ म्हणून ओळखले जाण्यापेक्षा चांगले आहे, असे ते म्हणाले.

कोहली आणि रोहितच्या अनुपस्थितीमुळे भारतीय फलंदाजी निश्चितच कमकुवत झाली आहे, परंतु बॉयकॉटने इंग्लंडला आत्मसंतुष्ट आणि अतिआत्मविश्वासू होण्याचा इशारा दिला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापुरात रविवारी जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा

**सोलापूर, दि. १८ जून-**

डॉ.व्ही.एम.मेडिकल कॉलेज कर्मचारी सहकारी पतसंस्था चषक बुद्धिबळ स्पर्धा विजापूर रोडवरील सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे रविवारी २२ जून रोजी सकाळी १० वाजता सुरु होणार आहे. पतसंस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त ही स्पर्धा श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केली आहे. या स्पर्धेत रोख बक्षीस, ९० चषक व २० मेडल्स असे एकूण ३० हजार रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. ही स्पर्धा ८,९,१०,११,१४,१७ व १९ वर्षे या वयोगट व खुल्या गटात आयोजित केली आहे. जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक मालिका दोनमध्ये विजयी होणाऱ्या ९ खेळाडूंना बुद्धिबळाचे घड्याळ बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. नाव नोंदणीसाठी सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन सचिव शरद नाईक ( मो. ९४२३३३७३४६) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन पतसंस्थेचे अध्यक्ष व्ही. व्ही. कमटम यांनी केले आहे.

# शनिवारच्या आंतरराष्ट्रीय योग दिनात सहभागी व्हा

■ **नि. उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांचे आवाहन**

■ **एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही यावर्षीची संकल्पना**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

निरोगी आरोग्यासाठी ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमाला म ोठ्या संख्येने सोलापुरकरानी सहभागी व्हावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निराळी यांनी योग दिवस समन्वय समितीच्या बैठकीत केले.

केंद्रिय संचार ब्यूरो, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, योग दिवस समन्वय समिती आणि जिल्हा प्रशासन, सोलापूर यांच्या वतीने २१ जून रोजी साजरा होणा-या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्व नियोजनाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्री निराळी बोलत होते. यावेळी क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, उपजिल्हाधिकारी अंजली मरोड, ग्रामीण पोलीस उपअधीक्षक विजयालक्ष्मी कुर्री, तहसीलदार श्रीकांत पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, योग समन्वय समितीचे निमंत्रक मनमोहन भुतडा आणि आयुष अधिकारी डॉ. विलास सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अंबादास यादव म्हणाले की, २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जागतिक स्तरावर मोठया प्रमाणात साजरा केला जातो. यावर्षी देशभर एक लाख ठिकाणी 'योग संगम' साजरा करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने भारत सरकारची सर्व मंत्रालयाने उत्सफुर्तपणे सहभाग घेउन रोज 'कॉमन योग प्रोटोकॉल' प्रमाणे सराव करत आहेत. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही यावर्षीची संकल्पना आहे. यावर्षीचा हा अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन हरिभाई देवकरण प्रशालेच्या क्रीडांगणावर दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ यावेळेत साजरा करण्यात येणार आहे. केंद्रिय संचार ब्युरोच्या वतीने दिनांक १९ ते २० जून पर्यंत हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुळे सभागृहाम ध्ये मल्टीमीडिया चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या प्रदर्शनामध्ये भारतीय योग, विविध योगासने, प्राणायाम, ध्यान याविषयी माहिती देणारे चित्र व म जकुरासह लोकांना बघता येणार आहे. हे प्रदर्शन सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे. या बैठकीसाठी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे, नायब तहसिलदार एस सी परदेशीमठ, पोलीस निरीक्षक वैष्णवी पाटील, कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, राज्य राखीव दलाचे सहायक समादेशक एम एच मते, जिल्हा होमगार्डचे मळसिद्ध कोकरे, मुख्य क्रीडा अधिकारी दत्तात्रय वरकड, संचालक राष्ट्रीय सेवा योजनाचे संचालक डॉ राजेंद्र वडजे, सोलापूर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, भारत स्कॉउट गाईड संघटक अनुसया सिरसाठ, श्रीधर मोरे, पतंजली योग पीठचे रघुनंदन भुतडा, रघुनंदन बनसोडे, विवेकानंद केंद्राचे रवी कंटली, महेश गोंजारी, योग साधना मंडळचे रोहिणी उपळाईकर, भारतीय योग संस्थाचे दत्तात्रय चिवडशेट्टी, गीतापरिवार सर्व कल्याण योगचे संगीता जाधव, सर्वोदय योग मंडळाचे जीवनकुमार अवताडे इत्यादी अधिकारी आणि योग संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

सोलापुरातील लोकप्रतिनिधी व क्रीडाधिकारी

# शनिवारी साधणार थेट खेळाडूंशी संवाद

■ **क्रीडा क्षेत्रातील विविध अडचणी जाणून घेणार**

**सोलापूर, दि. १८ जून-**

ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने शनिवार २१ जून रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत जागतिक योग दिनानिमित्त सोलापुरातील लोकप्रतिनिधी यांचा विविध क्षेत्रातील खेळाडूंची संवाद कार्यक्रम आयोजित केला आहे. यावेळी लोकप्रतिनिधी खेळाडूंच्या अडचणी जाणून घेणार आहेत, अशी माहिती असोसिएशनचे राज्य सचिव अश्विन कडलासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रंगभवन चौक येथील समाज कल्याण केंद्रात संवाद कार्यक्रम होणार आहे. सोलापुरात अनेक प्रतिभावंत खेळाडू आहेत. त्यांना आणि प्रशिक्षकांना विविध सोयी सुविधा मि ळणे आवश्यक आहे. या खेळाडूंना सराव करण्यासाठी मैदानांसह विविध सुविधांची गरज आहे. अनेक साधने उपलब्ध नाहीत. या अडचणी आणि समस्या लोकप्रतिनिधी थेट खेळाडूंशी संवाद साधून जाणून घेणार आहेत. सोलापुरात अशा प्रकारचा उपक्रम प्रथमच राबविण्यात येत आहे. यावेळी खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष शिवराज भोसले यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस संजय साळुंखे, अनंत चव्हाण, सागर अतनुरे आदी उपस्थित होते.

### कोण संवाद साधणार खेळाडूंशी

खासदार प्रणिती शिंदे, आमदार विजयकुमार देशमुख, देवेंद्र कोठे, राष्ट्रवादी जिल्हा प्रमुख संतोष पवार, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, पालिका क्रीडाधिकारी भूषण जाधव, जिल्हा मुख्य कार्यकारी क्रीडाधिकारी दत्ता वरकड

# योगाची माहिती व जाणीव जागृतीसाठी सोलापुरात योग दिंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

भारतीय योगाची माहिती व जाणीव जागृती व्हावे या उद्देशाने केंद्र शासनाचे माहिती व प्रसारण मंत्रालय, केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर आणि योग दिवस समन्वय समिती, सोलापूर यांच्या सयुंक्त विद्यमाने आज सकाळी ०७.०० वाजता ह.भ.प. आप्पाराव बचुटे उद्यान, दमाणी नगर, सोलापूर येथे योग दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.



सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे आणि सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव यांच्या हस्ते योग दिंडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. योग दिंडीची सुरुवात आप्पाराव बचुटे उद्यान येथून पावन गणपती- लक्ष्मी नगर- गंगा नगर-जगताप हॉस्पिटल-मरीआई चौक-सन सिटी रोड मार्गे परत येऊन आप्पाराव बचुटे उद्यान येथे समारोप करण्यात आला. दिंडीमध्ये योग समन्वयक मनमोहन भुतडा, दत्तात्रय चिवडशट्टी, रोहिणी उपळाईकर, जीवनकुमार अवताडे, जितेंद्र म ाहमुनी, अशोक गरड, रघुनंदन भुतडा, सतीश घोडके, जे एम हन्नुरे आणि योग संस्थेचे पदाधिकारी, लहान मुले, युवक आणि नागरिक सहभागी झाले होते.

# वॉरियर्स व पँथर्स संघाचे विजय

## निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीची आंतर क्लब १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा





**सोलापूर, दि. १८ जून-**

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आयोजित आंतर क्लब १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत वॉरियर्स व पँथर्स संघाने शानदार विजय मिळविले.

डोणगाव रोडवरील पुष्प जिम खानाच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेतील बुधवारी झालेल्या सामन्यात अभिराज कापसेच्या चार बळीच्या जोरावर वॉरियर्सने रायडर्स संघावर ८ धावांनी मात केली. दुसऱ्या सामन्यात कबीर कीर्तीकरच्या शानदार ७६ धावांच्या खेळीमुळे पँथर्सने रायडर्सवर ६ गडी राखून विजय मिळविला. अभिराज व कबीर साम न्याचे मानकरी ठरले. पंच म्हणून गणेश पवार व प्रवीण कुलकर्णी यांनी काम पाहिले.

**वॉरियर्स** : ३० षटकांत ५ बाद १५६ (सुजल गायकवाड ३७, धेनेश्वरी घोंगडे नाबाद १५,आदित्य सुरवसे २-१९, मल्हार गायकवाड २-२८, पुरणचंद्र १-२) वि. वि. **रायडर्स** : २६. ३ षटकात सर्वबाद १४८ (व्यंकटेश गाडगे ३२, प्रतीक पाटील ११, अनिश बिरुळी १०, शांभवी शिंदकर १०, अभिराज कापसे ४-३३, स्वयम पवार अंशुल गवळी सुजल गायकवाड प्रत्येकी एक बळी).

**रायडर्स** : ३० षटकात ९ बाद १३७ (पुरणचंद्र नाबाद ३४, अनिश बिरुळी २४, अर्थव हालकुरकी ३-२९, हिमांशू गटकरी २-१६, कबीर कीर्तीकर, मुयरेश सुरवसे, सोहम हिरेमठ अर्थव पाटील प्रत्येकी एक बळी) पराभूत विरुद्ध **पँथर्स** : १५.२ षटकात ४ बाद १३८ (कबीर कीर्तीकर ७६, अथर्व पाटील नाबाद ३५, प्रतीक पाटील २-१३, अनिश बिरोळी, शांभवी शिंदकर प्रत्येकी एक बळी)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### डीबीए समूहाच्या वतीने राजमाता जिजाऊ यांची पुण्यतिथी साजरी

**परांडा, दि. १८ जून-**

परांडा येथील शासकीय विश्राम गृह येथे डी.बी.ए समूहाच्या वतीने ३५१ वी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी माननीय डी.बी.ए समूह संस्थापक अध्यक्ष दयानंद बनसोडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष राहुल बनसोडे अपंग संघटनेचे जिल्हाध्यक्ष उत्तम शिंदे, महात्मा फुले समता परिषद जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, प्रहारचे जिल्हा संपर्क प्रमुख नागनाथ नरोटे, चर्मकार संघटनेचे तालुकाध्यक्ष कानिफनाथ सरपने, ॲड. दयानंद धेंडे यांनी सामुदायिक राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे दीपप्रज्वलन करून पूजा केली. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, भारत भोसले, धर्मराज नरोटे, संतराम पाटील, अविनाश ओव्हाळ, छगन चौधरी, जेजेराम कांबळे, विकास सोनवणे, समाधान सूर्यवंशी, उत्तम गायकवाड उपस्थित होते. आभार दयानंद बनसोडे यांनी मानले.

### बसमध्ये चढताना मोबाईल पळवला

**सोलापूर :** सोलापूर एसटी स्टँड येथे तुळजापूरला जाण्याकरिता फिर्यादी गायत्री भारत इंगळे (वय-२३,रा.देताळ नगर,समाज मंदिर जवळ तालुका तुळजापूर,जिल्हा धाराशिव) ही तरुणी बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन तिच्या जवळील ७० हजार रुपये किमतीचा महागडा मोबाईल अज्ञात चोरून नेल्याची घटना ३ एप्रिल रोजी सकाळी नऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास एसटी स्टँड येथे घडली. याप्रकरणी गायत्री इंगळे हिने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, तिच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भद्रशेट्टी हे करीत आहे.

## निधन वृत्त...

### शांतबाई हत्तूरे



**अक्कलकोट, दि.१८ जून -**

येथील पंचायत समितीचे निवृत्त अधिकारी इरय्या राचय्या हत्तुरे मामा यांचे धर्मपत्नी शांताबाई इरय्या हत्तुरे (वय ७५ )यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक सिद्धेश्वर हत्तुरे यांचे त्या मातोश्री होत.

### सुमन डाळवाले



**सोलापूर, दि. १८ जून-**

सुमन हरिसिंग डाळवाले (वय ८४) रा. सलगरवाडी, डोणगांव रोड यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दोन सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सलगरवाडीमधील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरचे विश्वस्त हभप कीर्तनकार शामसिंग डाळवाले यांच्या त्या मातोश्री आहेत.

### राजू विजापूरे



**सोलापूर, दि. १८ जून-**

राजू महिबूब विजापूरे (वय ५० वर्ष) रा. सलगरवाडी डोणगांव रोड, यांचे अल्प आजारामुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, भाऊ असा परिवार आहे. माजी नगरसेवक इब्राहिम विजापूरे यांचे ते धाकटे बंधू आहेत.

### मालन कवठेकर



**सोलापूर, दि. १८ जून-**

गुंजेगाव जिल्हा परिषद शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका मालन बाबुराव कवठेकर (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने मंगळवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास गवळी वस्ती, दमाणी नगरातील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सकाळी कोयनानगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### ज्ञानेश्वर कोरे



**अकलूज, दि. १८ जून-**

येथील वीरशैव लिंगायत समाजाचे कार्यकर्ते व भुसार मालाचे व्यापारी ज्ञानेश्वर रामचंद्र कोरे उर्फ माऊली. वय ५५ यांचे बुधवार दिनांक १८ जून रोजी निधन झाले. त्यांच्यामागे आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन बंधू असा परिवार आहे. अकलूज येथील लिंगायत स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### चंद्रकांत गवळी



**वैराग, दि. १८ जून-**

वैराग (ता.बार्शी) येथील चंद्रकांत पंढरीनाथ गवळी (५७) यांचे सोमवार दिनांक १६ जून २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, वडील व दोन भाऊ असा परिवार आहे. ते वाळूज प्रशाला वाळूज येथे हिंदी विषयाचे शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या जाण्याने वैराग ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली आहे.

### शरणबसवेश्वर अजगोंड



**सोलापूर, दि. १८ जून-**

कै. शरणबसवेश्वर काडप्पा अजगोंड (वय ४४) यांचे अकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, बहीणी, पत्नी असा परीवार आहे. त्यांची अंत्यविधी मणूर येथे करण्यात आले. सोमशेखर भोगडे यांचे मेव्हणे होते.

# 'नो व्हेईकल झोन'चा आदेश कागदावरच

## मंदिर परिसरात अधिकारी, भाविकांच्या वाहनांचा वावर, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ जून-**

आषाढी यात्रेसाठी येथे येणाऱ्या भाविकांना गर्दीचा त्रास नको म्हणून विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर 'वाहन प्रतिबंधक क्षेत्र' (नो व्हेईकल झोन) म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडून घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार, चौफाळा ते मंदिर आणि महाद्वार मंदिर परिसरात वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांचा 'नो व्हेईकल झोन'चा आदेशाला चक्क केराची टोपली दाखवित मंदिर परिसरात वाहनांची बिनधास्त वाहतूक सुरू आहे. पोलिस तसेच वाहतूक पोलिस छत्रपती शिवाजी महाराज चौकात तसेच गोपाळकृष्ण मंदिर परिसरात उभे असताना त्यांच्या डोळ्या समोरुन अधिकारी, भाविक आणि काही हेकेखोर स्थानिक नागरिकांची





वाहने विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात बिनदिक्कतपणे ये-जा करीत असल्याचे दिसत आहे.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांना जास्तीत जास्त सुविधा पुरविण्यासाठी प्रशासनाकडून कसोशीने प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून जिल्हाधिकारी जिल्ह्याचा दैनंदिन कारभार पहात एक, दोन दिवसाला पंढरपूरला भेट देत आहेत. या भेटीत ते स्वत: फिरुन भाविकांना आणखीन काय सेवासुविधा पुरविणे शक्य आहे याची ते चाचपणी देखील करीत आहेत. त्यामुळेच यात्रेच्या काळातील येथील वास्तव्यात भाविकांना चालताना कोणताही त्रास होऊ नये यासाठी चौफाळा ते महाद्वार हा परिसर 'नो व्हेईकल झोन' म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी घोषित केला आहे. या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची वाहने आणण्यास सक्त मनाई आहे. असे आदेश असतानाही मंदिर परिसरात दुचाकी, चारचाकी, टमटम आणि अधिकाऱ्यांच्या गाड्या सर्रास ये-जा करत आहेत.

यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची मंदिर परिसरात कोठेही अंमलबजावणी होताना दिसत नाही. मंदिर परिसरात त्वरित वाहनांना बंदी घालावी आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे, अशी मागणी पंढरपूरातील सुज्ञ नागरिक तसेच वारकरी भाविकांमधून होत आहे.

> विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर हा 'नो व्हेईकल झोन' म्हणून जाहीर करण्यात आला आहे. असा आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी काढला आहे. मंदिर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे वाहन जाता कामा नये. या आदेशाचे प्रशासनाने, भाविकांनी आणि स्थानिक नागरिकांनी तंतोतंत पालन करावे; अन्यथा आदेशाचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.
>
> **- विश्वजीत घोडके,**
> **शहर पोलीस निरीक्षक, पंढरपूर**



# स्वामी सेवेतील निष्ठा व तपश्चर्या सेवकांना प्रेरणादायी

■ **पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ जून-**

दत्त सांप्रदायामध्ये अक्कलकोटचे श्री. स्वामी समर्थ महाराजांच्या दरबारातील सेवा व तपश्चर्या आध्यात्मिक क्षेत्रातील सेवकांना प्रेरणादायी असल्याचे मनोगत पुणे-कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटूंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने चेअरमन महेश इंगळे यांनी पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी व कुटूंबियांचा श्री स्वामी समर्थांचे कपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. याप्रसंगी पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी बोलत होते. यावेळी अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार, नॉर्थ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, प्रथमेश इंगळे, विश्वस्त महेश गोगी, पांडुरंग पाटील, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, दर्शन घाटगे व अन्य उपस्थित होते.

## भरधाव वेगात वाहन चालवून अपघात; वाहन चालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर,दि.१८ जून-**

भरधाव वेगाने वाहन चालवून अपघात करून दुखापत केल्याप्रकरणी वाहन क्रं.एम एच.११.ए.डब्लू.२७२६ यातील चालक याच्याविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १४ जून रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास विजापूर रोड सोलापूर हायवे रस्त्यावर घडली. याप्रकरणी सिद्धाराम अशोक पारेकर (वय-३०,रा. औराद, ता. दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की फिर्यादी व हुसेनबाशा बाबूलाल सय्यद हे दोघे फिर्यादी यांच्या दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीएस.८४०८ या वरून बसून जात असताना वळकबाळ येथे विजापूर रोड हायवे रोडने कुलकर्णी तांडा मार्गे कुमठा गावाकडे जात असताना फिर्यादी यांनी इंडिकेटर व उजवा हात दाखवून दाखवला असताना वरील संशयित वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांना धडक देऊन दुखापत करत जखमी होण्यास कारणीभूत ठरला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.




# बार्शी-परांडा ड्रग्स रॅकेट उघड करणाऱ्या बार्शी पोलिसांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १८ जून-**

बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने उघडकीस आणलेल्या बार्शी-परांडा ड्रग्स रॅकेट प्रकरणातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल बार्शी पोलिसांना विशेष सन्मान मिळाला आहे. कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या हस्ते बार्शी शहर पोलीस ठाण्यास 'गौरवपत्र' बहाल करण्यात आले. दि. १७ एप्रिल रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर पोलीस निरीक्षक श्री. बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. परांडा रोडवरील पेट्रोलपंपाजवळ रचलेल्या सापळ्यात तीन आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून २०.०४ ग्रॅम मॅफेड्रॉन (एम.डी.), १ गावठी पिस्तूल, ३ जिवंत राऊंड, मोबाईल हँडसेट्स, वजन काटा, रोख रक्कम व टोयोटा कार असा सुमारे १८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या कारवाईच्या पुढील तपासादरम्यान एकूण १३ आरोपींचा तपास लावण्यात आला असून त्यापैकी १० जणांना अटक करण्यात आली आहे. तांत्रिक विश्लेषण, आर्थिक व्यवहारांचा तपास, फॉरेन्सिक साक्ष्य व पुराव्यांच्या आधारे संबंधितांविरुद्ध NDPS act कलम ८(क), २२(ल), २९, भा.दं.वि. १२०(इ) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई अमली पदार्थ विरोधी अभियानासाठी एक प्रेरणादायी पाऊल ठरली असून, बार्शी पोलिसांचे नियोजनबद्ध व तांत्रिक तपास कौशल्य याचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे.

# बार्शीत जुगार अड्ड्यावर छापा; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१८ जून-**

बार्शी शहरातील अनवेकर हॉस्पिटलसमोरील चौकात पानटपरी शेजारी अवैध जुगाराचा अड्डा चालत असल्याची गोपनीय माहिती बार्शी शहर पोलिसांना मिळाली. शनिवारी सायंकाळी ६.४० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी घटनास्थळी छापा घालून जुगार खेळणाऱ्या काही व्यक्तींना ताब्यात घेतले. या कारवाईनंतर बार्शी शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत पुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई शहरातील अवैध जुगाराच्या कारवायांना आळा घालण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बार्शी शहरातील पश्चिम दिशेला, बार्शी शहर पोलीस ठाण्यापासून अवघ्या १ किलोमीटर अंतरावर असलेल्या अनवेकर हॉस्पिटलसमोरील चौकात पानटपरी शेजारी काही व्यक्ती जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. ही माहिती लेखी स्वरुपात शनिवारी सायंकाळी ७.२२ वाजता पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्वरित कारवाई करत घटनास्थळी छापा घातला. छाप्यादरम्यान, जुगार खेळण्याचे साहित्य जप्त करण्यात आले आणि काही व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले.

या घटनेनंतर, बार्शी शहर पोलीस ठाण्यात नवीन संहिता (बी.एन.एस.एस.) च्या कलम १७३ अंतर्गत आणि महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ च्या कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी जप्त केलेल्या साहित्याची तपासणी सुरु केली असून, ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची चौकशी केली जात आहे. या कारवाईमुळे शहरातील अवैध जुगाराच्या कारवायांवर नियंत्रण मिळवण्यास मदत होईल, अशी अपेक्षा शहरवासियांतून व्यक्त होत आहे.



# दत्त विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

**बार्शी, दि. १८ जून-**

येथील दत्त प्राथमिक विद्यामंदिरमध्ये प्रवेशोत्सवानिमित्त नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन व पुष्पवृष्टी करत स्वागत करण्यात आले. पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. इयत्ता पहिलीचा वर्ग सुसज्जपणे फुगे, रांगोळी, पानाफुलांची तोरणे बांधून सजविण्यात आला. विद्यार्थांचे सेल्फी पॉईंटवर फोटो काढण्यात आले. यावेळी प्रमुख पाहणे छत्रपती क्रीडा, शिक्षण व समाजसेवी संस्थेच्या सचिवा तेजस्वी ठोंगे तर प्रमुख उपस्थिती म्हणून दिलीपराव सोपल प्रशालेचे मुख्याध्यापक सचिन काळे, दत्त प्राथमिकचे श्रीकांत कुंभारे, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगीता काळे होत्या. व दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते. खाऊ वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सूत्रसंचालन अरुणा मठपती व आभार प्रदर्शन सुनिल लंगोटे यांनी केले. संगीता काळे, अरुणा मठपती, ललिता चव्हाण, श्रीकांत कुंभारे, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, युवराज जगताप, चंद्रकांत लोखंडे, सचिन काळे, संतोष ठोंबरे, शितल पाटील, संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण यांनी सहकार्य केले.

# सांगोला विद्यामंदिरचे एमएचटी-सीईटी परीक्षेत यश

**सांगोला, दि. १८ जून-**

महाराष्ट्र शासनातर्फे स्टेट कॉमन एट्रन्स टेस्ट सेल कडून घेण्यात आलेल्या पीसीबी-एम एचटी-सीईटी परीक्षेत सांगोला विद्यामंदिर ज्यु.कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. यामध्ये अस्मिता श्रीमंत टकले ९३.९५, तनुजा सुनील खटके ९०.३८, सानिका संतोष गायकवाड ९०.१५ पर्सेंटाइल मिळवत सुयश संपादन केले. तसेच ९ विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा जास्त पर्सेंटाइल मिळविले. या सर्व विद्यार्थ्यांना ज्यु.कॉलेज मधील शास्त्र शाखेतील व मेरिट हाऊस शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सां. ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म.शं.घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे यांनी अभिनंदन केले.

# महात्मा फुले विद्यालय गुणवत्ता देणारी शाळा

## माजी आमदार दत्तात्रय सावंत; दहावी, बारावीमधील गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. १८ जून-**

टेंभुर्णी सारख्या ग्रामीण भागात देखील शहरी भागासारखी उत्कृष्ट गुणवत्ता महात्मा फुले विद्यालयामध्ये पहावयास मिळते. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांचा देखील सन्मान करणारी शाळा असल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. शाळेला येणाऱ्या विविध अडीअडचणी सोडवण्यासाठी मदत करणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार दत्तात्रय सावंत यांनी केले.

टेंभुर्णी येथे महात्मा फुले विद्यालयात इयत्ता दहावी बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ तसेच इयत्ता पाचवी व आठवीतील स्कॉलरशिप पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सावंत बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माढा पंचायत समिती कुर्डूवाडीचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव उपस्थित होते. विद्यालयाचा इयत्ता दहावीचा




विद्यार्थी सुदर्शन उंबरे बोर्ड परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवून महाराष्ट्रात सर्वप्रथम आला त्यास रोख रुपये ४६, ००० देऊन गौरविण्यात आले. विषयानुसार पैकीच्या पैकी गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनाही बक्षीस देण्यात आली. संस्थेकडून तीन लाख पन्नास हजार रुपयांची बक्षीसे यावेळी दिली गेली. विद्यालयाची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी गाथा खडके हिची जागतिक आर्चरी वर्ल्ड कप स्पर्धेसाठी कॅनडा येथे निवड झाल्याबद्दल बक्षीस देऊन तिचा सन्मान करण्यात आला. प्रस्ताविक संस्थेचे अध्यक्ष नारायण भानवसे यांनी केले. अध्यक्षीय भाषण गटशिक्षणाधिकारी विकास यादव यांनी केले. यावेळी आमदार अभिजीत पाटील यांचे बंधू अमर पाटील, टेंभुर्णीतील ज्येष्ठ नेते प्रभाकर कुटे, पंचायत समिती सदस्य वैभव बापू कुटे, कृती समितीचे दत्तात्रय ननवरे सर, डीव्हीपीचे चेअरमन औदुंबर देशमुख, माजी मुख्याध्यापक पोपट भोसले, सिद्धेश्वर शिंदे, सुलोचना माळी, रुक्मिणी वाघे, केशव माळी, ज्योती यादव, मुख्याध्यापक विजय यादव, मुख्याध्यापक शोएब बागवान, कॉर्डिनेटर माऊली पवार, ज्ञानेश्वरी जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन शरद सातव व अनंत घळके यांनी केले.




# 'सुयश' मध्ये फुलांच्या वर्षावात प्रवेशोत्सव

**बार्शी, दि. १८ जून-**

सुयश विद्यालय, बार्शी येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे ढोल ताशाच्या गजरात, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव करत स्वागत केले. कार्यक्रमासाठी पत्रकार संजय बारबोले, विनोद ननवरे, धीरज शेळके, गणेश शिंदे, विजय शिंगाडे, अभिजीत शिंदे, शंकर लाखे तसेच संस्थेचे संस्थापक नलवडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक उपस्थित होते. नवीन विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता. तसेच लहान मुलांना आकर्षण वाटणाऱ्या मोटू पतलू कार्टून जोडीने मुलांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना चॉकलेट, फुगे देण्यात आले. खेळण्यासाठी चिल्ड्रन पार्क तयार करण्यात आला असून यामध्ये लहान मुलांचे खेळण्याचे विविध साहित्य देखील आहे.

# ‘बापूं’सोबत चर्चा झाली पण निर्णयास आठ दिवस लागतील : काका साठे

## ●थेट पवारांचा फोन आल्याने काकांचा पक्षबदलाचा निर्णय लांबणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

शेवटचा श्वास असेपर्यंत राष्ट्रवादीचे संस्थापक अध्यक्ष शरद पवारांसोबतच राहणार असे म्हणणारे राष्ट्रवादीचे नेते बळीरामकाका साठे दोन दिवसांपूर्वी शरद पवारांच्या विरोधात बोलू लागले होते. कारणही तसेच होते...न सांगता त्यांना जिल्हाध्यक्ष पदावरून काढल्याने ते आणि त्यांचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. त्यामुळे पक्ष सोडण्याची तयारी काका साठे यांनी केली आणि त्याची चर्चाही सुरु झाली.

नाराज काकांचे भाचे तथा माजी मंत्री आ. सुभाष देशमुख काकांच्या भेटीला वडाळ्यात गेले आणि बापूंनी बोलत-बोलत भाजपात येण्याची ऑफर दिली. मात्र राजकारणातील चतुर काकांना (बापूंच्या मामांना) थेट शरद पवारांनीच भेटण्याचे आमंत्रण दिल्याने काका साठे यांनी सध्या तरी बापूंच्या ऑफरला चार-आठ दिवस वेंटिंगवरच ठेवल्याचे समजते. काकांनी दै. तरुण भारतशी बोलताना सांगितले की, बापूंची भेट झाली...चर्चाही झाली... मात्र निर्णयास चारआठ दिवस लागतील... असे सांगितले आहे. म्हणजेच पवारसाहेबांनी काकांना वाऱ्यावर नाही सोडले तर पुन्हा काका राष्ट्रवादीतच राहणार की काका रागात पक्ष बदलणार? याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. हायकमांड शरद पवार यांनी काका साठेंना जिल्हाध्यक्ष पदावरून दूर केल्याने ते नाराज दिसत होते. यामुळे त्यांनी



पक्ष सोडण्याची भूमिका त्यांनी कार्यकर्त्यांसमोर मांडली. याबाबत बैठक घेवून पदाधिकाऱ्यांशीही चर्चाही केली. काकांचे कार्यकर्ते आणि समर्थकांची बैठक घेऊन एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाण्याचा निर्णय पक्का केला. दरम्यान, बुधवारी संजय पाटील घाटणेकर यांनी बारामतीमध्ये जाऊन शरद पवारांची भेट घेतली आणि सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी आणि काकांचे गाऱ्हाणे त्यांच्यासमोर मांडले. विशेष करून ज्येष्ठ नेते बळीराम काका साठे यांची नाराजी पक्षासाठी योग्य नाही, ते ज्येष्ठ आहेत त्यांना थांबवावे याबाबत आपण त्यांच्याशी बोलावे, अशी विनंती केली. त्याचवेळी शरद पवार यांनी काका साठे यांना फोन लावून भेटायला या... असे सांगितले. इतकेच नाहीतर काका साठे यांना मी वाऱ्यावर सोडणार नाही, असा शब्दही दिल्याचे घाटणेकर यांनी सांगितले. दरम्यान, बुधवारी सकाळीच राज्याचे माजी सहकार मंत्री तथा दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुभाष देशमुख यांनी वडाळ्यामध्ये जाऊन काका साठे आणि जितेंद्र साठे यांची भेट घेतली. या भेटीची चर्चा सोलापूरच्या राजकारणात सुरू आहे. काका साठे हे शरद पवार यांची भेट घेण्यासाठी गुरुवारी बारामतीला जाणार असल्याचे समजते. या भेटीनंतर काका साठे काय निर्णय घेतात? याचे औत्सुक्य आहे.



# शरद पवार हीच आपली ताकद!

## ●महापालिका निवडणुकीसाठी कामाला लागा
## ●राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्यावतीने सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने महापौर बंगला येथील पक्ष कार्यालयात शहर अध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. शरद पवार ही आपली ताकद असून जोमाने कामाला लागा. महापालिका निवडणुकांचे बिगुल कधीही वाजू शकते, त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागण्याच्या सूचना बैठकीत करण्यात आल्या.

यावेळी नूतन शहर युवक अध्यक्ष सरफराज शेख व युवक कार्याध्यक्ष राम पवार यांचा सत्कार करण्यात आला. श्री. खरटमल तसेच मनोहर सपाटे, यु एन बेरिया यांनी कार्यकर्त्यांना येणाऱ्या महापालिका निवडणूक आणि प्रभाग रचनेसंदर्भात सूचना व मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी काही अडचणी मांडल्या.

यावेळी भारत जाधव, शंकर पाटील, दिनेश शिंदे, संजय जाबा, चंद्रकांत पवार, राकेश सोनी, सुनील इंगळे, प्रवीण वाडे, शेरु कुरेशी, रामप्रकाश शागालोलु, युनूस मुरसशद, गब्बर सय्यद, नूर नदाफ, सोपान थोरात, जावेद खैरदी, जावेद शिकलगर, अक्षय जाधव, संदीप साळुंखे, शक्ती कटकधोंड, सुनीता रोटे, नलिनी चंदेले, मनीषा माने, सिया मुलानी, रेखा सपाटे, सुनीता दळवी, मोनिका सरकार, सुनीता वरगंटी, यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## महत्वाचे...



# डॉ. अंबुरे यांच्या संशोधनाचा शासनाने उपयोग करून घ्यावा : किशोर चंडक

**सोलापूर, दि. १८ जून-**

डॉ. दत्तात्रय अंबुरे यांनी पीएच.डी पदवी मिळवण्यासाठी झोपडपट्टीचा सर्व्हे करून केलेले संशोधन शासनाने समस्या सोडवण्यासाठी उपयोगात आणले पाहिजे, अशी अपेक्षा उद्योजक किशोर चंडक यांनी व्यक्त केली.जागृती पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या ‘झोपडपट्टी.. आपले अर्धे जग’ या पुस्तकाचे प्रकाशन आणि लेखक डॉ. दत्तात्रय अंबुरे यांनी पीएच.डी पदवी संपादन केल्याबद्दल आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. सलगरवस्ती येथील शिव विजय मंगल कार्यालयात हा कार्यक्रम रविवारी सकाळी पार पडला. यावेळी आर्किटेक्ट विश्वकर्मा भिला शार्दुल, इंजिनिअर प्रशांत मोरे, इंजिनिअर कल्पेश जव्हेरी, माजी नगरसेवक सुनिल पाताळे, नर्मदा डेव्हलपर्सचे बजरंग कुलकर्णी, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, राजेंद्र अंबुरे, राधिका महिंद्रकर, सोनाली अंबुरे आदी उपस्थित होते.

**‘झोपडपट्टी.. आपले अर्धे जग’ या पुस्तकाचे प्रकाशन**



# महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १८ जून-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कै. पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या जयंती दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच कै. पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद यांच्या पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी कुलगुरू इरेश स्वामी, महिंद्र वारद,मल्लिकार्जुन कावळे, माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे, सुर्वणा मिरजकर, शोभा बोल्ली, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, मल्लीनाथ शहाबादे, विश्वनाथ साबळे, शिवाजी सुरवसे,सुभाष पाटील, मृगद्रे पाटील, वेदतां पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.




# जिल्हा परिषदेत गुणवंत पाल्यांचा सत्कार

**सोलापूर, दि. १८ जून-**

शिवस्वराज्य दिनानिमित्त माध्यमिक शिक्षण विभाग व मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखेच्या वतीने जिल्हा परिषदेचे कर्मचारी व जिल्हा परिषद बीट पत्रकार यांच्या गुणवंत पाल्यांचा गौरव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे, गायक मोहंमद अय्याज, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, स्वाती हवेले, कर्मचारी महासंघाचे राज्य सचिव दिनेश बनसोडे, सचिन चव्हाण, विशाल घोगरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूर्यकांत मोहिते रवींद्र करजगीकर, रणजीत घोडके, अनिल पाटील श्रीकांत धोत्रे, चेतन भोसले यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन दळवी सर यांनी केले व आभार मेहताब शेख यांनी मानले.

# पंढरपूर व अक्कलकोट वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावेत

**सोलापूर, दि. १८ जून-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत पंढरपूर व अक्कलकोटमध्ये मागासवर्गीय मुलांसाठी शासकीय वसतिगृहातील प्रवेशासाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावरून अर्ज स्वीकारले जात असून, मागासवर्गीय मुलांनी शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन गृहपाल आर.एम. माळी यांनी केले आहे. या वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्य, वातानुकुलीत संगणक कक्ष, सी.सी. टीव्ही कॅमेरा, शुद्ध पिण्याचे पाणी व २४ तास सुरक्षारक्षक इ. सोयी-सुविधा मोफत पुरवल्या जातात.



**सोलापूर : श्री विद्यार्थी सहाय्य बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने दहावी मोफत पुस्तक संचचे वितरण तोगटवीर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री चौडेश्वरी प्रशालेत विद्यार्थी, संस्थेचे संचालक, शिक्षकांच्या उपस्थितीत पार पडले.**

# महिनाभरात शहराचा पाणीपुरवठा एक दिवसाने कमी होणार

## ▶▶चार ऐवजी तीन दिवसात पाणीपुरवठ्याचे नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

येत्या महिन्याभरात सोलापूर शहराचा पाणीपुरवठा अर्धा तास पाणीपुरवठ्याची वेळ कमी करून एक दिवसाने कमी करण्याचा प्रयत्न आहे. यामुळे या भागात पाच दिवसाआड पाणीपुरवठा आहे त्या ठिकाणी चार दिवसाआड आणि ज्या ठिकाणी चार दिवसाआड पाणीपुरवठा आहे त्या ठिकाणी तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी दिली.



महापालिका आयुक्त डॉ. सचिन उंबसे यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत पाणीपुरवठ संदर्भात सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी हे स्पष्टीकरण दिले. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर शहराला लवकरच तीन दिवसाआड पाणीपुरवठा शक्य होणार आहे असे स्पष्ट केले होते. या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात बोलताना चौबे यांनी अधिक माहिती दिली.

उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीची चाचणी प्रक्रिया सुरू आहे. सोरेगाव जल शुद्धीकरण केंद्र येथे दोन दिवसांपूर्वी पाणी पोहोचले आहे. सोलापूर शहराला सध्या पाच ते सहा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. दरम्यान, आता शहराला पाण्याच्या दिवशी साडेतीन तास पाणीपुरवठा केला जातो. महिनाभरात याचे नियोजन बदलण्यात येणार आहे.

साडेतीन तास ऐवजी तीन तास पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. यामुळे शहराला ज्या ठिकाणी पाच दिवसाआड पाणीपुरवठा आहे त्या ठिकाणी चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येईल तर ज्या ठिकाणी चार दिवसाआड पाणीपुरवठा आहे त्या ठिकाणी तीन दिवसात पाणीपुरवठा होईल. अशा पद्धतीने शहराचा एक दिवसाने पाणीपुरवठा कमी करण्यात येणार आहे, असेही आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी स्पष्ट केले.

# बाजारपेठेत फळांची आवक घटली; दरात वाढ

## ▶ईराणी सफरचंदचा पुरवठा घटला; इराण-इस्त्रायल यांच्यातील युद्धाचे बाजारात परिणाम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून**

इराण आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धाचे पडसाद सोलापूरात उमटताना दिसत आहेत. युद्धामुळे ईराणी सफरचंद आणि ईतर फळांची आवक घटली आहे. सफरचंद, खजूर असे विविध फळांचा पुरवठा कमी व मागणी जास्त अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याचे विपरित परिणाम सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या लिलावात पहावयास मिळत आहेत.

दरम्यान, भारतातील शिमला सफरचंद ऑगस्ट महिन्यात तर काश्मीरचे सफरचंद सप्टेंबर महिन्यानंतर बाजारात विक्रीस येतात. त्यामुळे सध्या सोलापूर मार्केट यार्डात ईराणी सफरचंद आणि ईतर फळांची आवक येत असते. मात्र इराण-इस्त्रायल सुरू झालेल्या भीषण युद्धामुळे भारतातील बाजारपेठेवर परिणाम जाणवू लागले आहेत. घाऊक व किरकोळ बाजारात फळांची मागणी वाढली आहे. आवक नसल्याने दरात तेजी निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

### बाजार फळांची आवक कमी

बाजार समितीच्या फळ मार्केटमध्ये सफरचंद तसेच विविध फळांची आवक मंदावली असून याचा फटका किरकोळ फळ विक्रेत्यांसह ज्यूस सेंटरवर देखील जाणवत आहे. फळांच्या कमतरतेमुळे फळ आणि ज्युस विक्रेत्यांवर संक्रांत ओढवत चालली आहे.

**- रफीक बागवान, फळ विक्रेते**

### फळांचे दर वधारले

सफरचंदचे प्रति १० किलोच्या पेटीचे पूर्वीचे दर हे १,१००रु. होते. तेच दर आता १,६०० रू पर्यंत वाढले आहेत. मागणी जास्त आणि आवक कमी झाल्याने बाजारात तेजीची परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच किवी आणि ड्रॅगन फळांची आवक कमी झाली आहे. विविध आजारांवर किवी फळ उपायकारक असल्याने त्याची मागणी देखील वाढली आहे. मात्र किवी बाजारात दिसेनासे झाले आहेत. किवीचे पूर्वीचे दर १,२०० रु १८ डब्याची पेटी असे होते. ते आता २,८०० रु इतके झाले आहेत. तसेच डाळिंबाचे पूर्वीचे दर ९० रु होते. ते आता ते २०० रु. इतके झाले आहेत.

**- राजेश पाटील, प्रियंका ज्यूस अँड फ्रुट्स**

# सयाजीराजे पार्कमध्ये पाळणा तुटून एकाचा मृत्यू

**अकलूज, दि. १८ जून-**

आनंदनगर येथील सयाजीराजे वॉटर पार्क खेळाच्या विभागातील अक्टोपझी पाळण्यातुन पडल्याने एकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी झाला असून दवाखान्यातील नोंदीवरून अकलूज पोलीस ठाण्यात अकस्मित मयत दाखल नोंद झाली आहे.

अकलूज पोलीसाकडून मिळालेल्या माहितीनुसार बुधवार १८ जुन रोजी सकाळी ११च्या सुमारास आनंदनगर येथील सयाजीराजे वॉटर पार्क या मनोरंजनात्मक खेळ विभागातील अक्टोपझी या पाळण्यातुन तुषार धुमाळ (वय ३५, रा. भिगवण जि.पुणे) व वैभव आप्पा रुपनवर (रा. डोंबाळवाडी, रा.माळशिरस) हे पडल्याने डोक्याला मार लागुन जखमी झाले. या अवस्थेत दोघांना उपचारासाठी संग्रामनगर येथील अश्विनी या खाजगी रुग्णालयात आणले असता तुषार धुमाळ उपचारापुर्वी मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. पुढील तपास पो.हे.कॉ. एम. एम. बागडे हे करीत आहेत.

# समृद्ध फडे यांचे एलएलबी परीक्षेत यश

**माळीनगर, दि. १८ जून-**



येथील समृद्ध शिरीष फडे यांनी पुणे येथील मॉडर्न लॉ कॉलेज येथून कायद्याची पदवी एलएलबी प्रथम श्रेणी उत्तीर्ण होऊन उज्वल यश मिळवले. समृद्ध फडे याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण माळीनगर येथील गुलमोहर इंग्लिश स्कूल येथे झाले तर मराठवाडा मित्र मंडळ कॉमर्स कॉलेज पुणे येथून त्याने वाणिज्य शाखेची पदवी मिळवली पुढे त्यांनी मॉडर्न लॉ कॉलेज येथे कायद्याचे शिक्षण घेऊन प्रथम श्रेणीत एलएलबी कायद्याची पदवी मिळवली समृद्ध हा माळीनगर येथील प्रसिद्ध व्यापारी शिरीष फडे यांचा मुलगा आहे.



# ‘दक्षिण’मधील प्रलंबित प्रश्न सोडवू

## ●महसूलमंत्र्यांचे आ. सुभाष देशमुखांना आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध प्रलंबित विषयांवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबईतील मंत्रालयात बैठक घेतली. या बैठकीस आ. सुभाष देशमुख उपस्थित होते. आ. देशमुख यांनी मंद्रूप येथे दुय्यम निबंधक कार्यालय व प्रशासकीय कार्यालय सुरू करावे, जुळे सोलापुरात नाट्यगृहास जागा मिळावी यासह विविध मागण्या केल्या. या मागण्यांचा विचार करून हे प्रलंबित प्रश्न सोडवू, असे आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज (दि. १८) दिले.

यावेळी आमदार देशमुख यांनी दक्षिण सोलापूर या त्यांच्या मतदारसंघातील इतरही काही प्रश्न मांडले. यामध्ये सोलापूर मनपा क्षेत्रात नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकाकडून वार्षिक मूल्यदरात केलेली दरवाढ कमी करावी, मजरेवाडी येथील सर्वे नंबर ५९० ते ५९४ मधील २२ गृहनिर्माण संस्थांना घरे खरेदी-विक्रीसाठी परवानगी मिळावी, मंद्रूप येथे दुय्यम निबंधक कार्यालय व प्रशासकीय कार्यालय सुरू करावे, जुळे सोलापुरात नाट्यगृहास जागा मिळावी यासह विविध मागण्या आ. देशमुख यांनी केल्या. या मागण्यांचा विचार करून लवकरात लवकर आवश्यक उपाययोजना करणार असल्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी आश्वासन दिल्याने या मतदारसंघातील वरील कामे लवकर मार्गी लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# सहकारी बँकांच्या संचालक मंडळाचे प्रशिक्षण शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

महाराष्ट्र अर्बन को ऑप बँक्स फेडरेशन लि. मुंबई व सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण शिबिर झाले. बँक्स असोसिएशन अध्यक्ष प्रकाश वाले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष दि महाराष्ट्र अर्थन को ऑप बँक्स फेडरेशन अध्यक्ष सीए अजय ब्रम्हेचा, सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांचे स्वागत व सत्कार केला.



बँक्स असोसिएशनचे संचालिका संगीता फाटे यांनी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया उपमहाव्यवस्थापक माला शिरिष लाल यांचे स्वागत व सत्कार केला. बँक्स असोसिएशनचे संचालक सीए किसन माळी यांनी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते सी.ए. धनंजय गोखले, बँकीग तज्ञ पुणे यांचे स्वागत व सत्कार केला. बँक्स असोसिएशनचे संचालक राजगोपाल झंवर यांनी फेडरेशनचे मुख्य कार्यकारी व सचिव प्रसाद पाटील यांचे स्वागत सत्कार केले. संचालक शंकर पाटील यांनी सहकारी संस्था उपनिबंधक उमेश पवार यांचा सत्कार केला. फेडरेशनच्या वतीने अध्यक्ष सीए प्रकाश वाले, संचालक सीए राजगोपाल मिणीयार व सीईओ शुभांगी ढवळे यांचा सत्कार केला. संचालक दिपक मुनोत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माला शिरिष लाल यांनी रिस्क बेस्ड इंटरनल ऑडिट व कॉर्पोरेट गर्वांनन्स या विषयावर बोलताना ‘‘संचालक मंडळाने कोणती काळजी घ्यावी व संचालक मंडळाच्या सभेमध्ये कोणकोणत्या विषयांवर चर्चा करावी या विषयावर तसेच बँकेला आर्थिक दंड लागू नये यासाठी कोणती काळजी घ्यायला हवी याचे विवेचन केले.‘

बैंकिंग तज्ञ, पुणे सीए धनंजय गोखले यांनी ‘‘बँकेने स्वतःचे ताळेबंदपत्रक, नफा-तोटा पत्रक व त्यासंबंधीत विविध रेशो व त्यांचा अर्थ त्यांनी समजावून सांगितला.’’ असोसिएशनचे संचालक सी.ए. राजगोपाल मिणीयार यांनी प्रास्ताविक केले. फेडरेशनचे मुख्य कार्यकारी व सचिव प्रसाद पाटील यांनी पाहुण्यांच्या परिचय करून दिला. यावेळी असोसिएशनचे अस्मिता गायकवाड, दिनकर देशमुख आदी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी ढवळे यांनी सुत्रसंचालन केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जागतिक लिंगायत महासभेच्या महिला शहराध्यक्षपदी डॉ. अंजली शिरसी



**सोलापूर, दि. १८ जून-**
जागतिक लिंगायत महासभा शहर महिला अध्यक्षपदी डॉ. अंजली शिरसी-आलेगावी यांनी निवड करण्यात आली आहे. महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. शिरसी यांचा सत्कार केला. जागतिक लिंगायत महासभेच्या वतीने समाजातील दहावी व बारावी १०१ गुणवंत विद्यार्थ्यांना बसव प्रतिभा पुरस्कार देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी धुत्तरगाव-उस्तरी मठाचे कोराणेश्वर महास्वामी, बसवलिंगेश्वर महास्वामीजी, इंदुमती अलगोंडा-पाटील, विजयकुमार हत्तुरे, शिवानंद गोगाव, काशिनाथ भतगुणकी, विरेंद्र हिंगमिरे, गंगाधर थळंगे, राजश्री थळंगे, नागेंद्र कोगनुरे आदी उपस्थित होते. यावेळी जागतिक लिंगायत महासभेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. जागतिक लिंगायत महासभा सोलापूर शहराध्यक्षपदी राजेंद्र खसगी, महिला शहराध्यक्षपदी डॉ. अंजली शिरसी-आलेगावी, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्षपदी उमेश कल्याणी, सांगोला तालुकाध्यक्षपदी रवींद्र शेठे, जुळे सोलापूर विभागाच्या अध्यक्षपदी चन्नबसप्पा गुरुभेटी यांना निवडपत्र देवून सन्मानित करण्यात आले.



## महत्वाचे...

### कवी संमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळा २६ जूनला

**सोलापूर, दि. १८ जून-**
साहित्य सेवा संघ व तेलुगू भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाकवी कालीदास व राजश्री शाहू महाराज जयंती दिनानिमित्त दत्तात्रय इंगळे यांनी लिहिलेले




पुस्तक 'परिस स्पर्शाच्या पाच कथा' या पुस्तकाचा गौरव समारंभ व सुरेश निकंबे लिखित 'माणुसकीचा निर्मळ झरा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन व कवी संमेलन २६ जून रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालय, जुना वालचंद कॉलेज रोड, श्रीकृष्ण मंदिर अशोक चौक येथे आयोजित केले आहे. कार्यक्रमास ज्येष्ठ कवीवर्य माधव पवार, ज्येष्ठ साहित्यिक अर्जुन व्हटकर, गजलकार बदीउज्जमा बिराजदार, कादंबरीकार डी.एन. जमादार, साहित्यिक नरेंद्र गुंडेली, मल्लिकार्जुन कमटम, तिपण्णा गणेरी, दत्तात्रय इंगळे, कवी राम माने यांची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास बहुसंख्य साहित्यिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विठ्ठल टाक यांनी केले.




### फळपीक विमा योजनेस ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**सोलापूर, दि. १८ जून-**
प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकार कडून फळ पिक विमा भरण्यास मुदतवाढ देण्यात आली असून. फळपिक विमा भरण्याची अंतिम मुदत ३० जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली. पेरू, मोसंबी व लिंबू पिकाचा फळपिक विमा भरण्याची अंतिम मुदत १४ जून २०२५ पर्यंत होती. परंतु ऑनलाईन पोर्टल वरील काही तांत्रिक अडचणीमुळे सोलापूर जिल्ह्यातून बरेच शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिले आहेत. तरी सोलापूर जिल्हातील सर्व डाळिंब, पेरू, लिंबू, विकू सीताफळ व मोसंबी बाग धारक शेतकऱ्यांनी आपल्या फळ बागेचा विमा नजीकच्या कॉमन सर्विस सेंटर, बँक किंवा आपले सरकार केंद्रास भेट देवून आपली फळबाग विमा संरक्षित करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी केले आहे.

# शरद राष्ट्रवादीची जिल्हा कार्यकारणी बरखास्त

**▸▸ प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांचा निर्णय**
**▸▸ लवकरच नूतन कार्यकारणी जाहीर होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ जून -**
सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या बळीरामकाका साठे यांच्या रिक्त झालेल्या जिल्हाध्यक्षाच्या पदावर वसंतराव देशमुख यांची निवड झाल्यानंतर पूर्वीची सोलापूर जिल्ह्यातील सर्व कार्यकारणी प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या सूचनेप्रमाणे बरखास्त करण्यात आल्याची माहिती नूतन जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांनी दिली.





सोलापूर जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचा बालेकिल्ला असून या जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची ताकद मोठ्या प्रमाणात पूर्वीपासूनच दिसून येते. सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी असलेले बळीराम काका साठे यांचे पदावरून पाय उतार झाल्यानंतर सोलापूर जिल्हाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे खंदे समर्थक व सुरुवातीपासून शरदचंद्र पवार यांच्यासोबत असलेले त्याचबरोबर विजयसिंह मोहिते-पाटील व सोलापूर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या नेत्यांशी सलोख्याचे संबंध असल्यामुळे वसंतराव देशमुख यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. या निवडीनंतर प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या सूचनेप्रमाणे सोलापूर जिल्हा कार्यकारणी तसेच सर्व तालुका अध्यक्ष, शहराध्यक्ष कार्यकारणी बरखास्त करण्यात आली आहे. नूतन सोलापूर जिल्हा अध्यक्ष वसंतराव देशमुख हे वरिष्ठ नेत्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच नव्याने सोलापूर जिल्ह्यातील कार्यकारणी निवड करणार आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे. त्याचबरोबर जास्तीत जास्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जागा निवडून आणण्याकरता प्रयत्नशील राहावे, यासाठी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचे संकेत मिळत आहे. नुकतेच सोलापूर जिल्हा कार्यकारणी बरखास्त केल्याची पत्र जिल्हाध्यक्ष वसंतराव दौलतराव देशमुख तसेच कार्याध्यक्ष रवींद्र (भाऊ) शहाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आले आहे.

# नॉर्थकोट तंत्रनिकेतन प्रशाला मुख्याध्यापकाच्या कामाची चौकशी करा


**प्रदेश काँग्रेस कमिटीची मागणी**

**सोलापूर, दि. १८ जून-**
सोलापूर येथील नॉर्थकोट तंत्रनिकेतन प्रशाला आणि औद्योगिक प्रशिक्षण मुलींची संस्था प्राचार्य यांची चौकशी करून त्यांना निलंबित करावे, अशी मागणी कौशल्य विकास संचालनालयाचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे, अशी माहिती प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस शकील मौलवी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्राचार्य पद हे एकाच व्यक्तीकडे सोपविले आहे. गेल्या दोन-तीन वर्षापासून येथे प्राचार्य हे कार्यरत आहेत. त्यांच्याविरुद्ध येथील महिला कर्मचारी आणि निदेशकांच्या तक्रारी आहेत. नॉर्थकोट तंत्रनिकेतन प्रशालेतील मशिनरीची चोरी झाली आहे. ती अद्याप सापडली नाही. त्याला मुख्याध्यापक जबाबदार आहेत, असा आरोप करत त्यांच्या कामाची तातडीने चौकशी करावी. त्यांना निलंबित करण्यात यावे. औद्योगिक प्रशिक्षण मुलींची संस्थेत महिला प्राचार्याची नियुक्ती करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे केली आहे. या पत्रकार परिषदेस सिद्धाराम चाकोते, रुस्तुम कंपली, अनिल मस्के, प्रमिला तूपलवंडे, शोभा बोबे, ॲड. कमरुनिसा बागवान आदी उपस्थित होते.

# संवर्ग एकचे १९०० शिक्षक बदलीस पात्र

**● दिव्यांग व दुर्धर आजाराच्या शिक्षकांचा समावेश**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**
जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून शिक्षकांची बदली प्रक्रिया सुरू करण्यात आली असून पहिल्या टप्यात संवर्ग एकच्या शिक्षकांची बदली करण्यात येणार आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील एक हजार ९०० शिक्षकांचा समावेश आहे. संवर्ग एकमध्ये दिव्यांग, दुर्धार आजार, कुटुंबातील सदस्य आजारी तसेच ५३ वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षकांचा समावेश आहे.

संवर्ग एकचे १९०० शिक्षक बदलीस पात्र आले तरी दिव्यांग प्रमाणपत्राबद्दल शिक्षकांसह संघटनानाही विरोध केला आहे. बोगस दिव्यांग प्रमाणपत्रामुळे दिव्यांग शिक्षकांवर अन्याय होणार असल्याने दिव्यांग प्रमाणपत्रची जेजे हॉस्पिटल मुंबई येथे तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, सोलापूरच्या शासकीय रूग्णालयतील प्रमाणपत्रावरच बदली प्रक्रिया राबविण्यात येत असल्याने दिव्यांग शिक्षकांमधुन नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. संवर्ग एकमध्ये दीड हजारच्या आसपास दिव्यांग शिक्षक असल्याचे सांगण्यात येत आहे. शासकीय रूग्णालयातून दिव्यांग प्रमाणपत्र काढण्यासाठी दीड ते दोन लाख रूपये घेतले जात असल्याची तक्रार अनेक शिक्षकांकडून करण्यात आली आहे. मात्र, प्रशासनाकडून त्या तक्रारीची दखल घेण्यात आल्याचे दिसून येत नाही.

त्यामुळे दीड हजार दिव्यांग शिक्षकांमध्ये निम्याहून अधिक शिक्षकांची बदली चुकीच्या पद्धतीने होणार असल्याचे शिक्षकांची तक्रार आहे. जिल्ह्यातील नऊ हजार २५० शिक्षकांपैकी नऊ हजार ६१ शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी चार हजार ४३८ शिक्षकांची बदली होणार आहे. चार हजार ४३८ शिक्षकांपैकी एक हजार ९०० शिक्षक दिव्यांग आहेत. त्यांची बदली प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

> **बोगस प्रमाणपत्र मिळविलेल्या शिक्षकांवर होणार कारवाई**
> संवर्ग एकमध्ये दिव्यांग प्रमाणपत्र मिळविलेल्या शिक्षकांची विनंती बदली करण्यात येणार आहे. यामध्ये बोगस प्रमाणपत्र मिळविलेल्या शिक्षकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश ग्रामविकास विभागाने दिले आहेत. त्यामुळे दिव्यांग प्रमाणपत्रावर शिक्षण विभागासह शिक्षकांची नजर असणार आहे. अनेक शिक्षक संघटना दक्ष असून खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न होणार आहे.

# शहरातील ७८ रस्ते होणार चकाचक

**● शहरात विशेष स्वछता मोहीम ४.० चा शुभारंभ**
**● स्वच्छतेच्या मोहिमेत लोक सहभाग महत्त्वाचा : आयुक्त**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**
स्वच्छ आणि सुंदर शहर ही सोलापूरची ओळख व्हावी यासाठी सोलापूर महानगरपालिकेचे वतीने आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या नियंत्रणाखाली दिनांक १७ ते २७ जून पर्यंत शहरात विशेष स्वछता मोहीम ४.० राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा शुभारंभ झाला असून शहरातील एकूण ७८ रस्ते चकाचक होणार आहेत.

सोलापूर शहरातील मुख्य रस्त्याची स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. विभागीय कार्यलय एक ते आठ मध्ये सुरु असून या मोहिमेमध्ये छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज, विश्रांती चौक ते रूपा भवानी चौक, बलिदान चौक ते विश्रांती चौक, ७० फूट चौक ते आकाशवाणी केंद्र दोन्ही बाजू नई जिंदगी, रुद्रमनी चौक दोन्ही बाजू, अशोक नगर ते आरटीओ ऑफिस, महावीर चौक ते पत्रकार भवन, रंगभवन चौक ते सात रस्ता या ठिकाणी मोहीम राबविण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पत्रकार भवन येथे सुरु असलेल्या मोहिमेची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या सह अधिकारी, आरोग्य निरीक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

बुधवार दि.१८ जून २०२५ रोजी मोहीम ही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, रूपा भवानी चौक ते धरमकाटा चौक ते तुळजापूर रोड फ्लायओव्हर, चिराग भवन ते दयानंद कॉलेज दोन्ही बाजू, आकाशवाणी केंद्र ते बनशंकरी चौक, पंपा इंडस्ट्रीज ते लोकमत प्रेस, दावत चौक ते बनशंकरी चौक, पत्रकार भवन ते मोदी पोलीस चौकी, सात रस्ता ते जुना एम्प्लॉयमेंट चौक (व्हीआयपी रोड) येथे मोठ्या प्रमाणात स्वच्छता मोहीम घेण्यात आली. रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले बसणार नाहीत याची दक्षता घेणे, रस्त्यावरील अनधिकृत खोके, अतिक्रमण काढणे, रस्त्यावरील धूळ काढणे, लाईट पोल वरील बोर्ड, स्टिकर काढणे, वाढलेले गवत काढणे, रस्त्यावरील आजोरा काढणे झाडांचे फांद्या छाटणी दोन्ही बाजूंवरील फुटपाथ वरील स्वच्छता करणे, कचरा काढणे अशी कामे हाती घेतली. दरम्यान, यावेळी महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे स्वच्छतेच्या मोहिमेसाठी शहरातील सामाजिक संस्था, संघटनांनाही पुढे यावे. प्रत्येक व्यक्तीने स्वयंस्फूर्तीने यात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

> **या मोहिमेसाठी अशी आहे यंत्रणा**
> या संपूर्ण मोहिमेसाठी मुख्य आरोग्य निरीक्षक ८, आरोग्य निरीक्षक ४८ स्वच्छता कर्मचारी २८०, जेसीबी, डंपर, कॉम्पॅक्टर, कचरा संकलन वाहने, पाण्याचे टँकर आदींसह अन्य अद्ययावत यंत्रणा कार्यान्वित होती. नियंत्रण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली रोज सकाळ ७ ते ११ या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यावरील स्वच्छता मोहीम घेण्यात आली आहे. या मोहीमेमध्ये घनकचरा विभाग, विभागीय अधिकारी, उद्यान विभाग, अतिक्रमण विभाग, संगणक विभागा सहभाग रहाणार आहे.





सोलापूर : शहरातील विविध रस्त्यांवरून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक करताना रिक्षा चालक...तर दुसऱ्या छायाचित्रात रिक्षाच्या बाहेर लटकवलेले बॅग.

# शहरात रिक्षातून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतुकीला फुटतेय पेव


**● रिक्षाचालकांकडे बॅच बिल्ला, गणवेश अन् परवाना नाही?**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१८ जून-**
शहरातील विविध शाळा सुरू झाल्यानंतर शाळेला जाण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या रिक्षांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक सुरू झाली आहे. क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी वाहतूक रिक्षा चालक करत असल्याने विनाकारण अपघाताला आमंत्रण मिळत आहे. याकडे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने लक्ष देणे गरजेचे बनले आहे.

दरम्यान, शहरातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी पालक रिक्षा लावतात. मात्र, या रिक्षांमध्ये मेंढरं कोंबड्या सारखी विद्यार्थी रिक्षाचालकांद्वारे कोंबले जातात. रिक्षाचालकाच्या दोन्ही बाजूला मोठी मुले बसवली जातात. तसेच विद्यार्थ्यांच्या बॅगा रिक्षाच्या दोन्ही बाजूंना अडकवले जातात. पाठीमागे आणि मध्ये एकमेकांच्या अंगावर विद्यार्थी बसवले जातात. अशा परिस्थितीत रिक्षाचालक बेफान रिक्षा चालवतात. मात्र, अशी रिक्षा चालवताना अपघाताला आमंत्रण मिळत असते, हे माहीत असताना देखील रिक्षा चालक याकडे दुर्लक्ष करतात.

रिक्षाच्या दोन्ही बाजूंना अडकवलेल्या बॅगा तसेच बसलेल्या मुलांना इतर वाहनांचा कट लागल्यास, मोठा अपघात होऊ शकतो. अगोदरच रिक्षाचालकांची रिक्षा चालवण्याची मानसिकता सर्वांना परिचित आहे. अशातच रस्त्यातील मोठमोठ्या खड्ड्यांमुळे गंभीर स्वरूपाचा अपघात घडू शकतो. या सर्व गोष्टींची माहिती असताना देखील सर्रासपणे बेकायदेशीर विद्यार्थी वाहतूक सुरूच आहे. संबंधित रिक्षाचालकांकडे गणवेश किंवा बॅच बिल्ला देखील आढळून येत नाही. अशा स्थितीमध्ये प्रशासनाने तसेच परिवहन कार्यालयाने लक्ष देणे गरजेचे बनले आहे.

> **▸ रिक्षा चालकांवर प्रशासनाचे वचक असणे गरजेचे**
> शहरातील विविध शाळांमध्ये स्कूल व्हॅन संबंधी नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार त्याचे कामकाज चालते. परंतु रिक्षा चालकांना यासंबंधी कोणतीच नियमावली लागू होत नाही. रिक्षा चालक आपल्या मनमानी कारभाराप्रमाणे रिक्षा चालवतात. त्यांच्यावर देखील प्रशासनाची वचक असणे गरजेचे आहे.
> **- सतीश काळे, पालक**
>
> **▸ रिक्षातील विद्यार्थी वाहतूक नियमावली आवश्यक**
> रिक्षा चालकांवर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी व परिवहन विभागाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आजच्या काळात रिक्षाचालक बेफान रिक्षा चालवतात. रस्त्याच्या मध्येच ब्रेक लावून प्रवासी घेण्यासाठी थांबतात. अशावेळी गंभीर स्वरूपाचा अपघात होतो. त्याचप्रमाणे विद्यार्थी वाहतूक ही क्षमतेपेक्षा जास्त नसावी. यासंबंधी परिवहन कार्यालयाने शाळांना व रिक्षाचालकांना नियमावली देणे आणि ती पाळणे बंधनकारक करणे गरजेचे आहे.
> **- गणेश माने, सामाजिक कार्यकर्ते**



### १०२५ ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**सोलापूर, दि. १८ जून -**
सर्वोच्च न्यायालयाने ६ मे २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाने अनूसूचित जाती, अनूसूचित जमती व नागरीकांचा मागास प्रवर्ग यातील महिलांसह सरपंच पदाचे आरक्षणात बदल करण्याची सूचना दिली आहे. त्यानुसार राज्यपाल यांच्या आदेशानुसार सहसचिव व.मु. भरोसे यांनी ग्रामविकास विभागाला नवीन आदेशानुसार आरक्षण जाहीर करण्याच्या सूचना दिली आहेत.

तसेच पुढील पाच वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यातील ग्राम पंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यात एकूण १ हजार २५ ग्रामपचायती आहेत. त्यामध्ये अनूसूचित जाती १५५ पैकी ७८ महिला, अनूसूचित जमाती १८ पैकी ९ महिला, नागरीकांचा मागास प्रवर्ग २७७ पैकी १३९ महिला तर खुला प्रवर्ग ५७५ पैकी २८८ महिला जागासाठी आरक्षण जाहीर करण्यात आला आहे. राज्य शासनाचे सहसचिव भरोसे यांनी १३ जून रोजी ग्रामविकास विभागाकडे आदेश पाठविला आहे. यामुळे यापूर्वी जाहीर झालेले सरपंच पदाचे आरक्षण रद्द करण्यात आले आहे.

# एसटीची श्रावणात धार्मिकस्थळी विशेष सेवा

**एसटी व खासगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या संयुक्तपणे अत्यल्प दरात सहलींचे आयोजन**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**
राज्यातील सर्वसामान्य प्रवाशांना धार्मिकस्थळांना भेटी देता याव्यात यासाठी खासगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी राज्य परिवहन (एसटी) महामंडळासोबत संयुक्तपणे सहलींचे आयोजन करावे. जेणेकरून सर्वसामान्य प्रवाशांना कमी खर्चात निवास आणि भोजन व्यवस्थेसह धार्मिक पर्यटनाचा आनंद लुटता येईल. या योजनेत राज्यातील सर्व टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी सहभागी व्हावे, यासाठी महामंडळाद्वारे प्रयत्न सुरू केले आहेत.

दरम्यान, राज्यातील गोरगरीब जनतेला धार्मिक पर्यटन घडावे, यासाठी खासगी टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपन्यांनी एसटी महामंडळाच्या माध्यमातून कमी गर्दीच्या दिवसात सहलीचे आयोजन करावे. पंढरपूरच्या धर्तीवर तीर्थक्षेत्री भाविक, पर्यटकांना स्वच्छतागृह व निवास व्यवस्था (जिथे उपलब्ध असेल तिथे) निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येईल. कमी गर्दीच्या हंगामामध्ये विशेषतः सुट्ट्यांच्या दिवशी एसटीला प्रवासी भारमान कमी असते. त्यामुळे उत्पन्न कमी मिळते. अशावेळी एसटीने खासगी टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेसाठी धार्मिकस्थळी सहलीचे आयोजन केल्यास त्यातून एसटी महामंडळाला उत्पन्न मिळेल, तसेच सर्वसामान्य प्रवाशांना किफायतशीर दरात पर्यटनचा आनंद लुटता येईल. यासाठी खासगी टूर्स आणि ट्रॅव्हल्स कंपन्यांनी एसटी महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने कमी गर्दीच्या दिवशी पर्यटकांच्या मागणीनुसार अष्टविनायक दर्शन, तुळजापूर - पंढरपूर - अक्कलकोट दर्शन, ज्योतिर्लिंग दर्शन, त्रंबकेश्वर - नाशिक दर्शन अशा धार्मिक सहलींचे आयोजन करावे. तथापि, या उपक्रमाला येत्या श्रावण महिन्यापासून सुरुवात होईल अशी शक्यता वर्तवली जात आहे.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - ११५१

**वागवी अभिमान । सेना म्हणे यातिहीन ।।**
**पांडूरंगा ऐसे वाटतसे जीवा । करावी संतसेवा अहर्निशी ।।**

समचरणी उभा राहून समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम, कर्तव्याचा संदेश देणाऱ्या पांडूरंगाला कर्तव्य तत्पर राहून निस्वार्थ प्रेम करणारा भक्त आवडतो. असा भक्त कोणत्या जातीत जन्माला आला किंवा तो स्त्री आहे की पुरुष याच्याशी त्याला कांही देणे घेणे नसते. त्या भक्ताचे कार्य आणि प्रेम हेच त्याच्यासाठी सर्वश्रेष्ठ असते. आपण न्हावी म्हणून आपल्या वाट्याला आलेले स्वच्छतेचे कार्य प्रामाणिकपणे करतो. त्यामुळे भगवंताने आपल्याकडे यातिहीन म्हणून न पाहता केवळ आपल्या कर्तव्याकडे आणि प्रेमाकडे पाहून आपला स्विकार करावा आणि आपल्याबद्दल अभिमान बाळगावा असे सेनाजी लडीवाळपणे म्हणतात. सेनाजींनाही माहिती आहे की, भगवंत त्यांना अव्हेरुच शकत नाही. तरीपण आपल्या वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे पूर्णत्वास नेण्यातच भगवंताची भक्ती, प्रेम दडले आहे, हे सांगण्यासाठी सेनाजींनी हा लडीवाळपणा केला आहे. आपण स्वत:ला कमी न समजता कार्यतत्पर राहावे. या अनुषंगानेही संत सेनाजींनी एक प्रकारे हा मार्मीक उपदेश केला आहे.



संसारात अडकलेल्या जीवाला सत्ता, संपत्ती, सौंदर्य, संतान आदि सर्व स पासून सुरु होणारे पण एके दिवशी निश्चितच संपणारे कसे मिळेल याचाच विचार असतो. पण ज्याला सत्ता, संपत्ती, सौंदर्य, संतान हे सर्व संपण्यासाठीच आहे, त्याचबरोबर आपण स्वत:ही नाशवंत आहोत हे कळते, तो व्यक्ती संपणाऱ्या सत्ता, संपत्ती, सौंदर्य, संतानाऐवजी सेवेची अपेक्षा करतो. ज्याला कसल्याही प्रकारच्या नाशवंत व्यवहाराशी देणे घेणे नाही, अशा संत महात्म्यांची सेवा करायला भाग्य लागते. असे भाग्य सेनाजीसारख्या कर्तव्यतत्पर आणि निस्वार्थप्रेमी महात्म्याच्या वाट्याला सहज येते. असा महात्मा भगवंतावर सत्ता चालवण्याची ताकद ठेवत असले तरी त्याच्यावर सत्ता न गाजवता त्याच्यापुढे नम्रतेने आपला नि:स्वार्थ भाव तसेच संत सेवा, जनसेवा आपल्याकडून घडण्याची सद्बुध्दी टिकून राहण्याची मागणी करतात. यातच या महात्म्यांची खरी महती असते. दु:खाला सोडून काहीही आणि कितीही मिळू दे, असे संसारात अडकलेला जीव म्हणतो. अर्थात, धन, संपत्ती, सत्ता, मान, प्रसिध्दी, शारीरिक सुख, इंद्रियसुख पाहिजे तेवढे मिळू दे, अशी सांसारीक जीवाची मागणी असते. पण ज्याला आपला देह हा पराधीन आणि नाशवंत असल्याची जाण असते, तो जीव नाशवंत देहाचे लळे पुरवण्याकरिता कांहीच मागत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर भौतिक सुखाची आवड असा जीव धरीत नाही. अशा निर्मोही जीवाच्याही पुढचे पाऊल संत महात्मे टाकतात. त्यांना भौतिक सुख तर नकोच असते, पण मुक्ति, ऋध्दि-सिध्दीही नको असतात. सेनाजींच्याच बाबतीत बोलायचे झाले तर त्यांना धन, संपत्ती, सत्ता नको आहे. त्यांना नात्यागोत्याची आवडही नको आहे. वैकुंठासारखे सामराज्यही नको, सामुज्यता, मोक्षाचे सदनही नको आहे. त्यांना हवा आहे तो संत सहवास आणि अशांची सेवा करण्याची संधी. आपणाला संत महात्म्यांची सेवा करता आली नाही तरी चालेल पण किमान आईवडीलांची तरी सेवा करता आली पाहिजे. हा भावार्थ येथे पुरेसा होईल असे वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## प्रत्येक पोलिसाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजवावे : फुलारी

**सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील उत्कृष्ठ कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदारांचा सत्कार**

**विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांचा वार्षीक तपासणी कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

प्रत्येक पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आपले कर्तव्य हे प्रामाणिक व चोखपणे बजावून पोलीस खात्यास शोभणीय काम करावे. करण्यात आलेल्या कामाचे बक्षीस, पदकांचे प्रस्ताव सादर करावेत व अधिक अधिक बक्षीस व पदके प्राप्त करावीत. जेणेकरून त्यांचे हे काम इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांना स्फूर्तीदायक होईल, असे मत कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी व्यक्त केले.



कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी हे सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या वार्षीक तपासणीच्या दौऱ्यावर आले असून त्यांनी पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर परेडची पाहणी करून सोलापूर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कार्यालयाची वार्षीक तपासणी घेतली. यावेळी झालेल्या दरबारात उत्कृष्ठ कामगिरी करणारे पदक व पुरस्कार प्राप्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार केला. सत्कार करण्यात आलेल्यांमध्ये करमाळ्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील, मंद्रुप पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज पवार, भरोसा सेलमधील महिला पोलिस कर्मचारी श्रीमती सुरेखा शिंदे, अर्चाना शिंदे, श्वान पथकातील टेरी व जिमी श्वानाचे प्रशिक्षक व हॅन्डलर पोलीस अंमलदार सिध्दलींग स्वामी, चिदानंद रायकोटी, राजू इंगळे यांचा समावेश आहे. तसेच मागील काही दिवसामध्ये गुन्ह्यांचा उत्कृष्ट व कुशलतेने तपास करणारे पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर, नारायण पवार, बालाजी कुकडे, सहायक पोलिस निरीक्षक चौधरी व त्यांच्या पथकातील ३२ अंमलदार यांचादेखील सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणेप्रभारी अधिकारी व अंमलदार हे उपस्थित होते.



## वाचन आणि लेखनाने माणसाचे आयुष्य वाढते : कवी माधव पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

माझे दिड हजाराहून अधिक वेळा डायलेसिस होऊन देखील मी केवळ जिवंत आहे ते लेखन -वाचन आणि काव्यनिर्मितीच्या जोरावर ! वाचन आणि लेखनाने माणसाचे आयुष्य वाढते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मी स्वत:. आहे.

या शब्दात कवी माधव पवार यांनी आपली कवी म्हणून जडणघडण कशी झाली हे श्रोत्यांना सांगितले. सदाशिव बेडगे यांना रोख रक्कम ११ हजार १ रुपये शाल व श्रीफळ देऊन सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी ते बोलत होते. संभाजी आरमारचे संस्थापक श्रीकांत डांगे, ग्रंथालय निरीक्षक संजय ढेरे, संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, लेखिका छाया उंब्रजकर, लेखिका वंदना कुलकर्णी, लेखक किशोर जाधव, सिद्राम मुद्देबिहाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. अनुराधा बेडगे व सदाशिव बेडगे यांनी सर्व उपस्थितांचा सत्कार केला. यावेळी लेखिका वंदना कुलकर्णी, छाया उंब्रजकर, लेखक किशोर जाधव,ग्रंथालय निरीक्षक संजय ढेरे आदींनी मनोगत व्यक्त केले. सौ.अनुराधा बेडगे, धनश्री बेडगे,नरसिंह मिसालोलू सिध्दाराम हालकुडे, जगदीश गिडवीर,मदन तोरवी आदींनी परिश्रम घेतले. नगरसेवक रमेश व्हटकर, सौ.अनुराधा बेडगे, धनश्री बेडगे,देवांस कोले, संतोष स्वामी, रामकृष्ण बंडेवार, सिध्दाराम हालकुडे, जगदीश गिडवीर,मदन तोरवी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सिद्धेश्वर उकळे यांनी केले.




## जीवनात यशस्वी होण्यासाठी अभ्यासात सातत्य ठेवा : प्रा. रविंद्र पानुगंटी

**सोलापूर, दि. १८ जून-**

आपण पाहिलेल्या स्वप्नांना सत्यात उतरण्यासाठी अभ्यासात सातत्य ठेवण्याची गरज आहे. अभ्यासात सातत्य ठेवणारे विद्यार्थी परीक्षेत प्रामाणिकपणे यशस्वी होतात, असे गौरवोद्गार सुप्रभात क्लासेसचे संचालक प्रा. रविंद्र पानुगंटी यांनी काढले.

गीता नगर येतील सुप्रभात क्लासेसच्या वतीने दहावी तसेच बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. अक्कलकोट रोड एमआयडीसीतील टीडीएफ हॉलमध्ये हा सन्मान सोहळा झाला. यावेळी श्रीनिवास बुरा, सत्यनारायण गुर्रम, वेदांत क्लासेसचे संचालक पवन परदेशी यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना गौरव करण्यात आला. आर्या कुलकर्णी, आरती पोगुल, अलेक्या कोंडा, कीर्तना जटला, राघवेंद्र पानुगंटी, देविका कोलार यांच्यासह इतर विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान झाला. अंबिका दंडगळ-गणपा यांनी सूत्रसंचालन तर वनिता गुर्रम यांनी आभार मानले.

## पदमशाली स्मशानभूमीत गॅस दाहिनीचे उद्घाटन

**पर्यावरण रक्षणासाठी गॅस दाहिनीमध्ये अंत्यसंस्कार करण्याची गरज : आयुक्त**

**सोलापूर, दि. १८ जून-**

सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी अंतर्गत शांतीधाम परिसरात स्मार्ट सिटीच्या निधीतून अक्कलकोट रोड येथील पदमशाली स्मशान भूमीत गॅस दाहिनीही कार्यान्वित झाली असून त्याची नुकतीच यशस्वी चाचणीही घेण्यात आली आहे. आज आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



महापलिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज अक्कलकोट रोड येथील पदमशाली स्मशान भूमीची पाहणी केली. यावेळी पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, उपाध्यक्ष महांकाळी येलदी, सचिव संतोष सोमा, सहसचिव राजमहिंद्र कमटम, अंथर्गत हिशोब तपसणीस रमेश कैरमकोंडा, विश्वस्त मुरलीधर आरकाल, नरसय्या इप्पाकायल, रामचंद्र जन्नू, कार्यकारिणी सदस्य अशोक इंदापूरे, गणेश बुधारम,श्रीनिवास गड्डम,दयानंद आडम,शिवराज मेरगू, राम गड्डम, राजाराम गोसकी, शंबय्या वडलांकोंडा, अमृतदत्त चिन्नी, व पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष सुरेश फलमारी यांनी सोलापूर महानगपालिका व स्मार्ट सिटी च्या निधीतून गॅस दाहिनीही कार्यान्वित झाली असून त्याची नुकतीच यशस्वी चाचणीही घेण्यात आली आहे.

यावेळी आयुक्त यांनी गॅस दाहिनीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात यावे जेणे करून पर्यावरण रक्षण होईल तसेच अंत्यसंस्कारासाठी व येणाऱ्या नागरिकांसाठी सोयी सुविधासह हातपाय धुण्यासाठी सर्वसोयोंनीयुक्त परिसर, नवीन १२ अत्याधुनिक दाहिनी कट्टे बांधण्यात आले आहेत. त्याच बरोबर नातेवाईक याना बसण्यासाठी प्रशस्त शेड इत्यादी सोय चंगल्या पद्धतीने केल्या आहेत. तसेच महापालिकेच्या वतीने संस्थेला नेहमी सहकार्य करू असे आश्वासन दिले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १९ जून २०२५ | संत ज्ञानेश्वर माऊली |
| विक्रम संवत् २०८१ | पालखी प्रस्थान, आळंदी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. अष्टमी (११.५५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ.भाद्रपदा (२३.१६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सौभाग्य (२६.४५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२२.५५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ :** प्रभावपूर्ण वातावरण राहील. जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन :** रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. आपल्या सल्ला घेतला जाईल. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क :** विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक योजनेमध्ये यश मिळेल. कार्यकुशलते मुळे आपला फायदा होईल. कौटुंबिक संबंध चांगले राहतील. परमेश्वरावरील विश्वास वाढणार आहे.

**सिंह :** आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. आपले ध्येय्य साध्य करण्याच्या दिशेने हालचाल करा. व्यापारत नवीन योजना सुरू होतील. वडीलधाऱ्या व्यक्तिंच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**कन्या :** स्वविवेक बुद्धीने निर्णय घेऊनच व्यवहार करा. धावपळ केली तरच आपल्याला यश मिळणार आहे. सामाजिक स्थिती चांगली राहणार आहे.

**तुळ :** प्रवास करण्याचे शक्यतो टाळावे. आपली कार्यक्षमता वाढणार असून आपल्या योग्यतेची समाजात प्रशंसा होईल. कौटुंबिक स्थिती आनंददायी राहील.

**वृश्चिक :** सकारात्मक परिस्थिती राहील. कोणत्याही प्रकारच्या जोखमीचे कामे करू नका. व्यापारात अपेक्षेप्रमाणे लाभ होईल. कौटुंबिक तणाव निर्माण होईल.

**धनु :** नवीन संबंध फायदेशीर राहतील. उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ ठेवा. आपल्या ज्ञानात भर पडणार आहे. व्यावसायिक अडचणी दूर होतील. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मकर :** आपल्या कामाची व्यवहारात स्तुती होणार आहे. घरगुती समस्यांचा सामना करावा लागणार आहे. आर्थिक देणेघेणे व्यवहारात सावधानी बाळगा.

**कुंभ :** आर्थिक व्यवहार फायदेशीर राहतील. अनोळखी व्यक्तिवर विश्वास ठेवूच नका. नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे.

**मीन :** सज्जन लोकांच्या मदती मुळे आपल्या यशात भर पडेल. आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. कोणाचाही राग करू नका.

## विविध उपक्रमांनी प्रवेशोत्सव साजरा

### शहरातील विविध शाळांमध्ये शालेय साहित्यांच्या वाटपाने हरपले विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

**शहरातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक आणि शालेय साहित्यांचे वितरण करण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने औक्षण, गुलाबपुष्प अन् मिरवणुकीने विद्यार्थ्यांनी शाळेत पहिले पाऊल टाकले.**




### चांद तारा उर्दू शाळा

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला चांद तारा उर्दू प्रायमरी स्कूलमध्ये नूर सोशलवेलफेअरचॅरिटेबलट्रस्टचे अध्यक्षनजीरमुन्शी, उर्दूसोशलकॉलेजचे उर्दू विभागप्रमुख प्रो. डॉ. मो. शफी चौबदार आणि ऑर्किड कॉलेजचे इकबाल बागबान यांच्या हस्ते चिमुकल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेशसहीत पुस्तके वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त बशीर बागवान होते. सर्व विद्यार्थ्यांना गुला पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना मिठाई वाटण्यात आली. मुख्याध्यापिका गजाला सौदागर यांनी स्वागत केले. शेख उमर इमाम यांनी कुराण पठण केले. शेख शाफिया कौसर यांनी प्रास्ताविक केले. मुजावर आफ्रिन यांनी याला दुजोरा दिला. पटेल अशरफ यांनी सभेचे अध्यक्ष आणि पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन शेख शाफिया कौसर यांनी केले आणि पटेल अशरफ यांनी आभार मानले.



### जिजामाता प्रशाला

जिजामाता प्रशाला कोंडी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीदास जाधव यांच्या आशीर्वादाने व माजी आमदार निर्मला ठोकळ यांच्या प्रेरणेने संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ सचिवा शिल्पा ठोकळ यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रशालेचे मुख्याध्यापक उदय जाधव, उपसरपंच शिवाजी निळ तसेच ग्रामपंचायत सदस्य सुप्रिया भोसले यांच्या उपस्थितीत नवोदित विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहाने संपन्न झाला. कार्यक्रमास प्रशालेचे शिक्षक लक्ष्मण आगलावे, सारंग पाटील, विजयकुमार लांडगे, सुनीता वणगे, कैलास देशमुख, लिपिक संतोष शिरसागर, संतोष कासे उपस्थित होते. सूत्रसंचालन सारंग पाटील यांनी केले.



### सिद्धेश्वर स्कूल

श्री सिद्धेश्वर बालमंदिर पूर्व प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आल. श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य व श्री सिद्धेश्वर बाल मंदिर शाळेचे पालक सदस्य पशुपती माशाळ व त्यांच्या पत्नी मीनाक्षी माशाळ यांच्या हस्ते तसेच पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष माऊली डांगे, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा हेब्बाळ, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका स्मिता कोरवार यांच्या उपस्थितीत सरस्वती व सिद्धेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्ले ग्रुप, नर्सरी, लहान शिशु व मोठा शिशु वर्गातील नवोदितांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्राची संस्कृती व त्याचे महत्त्व दाखविणारा देखावा करण्यात आला. विद्यार्थ्यांना गुलाबाचे फुल, स्माईली स्टीक व गोड खाऊ देण्यात आले.

### एसव्हीसीएस प्रशाला

एस.व्ही.सी.एस.प्रशाला एमआयडीसी येथे प्रवेशोत्सव संपन्न झाला. प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमा पूजनानंतर संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे व मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांच्या हस्ते प्रशालेतील नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करूनस्वागत करण्यात आले. यावेळी प्रवेशद्वारा जवळ रंगीबेरंगी फुगे लावण्यात आलेले होते व सुंदर रांगोळी काढण्यात आलेली होती. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख केदार पटणे यांनी केले.





### मनपा मुलांची शाळा क्रमांक २७

महापालिकेच्या शाळा क्रमांक २७ मध्ये नवीन शैक्षणिक वर्षात चिमुकल्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक कासार यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन आणि औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते नवीन पाठ्यपुस्तक व नवीन गणवेश वितरीत करण्यात आले. तसेच शाळा परिसरात वृक्षारोपण देखील करण्यात आले. यावेळी शाळा परिसरातून प्रभात फेरी काढण्यात आली.

### श्राविका शिक्षण संकुल

श्राविका शिक्षण संकुलात शाळेच्या प्रथम दिवशी विद्यालयात विद्यार्थ्यांचे औक्षण करुन फुलांच्या पायघड्या घालून गोड खाऊ वाटपाने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक शाळा, उमाबाई श्राविका माध्यमिक शाळा तसेच पी एस इंग्लिश मीडियम प्री प्राइमरी व प्रायमरी विभागात नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहात सुरुवात झाली. शाळेचा सर्व परिसर फुगे, फुलांच्या माळा ,रांगोळीने सजवण्यात आला.शाळेच्या प्रवेशद्वारावर सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून फुलांच्या पायघड्या घालून शालेय गीताच्या तालावर त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संस्थेचे विश्वस्त तसेच सेक्रेटरी यतीन शहा उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्राविका संस्थेच्या सीईओ देवई शहा, प्रिसिजन समूहाचे समन्वयक माधव देशपांडे उपस्थित होते.



# यंदा सोलापुरातही निघणार जगन्नाथाचा रथ

## ‘इस्कॉन’चे आयोजन; जगन्नाथपुरीच्या धर्तीवर दोरीच्या सहाय्याने ओढणार रथ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**
शहरातील नवीन कुंभारी नाका भागातील आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) मंदिराच्या वतीने जगन्नाथपुरीच्या धर्तीवर सोलापुरातही श्री जगन्नाथ, बलदेव, सुभद्रा देवी मूर्तींची रथोत्सव मिरवणूक काढण्यात येणार आहे. विशेष म्हणजे हा रथ भाविक दोरीच्या साह्याने ओढतात. आठ ते दहा किलोमीटर अंतरापर्यंत ही मिरवणूक निघणार आहे. दि.२ जुलै रोजी हा सोहळा दुपारी एक वाजता हुतात्मा स्मृती मंदिरातून सुरू होणार आहे. दाजी पेठेतील व्यंकटेश्वर मंदिर मंगल कार्यालयात सायंकाळी सात वाजता समारोप होणार आहे.

**मूर्तींना सप्तजलाने स्नान, वनस्पतींच्या काढ्याचा नैवेद्य**

इस्कॉन मंदिरात भगवान जगन्नाथ, भाऊ बलराम व बहीण सुभद्रा यांच्या मूर्तींना विविध नद्यांच्या सप्तजलाने स्नान घालण्यात आले. याप्रसंगी मंत्रोपचार करण्यात आले. मंदिरात याशिवाय विविध पूजापाठ होणार आहेत. दर रविवारी विशेष कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात येते. देवासाठी भोग (प्रसाद) व वनस्पतींचा काढाही नैवेद्य म्हणून दाखविण्यात येतो. मंदिरात दैनंदिन पूजापाठ होतील. दोन जुलैला रथयात्रा आहे, अशी माहिती देण्यात आली. या उत्सवाचा मुख्य सोहळा दोन जुलै रोजी इस्कॉन मंदिर, कुंभारी नाका नवीन येथे होणार आहे. पहाटे साडेचारला मंगल आरती, यानंतर हरिनाम जप, सकाळी साडेसातला श्री राधा दामोदर श्रृंगार दर्शन, श्रील प्रभूपाद गुरुपूजा, सकाळी आठ वाजता जगनाथ कथा पूज्य लोकनाथ स्वामी महाराज सांगणार आहेत. सकाळी साडेदहाला महाप्रसाद होणार आहे. तर दुपारी एकला रथयात्रा हुतात्मा स्मृती मंदिरातून सुरुवात होणार आहे.

# सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ जून -**
सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे संघटक शरदजी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व विभाग प्रमुख संतोषजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी (२०२५-२०२७) ची अधिकृत घोषणा करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत सहकारी साखर कारखाना जिल्हा प्रकोष्टपदी उमेश परिचारक यांची तर पंढरपूरातील ख्यातनाम प्रज्ञावंत व्यावसायिक सी.ए. राजेंद्र विलास बजाज यांची अध्यक्षपदी, शिवानंद बोरामणी यांची महामंत्रीपदी, तर ॲड. प्रशांत बिचुकले यांची संघटन प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नविन कार्यकारिणीत अनेक उत्साही व कार्यसमर्थ सहकारी कार्यकर्त्यांचा समावेश असून, सहकार क्षेत्रातील नवचैतन्याची सुरुवात झाली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सहकार गीताने झाली. दुध प्रकोष्ठ प्रदेशप्रमुख उमेश विरधे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. त्यांनी सहकार भारतीचे संस्थापक श्रध्येय लक्ष्मणराव इनामदार व सहकार तपस्वी सुधाकरपंत परिचारक यांना अभिवादन करून सहकार भारती या संस्थेच्या १९९८ पासूनच्या वाटचालीचे अवलोकन उपस्थितांना दिले. शरद जाधव यांनी सहकाराच्या वाढत्या भूमिका, केंद्रीय सहकार मंत्रालय, तसेच ‘मेक इन इंडिया’, ‘स्टार्टअप इंडिया’ या उपक्रमांतील सहकार क्षेत्राचे योगदान विषद केले. कार्यक्रमाला पांडुरंग साखर कारखान्याचे माजी चेअरमन दिनकर मोरे, पंढरपूर बँकेचे चेअरमन सतीशराव मुळे, जिल्हा संघचालक डॉ. रमेश सिद, युवक नेते प्रणव परिचारक, कन्हैयालाल देवी, सुरज रोंगे उपस्थित होते. प्रास्ताविक सह विभाग प्रमुख नाना वाघमोडे, सूत्रसंचालन विशाल तपकीरे तर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याचे नियोजन गणेश हरिदास यांनी केले.

# जिल्हा नियोजन समितीच्या १८ जागा रिक्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, १८ जून-**
जिल्हा विकासासाठी काम करणाऱ्या जिल्हा नियोजन समितीमध्ये १८ जागा रिक्त असलयाने जिल्ह्याच्या विकासावर परीणाम होत आहे.

राज्यात महायुतीची सत्ता येऊन सहा महिने उलटले तरी कार्यकर्त्यांना संधी मिळणाऱ्या जिल्हा नियोजन समितीची पुर्नगठन करण्यात आले नाही. त्यामुळे रिक्त जागांवर वर्णी लावण्यासाठी कार्यकर्त्यांच्या नजरा लागल्या आहेत.

दक्षिणमध्ये आमदार सुभाष देशमुख यांनी यापूर्वी डॉ. चनगोंडा हविनाळे यांना संधी दिली आहे. त्यामुळे त्यांना मुदतवाढ देणार कि नवख्यांना संधी मिळणार याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. आमदार देशमुख यांचे निकटवर्तीय असणारे ज्येष्ठ नेते हणमंत कुलकर्णी, जिल्हा चिटणिस यतीन शहा, प्रशांत कडते यापैकी एका निष्ठावंतांची निवड करण्याची मागणी करण्यात येत आहे. नुकतेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत अल्प मतांनी पराभूत झालेले यतीन शहा यांचा पराभव आमदार देशमुख यांच्या जिव्हारी लागल्याने त्यांची निवड करण्याची मागणी होत आहे.

# बोरामणीच्या ‘ग्लोबल व्हिलेज’ ला स्वच्छ शाळा राज्यस्तरीय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बोरामणी, दि. १८ जून-**
गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव आयोजित गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगितेमध्ये कै.ब.ई.चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणीला गांधी तीर्थ स्वच्छ शाळेचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला.



यावर्षीच्या या गांधी तीर्थ स्वच्छ शाळा प्रतियोगितेत महाराष्ट्रातील २९२ शाळांनी सहभाग घेतला होता. नोव्हेंबर व फेब्रुवारीत शाळांनी केलेल्या स्व-मूल्यमापन आधारित व वर्षभरातील उपक्रम तसेच कार्यक्रमाच्या अहवालानुसार ४६ शाळांची अंतिम मूल्यांकन तसेच परीक्षणासाठी निवड करण्यात आली. अंतिम परीक्षणात ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूलची पुरस्कारार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे. पारितोषिक वितरण समारंभ रविवार, दि.२९ जून रोजी सकाळी ९.३० वाजता कस्तुरबा सभागृह, जैन हिल्स, जळगाव येथे संपन्न होत आहे.

हा पुरस्कार म्हणजे समर्पित भावनेनी गांधी विचार जगणाऱ्या शिक्षक आणि विध्यार्थ्यांच्या नियमित योगदानाचा गौरव असल्याची भावना संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिवा संगिता शहा यांनी व्यक्त केले. ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाचे समन्वयक प्रा. अनिकेत चनशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्या आस्मा नदाफ, प्रतियोगिता समन्वयक अमृता झुरळे, सोनाली मुदकन्ना, मल्लिनाथ जळकोटे, संगिता कोनापुरे यांनी परिश्रम घेतले.

# आदर्श राजमाता पुरस्काराने सविता पालक, लक्ष्मी रंगदाळ व संगीत मोरे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ जून-**
जनस्वराज्य फाउंडेशन महाराष्ट्र राज्य, हडपसर, पुणे यांच्यामार्फत राष्ट्रमाता जिजाऊ पुण्यतिथीनिमित्त सविता भगवान पालके, लक्ष्मी रंगनाथ रंगदाळ व संगीता सुदाम मोरे यांना आदर्श राजमाता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



हा पुरस्कार फाऊंडेशनचे संचालक दशरथ उकिरडे व भगवंत सहकारी संस्थेचे सचिव रवींद्र माचवे यांचे हस्ते देण्यात आला. यावेळी युवराज वाघमारे, सारंग जगदाळे, अमोल जगदाळे, रेखा कसबे आदी उपस्थित होते. ध्येय जनस्वराज्याचे, मानवतेच्या हक्काचे हे ब्रीदवाक्य ठेवून हे फाऊंडेशन कार्यरत आहे. सविता पालके यांचे सुपुत्र डॉ. राहुल पालके सध्या श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे इंग्रजी विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. त्यांनी १६ वेळा नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण केली आहे. लक्ष्मी रंगदाळ यांच्या कन्या अमृता रंगदाळ यांनी सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. संगीता मोरे यांचे सुपुत्र पीएसआय व मंत्रालयीन पदावर कार्यरत आहेत. याप्रसंगी डॉ. राहुल पालके यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी केलेला संघर्ष व त्याग याचा इतिहास मांडला.

अमृता रंगदाळ यांनी संभाजी महाराजांच्या पालखीचा संदर्भ दिला. फाउंडेशनचे संचालक उकिरडे यांनी फाऊंडेशनमार्फत चालविलेल्या विविध शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा मांडला. माचवे यांनी फाऊंडेशनच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

# एम्सच्या लँग्वेज स्कूलचे वळसंगमध्ये लोकार्पण

■ **विस्डम हॉलचे वळसंगमध्ये उदघाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**
वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे ग्लोबल एज्युकेशन संस्थेच्यावतीने एशिअन इनोव्हेटीव्ह मॉडर्न स्कूल (एम्स)अंतर्गत लँग्वेज स्कूलचे उदघाटन इतिहासतज्ञ सरफराज अहमद यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रतिकात्मक पिंजऱ्यात कैद पक्ष्यांना स्वातंत्र्य बहाल करुन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ विचारवंत बशीर परवाज अध्यक्षस्थानी होते.




या लँग्वेज स्कूलमध्ये पाच भाषांचे शिक्षण व राज्य शासनाच्या अभ्यासक्रमाचे धडे मुलांना दिले जातील. या शाळेत गरीब, अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी पालकत्व योजनेअंतर्गत विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. नोव्हेंबर महिन्यात सोलापूर शहरात झालेल्या शिक्षण परिषदेत सदरच्या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षात त्याची सुरुवात करण्यात आली आहे. या शाळेच्या परिसरातच ‘बैतुल हिक्मत-विवेकगृह’ (विस्डम हॉल) उभारण्यात आला आहे. या विस्डम हॉलमध्ये पन्नास संस्कृती चित्रे रेखाटण्यात आली आहेत. या हॉलचे लोकार्पणदेखील यावेळी करण्यात आले. यावेळी रविंद्र मोकाशी यांनी समाजामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी ही संस्था महत्वाची भुमिका बजावेल असा विश्वास व्यक्त केला. यावेळी डॉ. अखलाक वडवान यांनी ‘ग्रामीण भागातील शिक्षणाच्या सुविधा मजबूत करण्यासाठी अशा प्रकल्पांची गरज असल्याचे सांगितले. यावेळी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हाण, मौलाना इब्राहीम कासमी, वळसंगचे सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे, आरिफ कुरेशी, रविंद्र मोकाशी, श्रीशैल दुधगी आदी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. आसिफ इकबाल यांनी प्रास्ताविक केले. मोईज शेख यांनी सुत्रसंचालन केले. मौलाना शेख, जुबेर शेख, अब्दुल गनी कुरैशी, अल्ताफ कुडले, मुर्तुज धोटेघर, सय्यद शाह वाएज यांनी परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करा

■ **रासप जिल्हा सरचिटणीस अंगद देवकतेंची मागणी**

**करमाळा, दि. १८ जून-**
महाराष्ट्रातील शेतकरी प्रचंड मोठ्या संकटाला सामोरे जात असताना केंद्र सरकारने जाहीर केलेल्या अहवालानुसार शेतकऱ्यापेक्षा शेतमजुरांचे उत्पन्न जास्तीचे आहे.शेतीसाठी लागणारी मशागत, मजूरी, खते, बी-बीयाणे, औषधांची झालेली प्रचंड महागाईमुळे शेती करणे तोट्याचे बनले आहे. शासकीय सर्व्हेनुसार राज्यात दिवसाला आठ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे. याला जबाबदार चुकीचे शेती धोरण व सरकार जबाबदार आहे.शेतकऱ्यांसाठी स्वामिनाथन अयोग लागू होणे गरजेचे आहे. निवडणुकपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमचे सरकार आले की, शेतकऱ्यांचा उतारा कोरा करणार म्हटले होते. त्यांचे काय झाले? आत्ता मात्र मुख्यमंत्री फडणवीस यांना कर्जमाफीचा विसर पडलाय का? असे राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे. या निवेदनाची प्रत करमाळा निवासी नायब तहसीलदार विजय लोकरे यांना देण्यात आली. यावेळी रासप जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते, बाळासाहेब टकले, जगन्नाथ सलगर, नामदेव पालवे, शिवाजी खटके, विकास मेरगळ, सुधीर ठोंबरे, सुनील बंडगर, रघुनाथ खटके, यशवंत सलगर, शंकर सुळ, दिपक कडू उपस्थित होते.



निवडणूकीपूर्वी शेतकऱ्याला जो शब्द दिला तो शब्द पाळण्याऐवजी कृषी मंत्री शेतकऱ्यांची थट्टा उडवत आहे. जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांची कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा. आणि तालुक्यातील अतिवृष्टी नुकसानग्रस्तांना तात्काळ पैसे देण्यात यावेत, अन्यथा राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

# बार्शीत सेवानिवृत्त शिक्षिकेच्या बंद घरात चोरी

■ **साडेसोळा तोळे सोन्यासह रोख दीड लाख रुपये पळविले**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ जून-**
बार्शी शहरातील कसबा पेठ, धनगर गल्ली येथील एका सेवानिवृत्त शिक्षिकेच्या बंद घरातील कपाटातून तब्बल १६ तोळे ५ ग्रॅम सोन्यांच्या दागिण्याची चोरीसह रोख दीड लाख रुपयांचे अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना ६ जून ते १७ जून या कालावधीत घडली असून बार्शी शहर पोलीस ठाण्यात याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी दुर्गा नारायण पौळ (वय ६२ वर्षे) या सेवानिवृत्त शिक्षिका असून त्या धनगर गल्ली येथे एकट्याच राहतात. त्यांच्या पतीला दोन पत्नी असून ते दुसऱ्या पत्नीकडे मुंबईत राहतात. ६ जून रोजी दुर्गा पौळ आपल्या भावजय व पुतण्यांसह परभणीत लग्नानंतरच्या धार्मिक कार्यक्रमासाठी निघाल्या होत्या. त्यांनी घर बंद करुन आईला चावी दिली होती. कारण त्या दररोज जेवणासाठी फिर्यादीकडे येत असत.

१७ जून रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास त्या घरी परत आल्यावर त्यांच्या आईने स्वयंपाक करत असलेले दिसले. त्यानंतर सफाई करताना कपाटातील साहित्य खाली पडलेले दिसले आणि तपासणी केल्यावर कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम गायब असल्याचे लक्षात आले. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार कानातील टॉप्स (८ जोड) वजन ४ तोळे, पोहे हार ४ तोळे, गंठन २ तोळे, फुले झुबे (२ जोड) २ तोळ, सोन्याची चैन १ तोळे, नॅकलेस १ तोळे, मंगळसूत्र ५ ग्रॅम, पुष्कराज अंगठी ५ ग्रॅम, रिंग टाईप अंगठ्या (३) १ तोळे, बिंदल्या ५ ग्रॅम असे एकूण सुमारे १६.५ तोळे सोने चोरीस गेले. याबरोबरच रोख रक्कम रुपये १,५०,००० घरातून चोरुन नेले आहे. . फिर्यादीच्या मते, घरातील कुलूप बदलले गेले होते आणि त्यांच्या आईने वटपोर्णिमेच्या दिवशी स्वयंपाकासाठी घरात येताना आपले कुलूप लावल्याचे सांगितले. हा प्रकार लक्षात आल्यावर त्यांनी आपल्या भावास व मुलीला बोलावून शोधाशोध केली, मात्र ऐवज मिळून आला नाही. बार्शी शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## महत्वाचे...



### श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालयाच्या उद्यानदूतांचे तांदुळवाडी सरपंचाकडून स्वागत

**सोलापूर, दि. १८ जून-**
महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातीप उद्यानदूतांचे माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे सरपंच भामाबाई जाधव यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. कृषी कार्यानुभव कार्यक्रम पुढील तीन महिने या गावात राबविण्यात येणार आहे. यामध्ये उद्यानदूत शेतकऱ्यांना मशागत, माती परीक्षणापासून ते पीक निवड, लागवड ते काढणीपर्यंत घ्यावयाच्या काळजीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. तसेच शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत. यावेळी ग्रामसेवक सुनिल पांडुरंग शिंदे, तलाठी कपिल सुदाम मसलखांब, ऋषिकेश सातपुते, आयुष कदम, जयराज गायकवाड, आदित्य कऱ्हाडे, किरण एकळ, ओंकार गुटाळ, अल्ताफ मुलानी हे उपस्थित होते. श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मार्गदर्शिका श्रीलेखा पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद झगडे, महाविद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग कोळेकर, दत्तात्रय राऊत कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी अमोल देवकाते यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



### पंचाक्षरी प्रशालेत विद्यार्थ्यांचे स्वागत

**सोलापूर, दि. १८ जून -**
श्री पंचाक्षरी प्रशाला कन्नड माध्यम टाकळी ब्रिज येथे इयत्ता आठवी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. गुरू पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी सर्व विध्यार्थ्यांचे चारचाकी गाडीतून मिरवणूक काढण्यात आले आणि सर्वांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टाकळीच्या सरपंच भौरम्मा कोळी होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण वडरे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष बगले, गुरुबाळा पाटील, सुरेश मोरे, शिवरुद्रप्पा बगले , महेश पाटील तसेच प्रशालेचे नूतन मुख्याध्यापक बसवराज मेत्री संस्थेचे आधारस्तंभ व जेष्ठ लिपिक अंकुश व्हनमाने उपस्थित होते. सूत्रसंचालन सिध्दाराम पुजारी यांनी केले तर आभार गिरमला गुड्डेवाडी यांनी मानले.



Divya Lankeshwar Rajnandini Bhapkar Riya Athavale

### सीईटी परीक्षेत कुर्डूवाडीच्या ‘आदर्श’चे यश; दिव्या लंकेश्वर कॉलेजमध्ये प्रथम

**कुर्डूवाडी, दि.१८ जून-**
सीईटी परीक्षेत येथील आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश संपादन केले आहे. यामध्ये दिव्या लंकेश्वर ९६ पर्सेंटाईल गुण घेऊन प्रथम आली. कॉलेजमधील राजनंदिनी भापकर ९२ पर्सेंटाईल, रिया आठवले ९१ पर्सेंटाईल, अरमान सय्यद ८५ पर्सेंटाईल, दीप लंकेश्वर ८५ पर्सेंटाईल, प्रेरणा धायगुडे ८५ पर्सेंटाईल, तन्वी डांगे ८२ पर्सेंटाईल, अलबेरा शेख ८२ पर्सेंटाईल, हर्षदा चव्हाण ८२ पर्सेंटाईल या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शिंदे भैरवनाथ, भांगे दिपज्योती, भोसले दत्तात्रय, साडेकर पूनम यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, मुख्याध्यापिका शकिलाबी सय्यद, विभागप्रमुख आयेशा मुलाणी यांनी अभिनंदन केले.

### दिंडूर प्रशालेत प्रवेशोत्सव उत्साहात

**वळसंग, दि. १८ जून-**
दिंडूर (ता. दक्षिण सोलापूर) येथील लाल बहादूर शास्त्री प्रशालेत विद्यार्थ्यांचे प्रभातफेरीसह मोफत पाठ्यपुस्तक, गुलाबपुष्प, पेन देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध घोषणांनी परिसर दुमदुमला होता. शाळा समितीचे अध्यक्ष विठ्ठल हुच्चे, दिव्यांग विद्यार्थी पालक बिराजदार यांच्या उपस्थितीत इयत्ता पाचवी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घोडके, स्वामी, नारायणकर, शिवयोगी, सौ. बिराजदार, श्रीमती बिराजदार, मिरजे, हूळ्ळे, थोडके, पाकणीकर आदींनी परिश्रम घेतले.



### रयतक्रांती पक्षाच्या माढा तालुका नूतन कार्याध्यक्षपदी सिद्धेश्वर काळभोर

**माढा, दि.१८ जून-**
रयतक्रांती पक्षाच्या माढा तालुका नूतन कार्याध्यक्षपदी सिद्धेश्वर काळभोर यांची निवड झाली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सागरभाऊ खोत तसेच रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुहास पाटील, जिल्हाध्यक्ष दीपक भोसले, नूतन जिल्हाध्यक्ष बळीराम गायकवाड, बाळासाहेब बोबडे, माढा तालुका अध्यक्ष नागेश गायकवाड, मोडनिंबचे शिवाजी सुर्वे, अमर पवार यांनी रिधोरे येथे पत्र देऊन काळभोर यांचा सन्मान केला.






## महत्वाचे...

### पालखी मार्गाला जोडणाऱ्या रस्त्यांसाठी १ कोटींचा निधी : राम सातपुते

**नातेपुते, दि. १८ जून-**

माळशिरस तालुक्यातील पालखी महामार्गाला जोडणा-या रस्त्याच्या कामांसाठी ब गट योजनेमधून सुमारे १ कोटी ५ लाखांचा निधी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंजूर केल्याने ग्रामीण नागरिकांचा मार्ग सुकर व सुरक्षित होणार असल्याची माहिती माजी आमदार राम सातपुते यांनी दिली. मांडवे येथील नातेपुते जुना पालखी रस्ता दुरुस्ती कामाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी ते बोलत होते. तालुक्यात ब गट योजनेमधून पवारवाडी-गुरसाळे-मुजवाडी रस्ता विशेष दुरुस्ती करणे ३० लाख रुपये, तोंडले दसुर रस्ता दुरुस्ती १० लाख रुपये, मांडवे ते नातेपुते जुना पालखी रस्ता दुरुस्ती ३० लाख रुपये, निमगाव-बनकरमळा रस्ता दुरुस्ती २५ लाख रुपये, सदाशिवनगर- मांडवे रस्ता १० लाख रुपये असे १ कोटी ५ लाख रुपये निधी मंजूर असल्याचे श्री. सातपुते यांनी सांगितले.



### प्रस्थान सोहळ्याला नातेपुतेचे वारकरी रवाना

**नातेपुते, दि.१८ जून-**

कैवल्य चक्रवर्ती श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याबरोबर रथाच्या मागे दिंडी क्रमांक ९३ ही वै. ह भ प मनोहर महाराज भगत यांची नातेपुते परिसर वारकरी समाज दिंडी असते. या दिंडीत सहभागी होण्यासाठी नातेपुते येथील वारकरी टाळ मृदंगाच्या नामस्मरणाच्या गजरात आळंदीला बुधवारी दि. १८ जून रोजी रवाना झाले. नगराध्यक्षा अनिताताई लांडगे व नंदकुमार लांडगे यांच्या हस्ते वाहनाचे पूजन झाले. दिंडीच्या माध्यमातून कीर्तन, प्रवचन संत परंपरेची शिकवण, स्वच्छता, पर्यावरण, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, समता बंधुता, धर्मप्रचारासह वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार समाजातील अंधश्रद्धा वाईट चालीरीतीवर प्रहार करत समाज प्रबोधन आदी विषयावर जनजागृती करण्याचे काम या दिंडीच्या माध्यमातून गेले २४ वर्षे होत आहे. २४ वर्षांपूर्वी नातेपुते येथून वै. ह भ प मनोहर महाराज भगत यांनी दिंडीची सुरुवात केली. यंदा रौप्य महोत्सवी वर्ष आहे. दिंडीमध्ये नातेपुते, जळगाव, पुणे, लोणंद, बारामती, अकलूज, माळशिरस, इंदापूर, कवठेमहांकाळ, इचलकरंजी आदी भागातील २०० भाविकांचा समावेश आहे. दिंडीचे मार्गदर्शक राजेंद्र पांढरे, हनुमंतराव धालपे, अरविंद पांढरे, प्रवीण काळे, विनायकराव उराडे, माऊली सरक, अरुण उराडे, अमोल पाडसे, शशिकांत कल्याणी, गणेश कुचेकर, उत्तमराव पांढरे, जयराज पांढरे, दत्तू रुपनवर, अमोल कुचेकर, छगनराव मिसाळ, गोरख रुपनवर, विष्णू रुपनवर, उत्तमराव पांढरे, भागवत कोडलकर, काशिनाथ बुवा बंडगर, देविदास भुजबळ, किसन बंडगर, भाऊसाहेब काळे, हेमंत उराडे सुनील ढोबळे, राहुल काळे, रमेश पांढरे, शब्बीर मुलाणी, तानाजी घोडके, भागवत बोडरे, अनंत काळे, सागर पोटे, भाऊसाहेब काळे, राजेंद्र एकळ, माणिक लंबाते, देवा चव्हाण, सागर मदने, सचिन साळी, रामभाऊ डफळ, राहुल काळे प्रदीप पांढरे, राजकुमार बिंचकर, हभप भगत महाराज, भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

### हभप वाडकरांकडून १०८ सार्थ ज्ञानेश्वरी दान; अमृतमहोत्सवानिमित्त संकल्पपूर्ती

**सोलापूर, दि. १८ जून-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील साक्षात्कारी सत्पुरूष वै. हभप वनगोबा महाराजांचे वंशज हभप धर्मराज महाराज वाडकर यांनी स्वतःच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त येथील वारकरी भाविकांसह परिसरातील प्रवचनकर व कीर्तनकार महाराजांना १०८ सार्थ ज्ञानेश्वरी ग्रंथाचे दान केले. हभप वाडकर महराजांनी राबवलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे वारकरी सांप्रदायातून कौतुक होत आहे. प्रथमतः त्यांनी ७५ ग्रंथ दान देण्याचा संकल्प केला होता. मात्र एका अपघातातून ते वाचल्याने त्यांनी प्रत्यक्षात १०८ ज्ञानेश्वरीग्रंथ दान करण्याचा संकल्प केला अन सोमवार ९ जून रोजी सिध्दीला नेला. जगदगुरू श्रीसंत तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर, श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांच्यासह कासेगावचे साक्षात्कारी सत्पुरूष वै.तात्या महाराज यांचे विद्यमान वंशज हभप श्याम महाराज जोशी यांना तसेच कासेगाव येथील सर्व भजनी मंडळातील भाविक, पंचक्रोशीतील कीर्तनकार, प्रवचनकार यांना सार्थ ज्ञानेश्वरी दान दिली आहे. हभप वाडकर महाराज यांचे ओवीबद्ध संत तुकाराम चरित्र लिहिण्याचे काम चालू आहे. आषाढी एकादशी ते कार्तिकी प्रबोधिनी एकादशी या चातुर्मासकालात शतकोटी विठ्ठल नाम जप यज्ञ करण्याचा त्यांचा संकल्प आहे.



# यात्रा नियोजनात हस्तक्षेप केल्यास होणार गुन्हे दाखल

## तथाकथित समाजसेवकांना जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचा थेट इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ जून -**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर नगरपरिषदेकडून शहरातील अतिक्रमणे हटविण्यात येत आहेत तसेच आरटीओकडून कागदपत्रे नसणाऱ्या रिक्षांवर कारवाई करण्यात येत आहे. मात्र यामध्ये काही तथाकथित समाजसेवक हस्तक्षेप करत असल्याचे दिसून येत आहे. यापुढे त्यांनी हस्तक्षेप केल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील असा इशारा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला.

आषाढी यात्रा नियोजनाची माहिती देण्यासाठी विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे मंगळवारी (ता.१७) पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले, आषाढी यात्रेत सुमारे पंधरा लाखाहून अधिक भाविक दाखल होतील असा अंदाज आहे. नगरपरिषदेची अतिक्रमण हटाव मोहीम सुरू आहे. नियमाबाह्य रिक्षांवर आरटीओची कारवाई सुरू आहे मात्र काही तथाकथित समाजसेवक दबाव टाकत आहेत. त्यांनी अधिकाऱ्यांना त्यांच्या पध्दतीने काम करू द्यावे. जर का कोणी आधिकाऱ्यांवर दबाव टाकला तर त्यांच्यावर जरुर योग्य ती कारवाई करण्यात येईल असा इशारा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिला.



### पंढरपुरात २२ जूनला स्वच्छता मोहिमेचे आयोजन

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार येत्या २२ जून रविवारी पंढरपुरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेमध्ये सुमारे दोन हजार शासकीय अधिकारी, कर्मचारी सहभागी घेणार आहेत. शहरातील नागरिकांनी देखील स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले.

### भीमा नदीला महापूर येऊ नये याची दक्षता

उजनी धरण ५३ टक्के भरले आहे. धरण ७४ टक्के भरल्यानंतर धरणातून पाणी सोडण्यात येते. यात्रा कालावधीमध्ये चंद्रभागा नदीस महापूर येऊ नये याची दक्षता घेण्यात येत असून लवकरच पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन याबाबत दक्षता घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

### पूरपरिस्थितीवर देखील होणार विचारमंथन

जूनमध्येच उजनी धरणाने पन्नाशी ओलांडल्याने या वेळेला मोठ्या प्रमाणात पाणी चंद्रभागेत येऊ शकणार आहे. अशावेळी हे पाणी पुढे तसेच सोडून देणेही तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे ठरणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. यामुळे जर तशी परिस्थिती आली तर वाळवंटात मोठ्या प्रमाणात पाणी पसरू शकणार आहे. अशावेळी काय नियोजन करायचे, हे पोलीस अधीक्षक यांच्या समवेत बैठक घेऊन त्यावर देखील पर्याय शोधला जाईल असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

### यात्रेसाठी असे करण्यात आले खास नियोजन

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात ६ हजार २०० शौचालय उभा करण्यात आले आहेत. यात्रेवर लक्ष ठेवण्यासाठी तसेच चोरट्यांवर करडी नजर ठेवण्यासाठी शहरात विविध ठिकाणी ३५० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले आहे. या कॅमेऱ्याचे कक्ष नवीन बसस्थानक येथे करण्यात आले आहे. या ठिकाणी अधिकारी सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर नजर ठेवणार आहेत. अनुचित घटना घडल्यास याची तात्काळ माहिती आपत्ती व्यवस्थापनाला देण्यात येणार आहे. शौचालय साफ करण्यासाठी १२६ जेट मशीन ठेवण्यात आले आहेत. शंभर ठिकाणी वायरलेस केंद्र करण्यात आले आहे. ६० ठिकाणी वायफाय सुविधा देण्यात आली आहे ३१ ठिकाणी अतिदक्षता केंद्र उभारण्यात आले आहेत. २५ ठिकाणी भाविकांना फोन करण्याची सुविधा व्हावी म्हणून टेलिफोन केंद्रे उभा करण्यात आली आहेत.

### अन्यथा पैशांचा अपव्यय होईल

कुंभमेळा बारा वर्षातून एकदा येतो. केवळ मर्यादित दिवसांसाठी या पद्धतीचे पूल उभारण्यासाठीचा खर्च हा जवळपास चार कोटी रुपये इतका असून जर पाणी पातळी वाढली आणि पूल पाण्याखाली गेला तर हे पैसे वाया जातील. त्यामुळे अशा पद्धतीचा पूल चंद्रभागेच्या पात्रात उभा केला जाणार नसल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. या संदर्भात सैन्य दलाशी देखील संपर्क साधण्यात आलेला होता. मात्र चंद्रभागा नदीचा स्पॅन जास्त असल्याने या ठिकाणी मिलिटरी जातात असा पूल उभारणेही शक्य नसल्याचे आशीर्वाद यांनी सांगितले.

### जुना दगडी पूल केवळ भाविकांना चालण्यासाठी

जुन्या दगडी पुलावरील वाहतूक बंद करण्याचे आदेश दिले असून या पुलाच्या दोन्ही बाजूला मजबूत बॅरिगेटिंग केले जाईल. या पुलाचा वापर फक्त भाविकांना चालण्यासाठी ठेवला जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. गरजेनुसार या जुन्या दगडी पुलाला मजबुतीसाठी आधार देणे गरजेचे असेल तर तेही दिले जाईल. मात्र गेल्या वर्षी प्रमाणे कोणतीही चेंगराचेंगरी होणार नाही याची खबरदारी घेतली जाईल. भाविकांना दोन तीरावर जाण्यासाठी अजून एक पूल प्रस्तावित केला असून लवकरच याचे काम सुरू होईल असेही संकेत यावेळी त्यांनी दिले.

**तात्पुरता पूल उभारणे शक्य नाही**

सोलापूर जिल्ह्यातील धोकादायक फुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे सुरू असून जे धोकादायक पूल आहेत त्यावर तातडीने निर्णय घेण्यात येईल. मात्र आषाढी काळात कुंभमेळ्याप्रमाणे तात्पुरता पूल उभारणे शक्य नसल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# आषाढी वारीचे दिंडी अनुदान ९०२ दिंड्यांच्या खात्यावर जमा

**ॲड. त्रिगुण महाराज गोसावी यांची माहिती**

**भजन साहित्यासाठी निधीचा फायदा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ जून -**

आषाढी वारीतील दिंड्यांना प्रत्येकी वीस हजार रुपये अनुदान देण्याचा गतवर्षी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयावर यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने शिक्कामोर्तब केले असून आषाढी वारी सुरू होण्यापूर्वीच राज्यातील दहा मानाच्या पालखी सोहळ्यातील सुमारे ९०२ दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये प्रमाणे एकूण १ कोटी ८० लाख ४० हजार रुपये अनुदान दिंडी प्रमुखांच्या खात्यावर जमा झाले आहेत. या अनुदानाचा दिंड्यांना भजन साहित्य, ताडपत्री, डिझेल आदींसाठी उपयोग होईल असे संत सोपानदेव संस्थानचे प्रमुख ॲड त्रिगुण महाराज गोसावी यांनी सांगितले.

आषाढी एकादशी यात्रा २०२५ करिता मानाच्या १० पालख्यांसोबतच्या १ हजार १०९ दिंड्यांना प्रती दिंडी २० हजार रुपये अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत असल्याचा शासन निर्णय मागील आठवड्यात जारी करण्यात आला होता. गतवर्षी आषाढी एकादशी यात्रा सन २०२४ करिता मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या प्रत्येक दिंडीला २० हजार रुपये इतके अनुदान सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्याबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार २०२३-२४ मध्ये विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडून एकूण १ हजार १०९ दिंड्यांची यादी प्राप्त झाली होती. यावर्षीदेखील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपये याप्रमाणे एकूण २ कोटी २१ लाख ८० हजार रुपये अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे बैठक घेऊन पालखी सोहळ्यासाठी वारकऱ्यांना उत्तम सुविधा देण्याचे निर्देश दिले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी देखील आवश्यक सुविधांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही अशी ग्वाही दिली होती. प्रशासनातर्फे व्यापक स्तरावर आषाढी वारीचे नियोजन करण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मागील वर्षी प्रत्येक दिंडीला २० हजार रुपयांचे अनुदान दिले होते . त्यानुसार यंदाही वारीतील ९०२ दिंडीस प्रत्येकी २० हजार रूपये असे १ कोटी ८० लाख ४० हजार रुपये अनुदान सामाजिक न्याय विभाग व विशेष साह्यय यांचे वतीने विभागीय आयुक्त पुणे यांच्या माध्यमातून तात्काळ निधी सुपूर्द करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. आता ९०२ दिंडी प्रमुखांच्या खात्यावर पाठविले आहे इतर उर्वरित दिंड्यांची माहिती येत आहे. त्या दिंड्यांना पण माहिती आली की तात्काळ निधी देत आहोत. कोणीही निधी पासून वंचित राहणार नाही असे शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांनी सांगितले.

### अनुदान जमा झाले : गोसावी महाराज

शासनाने गतवर्षी प्रमाणे याहीवर्षी राज्यातील दिंड्यांना अनुदान देण्याचे वचन पाळले. आजच अनुदान खात्यावर जमा झाले. या अनुदानाचा भजन साहित्य, ताडपत्री, वाहनांना डिझेल आदी खर्चासाठी उपयोग होईल. शासनाचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत असे संत सोपानदेव संस्थानचे प्रमुख ॲड. त्रिगुण महाराज गोसावी म्हणाले.

### पालखी मार्गावर ३ कोटी ३२ लाखांच्या रस्त्यांचे काम सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ जून-**

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारीत वारकर्यांना विविध सुविधा देणेत येत आहेत. पालखी मार्गांशी निगडीत १६ रस्ते मंजूर झाले आहेत. त्या रस्त्यांची मुरूम व खडीकरणाचे काम प्रगतीपथावर असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ चे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांनी दिली.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज, आळंदी, श्री. संत तुकाराम महाराज, देहू, श्री. संत मुक्ताबाई, मुक्ताबाई, श्री. संत सोपान महाराज, सासवड, श्री. संत निवृत्तीनाथ महाराज, त्र्यबकेश्वर, श्री. संत एकनाथ महाराज, पैठण, श्री. संत नामदेव महाराज, पंढरपूर, श्री. विठ्ठल रुखमाई संस्थान, कौंडण्यपूर, श्री. संत चांगावटेश्वर देवस्थान, सासवड, श्री. संत निळोबाराय महाराज, पिंपळनेर या प्रमुख पालख्या सोहळ्या समवेत येणारे भाविक व मार्गावरून समवेत येणारे सर्व दिंड्यां मधील भाविकांच्या सुविधांसाठी १६ रस्ते मंजूर करण्यात आली आहेत. यापैकी १५ रस्त्यांची कामे सुयू असून माळशिरस तालुक्यातील म्हेत्रे मळा काम बंद आहे. १५ रस्त्यासाठी तीन कोटी ३२ लाख निधीचे मुरूमीकरण व खडीकरणाचे काम सुरू असल्याचे सांगितले.

# ज्ञानेश्वर माऊलींसाठी १ किलो सोन्याचा अलंकारिक मुकुट अर्पण

**पु.ना. गाडगीळ आणि सन्स यांची मुकुटाची निर्मिती**

**तभा वृत्तसेवा,**
**आळंदी, दि. १८ जून-**

भक्ती, कला आणि तंत्रज्ञान यांचा अद्वितीय संगम असलेल्या एका अलंकारिक मुकुटाचं आज आळंदीतील श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी अर्पण करण्यात आलं. नांदेड येथील भारत रामिनवार आणि मिरा रामिनवार या भक्तदांपत्यानं सुमारे १ कोटी किंमतीचा आणि १ किलो शुद्ध सोन्यापासून बनवलेला हा मुकुट ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी येथे अर्पण केला.




या मुकुटाची निर्मिती सुप्रसिद्ध पु. ना. गाडगीळ आणि सन्स लि. यांनी केली असून, चार महिन्यांच्या अथक परिश्रमातून तो साकारला आहे. पारंपरिक नक्षीकाम, धार्मिक प्रतीकांची सूक्ष्म कोरीव रचना आणि आधुनिक थ्रीडी तंत्रज्ञानाचा सुंदर समन्वय यामध्ये पाहायला मिळतो. मुकुटावर कमळ, चक्र, सूर्यकिरण आदी मंगल धार्मिक प्रतीकांची कलात्मक मांडणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, वारकरी परंपरेशी नातं असलेल्या कुशल कारागिरांनी हा मुकुट भक्तिभावाने घडवला असून, त्यामुळे त्याला अधिक पावित्र्य लाभले आहे. या विशेष प्रसंगी प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर आणि विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप हे मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत माऊलींना हा अलंकार भक्तिपूर्वक अर्पण करण्यात आला. हा मुकुट विशेष धार्मिक प्रसंगी माऊलींना परिधान करण्यात येणार असून, भाविकांसाठी तो श्रद्धा, भक्ती आणि अभिमानाचं प्रतीक ठरेल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं पारंपरिक श्रद्धेची अशी साजेशी मांडणी ही काळाशी सुसंगत अशी भक्तीची अभिव्यक्ती म्हणावी लागेल. रामिनवार दांपत्याच्या या अद्वितीय अर्पणामुळे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सेवेत जोडलेली ही कलाकृती भाविकांच्या मनात अढळ स्थान मिळवेल, यात शंका नाही.

# शासकीय यंत्रणांनी गर्दी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घ्यावे

**अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांचे निर्देश**

**आषाढीच्या पार्श्वभूमीवर घटना प्रतिसाद प्रणालीचे प्रशिक्षण**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ जून-**

पंढरपूर येथे ६ जुलै २०२५ रोजी आषाढी यात्रा भरणार आहे आषाढी यात्रा कालावधी हा २६ जून ते १० जुलै असा आहे या कालावधीत दहा ते पंधरा लाख वारकरी भाविक पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. त्या अनुषंगाने गर्दीचे व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणालीचे काटेकोरपणे अंमलबजावणी प्रशासन करत असते. या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणांनी आपले प्रशिक्षण पूर्ण करून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी दिले. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित गर्दी व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणाली बाबतच्या प्रशिक्षणात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर मार्गदर्शन करत होत्या. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, छत्तीसगड येथील इमर्जन्सी अधिकारी विशाल वासवानी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या सहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अप्पर जिल्हाधिकारी ठाकूर पुढे म्हणाल्या की दि. २६ जून ते १० जुलै या कालावधीत आषाढी वारी पंढरपूर येथे होत असून, या कालावधीत सुमारे पंधरा लाख भाविक येण्याची शक्यता आहे.

त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात या यात्रेचे नियोजन आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत केले जाते. व्यवस्थापनाच्या सुलभतेसाठी तसेच वारकरी भाविकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने घटना प्रतिसाद प्रणाली लागू केलेली आहे व जिल्ह्यात ही प्रणाली २०१५ पासून राबवली जात असून सर्व संबंधित यंत्रणा प्रमुखांनी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी गर्दी व्यवस्थापन व घटना प्रतिसाद प्रणालीचे अत्यंत बारकाईने प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रारंभी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी या प्रशिक्षणाचा उद्देश सांगून आषाढी वारीमध्ये घटना प्रतिसाद प्रणालीचे महत्त्व सांगितले.

आषाढी वारी यात्रेतील गर्दीचे व्यवस्थापनाबाबत युनिसेफचे इमर्जन्सी ऑफिसर विशाल वासवानी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये आषाढी वारीत गर्दीचे व्यवस्थापन अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था, सुविधा आणि सेवा, आपत्कालीन नियोजन याबरोबरच कोणत्याही व्यवस्थापनातील यशासाठी महत्त्वपूर्ण घटक असलेला संपर्क या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली. घटना प्रतिसाद प्रणाली आपत्तीजन्य परिस्थिती धोका कमी करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा आहे या प्रणालीद्वारे नियोजन सुयोग्य व सुलभ होते त्यासाठी आवश्यक कामकाजाचा लेखाजोगा ठेवणे व त्यानुसार कारवाई करणे अपेक्षित असते असे त्यांनी सांगितले.